११६ म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

८०

ग्रं.क्र. ११६

नितितत्वे.

निबंध

रुई,

वाचनमंदिर पुस्तकावली

पुस्तक १ लें.

# नीतितत्त्वें.

आप्पाजी विष्णु कुळकर्णी
यांनीं लिहिलें

तें

पुणें येथें

'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छा०.

जानेवारी १८९३.

किंमत ट० ह० सह ३ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
३-५
मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

रुई,

वाचनमंदिर पुस्तकावली.

पुस्तक १ लें.

# नीतितत्त्वें.

आप्पाजी विष्णु कुळकर्णी
यांनीं लिहिलें

तें
पुणें येथें
'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छा॰.

जानेवारी १८९३.

किंमत ३ आणे.

# प्रस्तावना.

रुई गांवांत वाचनमंदिराची स्थापना होऊन आज सरासरी तीन वर्षें होत आलीं. इतक्या कालांत बक्षीस दिलेल्या व विकत घेतलेल्या मिळून कित्येक चांगल्या व उपयुक्त पुस्तकांचा त्यांत जो संग्रह झाला आहे, त्याकडे लक्ष दिलें म्हणजे कोणालाही आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्याचप्रमाणें त्यांत येणाऱ्या वर्तमानपत्रांच्या व मासिकपुस्तकांच्या योगानें येथील कित्येक लोकांना जी वाचनाची अभिरुचि लागत चालली आहे, त्याकडे पाहिलें म्हणजे वाचनमंदिराचा दिवसेंदिवस अभ्युदय व्हावा अशीही इच्छा प्रत्येकाला उत्पन्न होईल यांत संशय नाहीं. मी एक वाचनमंदिराचा भक्त असल्यामुळें व त्याचा उत्कर्ष व्हावा अशी अन्तःकरणपूर्वक माझी इच्छा असल्यामुळें वाचनमंदिराप्रीत्यर्थ एकादें पुस्तक लिहावें असें फार दिवस माझ्या मनांत घोळत होतें. त्याप्रमाणें मीं हें 'नीतितत्त्वें' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. माझ्या कांहीं मित्रांनीं हें पुस्तक पाहून मला असें सुचविलें कीं, वाचनमंदिराप्रीत्यर्थ लिहिलेल्या पुस्तकावर वाचनमंदिरपुस्तकावलींतील पुस्तक असें लिहावें. ही सूचना मला मान्य होऊन मीं या पुस्तकावर 'वाचनमंदिरपुस्तकावलि पुस्तक १ लें' असें लिहिलें आहे. आतां खुद्द या पुस्तकासंबंधानें दोन शब्द लिहून ही प्रस्तावना आटोपतों.

राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास जीं अनेक साधनें लागतात, त्यांपैकीं त्यांतील लोक नीतिमान असणें हें एक मुख्य होय. आमचा देश दिवसेंदिवस जो निकृष्टावस्थेला येत चालला आहे, तो आमच्यामधील नीतिमत्तेचा ऱ्हास होत चालल्यामुळें येत आहे, हें पुष्कळ अंशीं अगदीं खरें आहे. नीतिमत्तेचा ऱ्हास न होऊं देतां, ती वाढविण्याचे जे लहान मोठे उपाय असतील ते करणें हें आमचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. हें कर्तव्यकर्म लक्षांत आणून आपल्या हातून थोडी तरी देशसेवा घडावी या उद्देशानें हें पुस्तक एका इंग्रजी ग्रंथाच्या आधारें मराठी भाषेंत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. बहुतेक नीतिविषयक ग्रंथ फार कठिण असल्यामुळें त्यांचा लहान मुलांना फारसा उपयोग होत नाहीं. करितां लहान मुलांकडून हें लहानसें पुस्तक नेहमीं वाचविल्यास त्यांचा पुष्कळ फायदा होईल अशी आशा आहे.

या पुस्तकास श्री० **उदाजीराव उर्फ दादासाहेब चव्हाण डिगरजकर** यांनीं उदार आश्रय दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. त्याचप्रमाणें हें पुस्तक लिहून झाल्यावर आमचे मित्र रा० रा० **विनायक दत्तात्रय भिलवडीकर** यांनीं हें पुस्तक तपासून शुद्ध करण्याची तसदी घेतली, याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

नोव्हेंबर १८९२.
रुई. } पुस्तककर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अभिप्राय.

'नीतितत्त्वें' हें लहानसें पुस्तक एका इंग्रजी पुस्तकाच्या आधारें लिहिलें असून याची भाषासरणी शुद्ध व सुबोध आहे. हें पुस्तक मुलांनीं वाचण्यास फार योग्य आहे.

१५-१-९३ (सही) के. एन. पांडित.<br>
कोल्हापूर. बी. ए. एलएल् बी. मुनसफ् कोल्हापूर.

नि ७२९
८०५

# नीतितत्त्वें.

## कर्तव्यकर्म ह्मणजे काय ?

देवानें उपजतबुद्धि ही मनुष्याला ज्याप्रमाणें दिली आहे, त्याचप्रमाणें पशूलाही दिली आहे; व मनुष्याची कित्येक गोष्टी करण्याकडे जशी स्वाभाविक प्रवृत्ति असते, तशीच पशूचीही असते. पण आपण जें जें करितों, व दुसरे जें जें करितात, तें चांगलें किंवा वाईट हें समजण्याची शक्ति ईश्वरानें पशूला न देतां, मनुष्यालाच दिली आहे. या शक्तीलाच सदसद्विवेकशक्ति असें ह्मणतात; व हिच्या सहायानेंच मनुष्य कित्येक गोष्टी करितो, व कित्येक गोष्टींपासून दूर रहातो. सदसद्विवेकशक्तीला ज्या गोष्टी वाईट भासतात त्या न करणें, व ज्या गोष्टी चांगल्या असतात त्या करणें, यालाच कर्तव्यकर्म करणें असें नांव आहे.

मनुष्याचीं कर्तव्यकर्में तीन प्रकारचीं आहेत—

( १ ) ईश्वराविषयीं कर्तव्यकर्में.
( २ ) स्वतःविषयीं कर्तव्यकर्में.
( ३ ) स्वजातीयांविषयीं कर्तव्यकर्में.

# भाग पहिला.

## मनुष्याचीं ईश्वराविषयीं कर्तव्यकर्में.

ईश्वराविषयीं मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म हें आहे कीं, त्यानें ईश्वराचें अस्तित्व कबूल केलें पाहिजे; तो अनाद्यनंत, सर्वशक्ति, सर्वज्ञ, परम पवित्र, न्यायी व दयाळू आहे असें मानिलें पाहिजे; व तोच या जगाचा स्वामी व चालक आहे असें समजलें पाहिजे.

ईश्वराविषयीं आपलें दुसरें कर्तव्यकर्म हें आहे कीं, त्याची काय इच्छा आहे, हें समजून घेण्याची आपण खटपट केली पाहिजे. कारण ती इच्छा समजली ह्मणजे आपणास त्याप्रमाणें वागतां येईल.

ईश्वराविषयीं आपलें तिसरें कर्तव्यकर्म हें आहे कीं, त्याचा अपमान होईल याची आपण भीति बाळगिली पाहिजे. कां कीं, तो शक्तिमान् व न्यायी असल्यामुळें दुष्ट मनुष्याला अतिशय कडक शिक्षा करितो, व अपराधी मनुष्याला मुळींच दोषमुक्त करीत नाहीं.

ईश्वराविषयीं आपलें चवथें कर्तव्यकर्म हें आहे कीं, आपण त्याच्यावर प्रीति केली पाहिजे. त्याच्यावर प्रीति करण्याचीं मुख्य कारणें दोन आहेत. एक, त्याचे ठायीं अतिशय चांगुलपणा भरला आहे; व दुसरें, सर्व प्राणिमात्रांशीं तो फार कृपाळू आहे. आह्मांला जीं जीं ऐहिक व पारमार्थिक सुखें मिळतात, तीं सर्व त्याच्याच

दयेनें मिळतात. त्याच्यावर प्रीति केल्यानें आपल्या मनांत त्याला संतुष्ट करण्याची इच्छा उत्पन्न होते; व ही इच्छा दिसून येण्यास, त्याला ज्या गोष्टी अप्रिय आहेत त्या न केल्या पाहिजेत, व त्याला ज्या गोष्टी प्रिय आहेत त्याच केल्या पाहिजेत.

ईश्वराविषयीं आपलें पांचवें कर्तव्यकर्म हें आहे कीं, त्याच्या इच्छेनुरूप आपण वागलें पाहिजे; व तो जें जें करितो, तें सर्व शहाणपणानेंच करितो असें मानिलें पाहिजे. त्याच्या इच्छेनुरूप वागलें पाहिजे ह्मणजे त्याची आज्ञा पाळली पाहिजे, व तो आपणांवर जीं जीं संकटें आणितो, तीं मुकाट्यानें सहन केलीं पाहिजेत. आणि तो आपल्यासंबंधानें, किंवा दुसऱ्याच्यासंबंधानें जें कांहीं करितो, त्यांत चूक ह्मणून बिलकुल आढळत नाहीं; ह्मणून तो जें करितो तें शहाणपणानेंच करितो असें आपण समजलें पाहिजे.

ईश्वराच्या इच्छेनुरूप आपण कां वागावें, व त्याच्या शहाणपणावर सर्वस्वी कां हवाला ठेवावा, याचीं मुख्य कारणें तीन आहेत. ( १ ) तो आह्मांला जन्म देतो, व तोच आमचें पालनपोषण करितो; ह्मणून पालक या नात्यानें आमच्यावर पाहिजे तो हक्क चालविण्याचा त्याला अधिकार आहे. ( २ ) तो फार दयाळू आहे; ह्मणून नेहमीं आमचें कल्याणच करावें अशी त्याची इच्छा असते. ( ३ ) तो फार चतुर आहे; ह्मणून कोणती गोष्ट आमच्या हिताची आहे, हें आमच्यापेक्षां त्याला अधिक कळतें.

ईश्वराविषयीं आपलें सहावें कर्तव्यकर्म हें आहे

कीं, त्याच्याविषयीं आपण पूज्यबुद्धि बाळगिली पाहिजे. ही पूज्यबुद्धि आपल्या अन्तःकरणांत तर असलीच पाहिजे. पण ती नुसती अन्तःकरणांतच ठेवून उपयोगी नाहीं, तर होतां होईल तितक्या रीतींनीं प्रगट केली पाहिजे. आणि ती प्रगट करण्याचा मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे, त्याच्या नांवाला कलंक न लागेल अशा प्रकारच्या गोष्टी आपण करणें, हा होय.

ईश्वराच्या नांवाला केव्हां केव्हां आपण जो कलंक लावितों, तो बहुतकरून तीन गोष्टींनींच लावितों. (१) त्याच्यासंबंधीं निंदात्मक भाषण करून. ( २ ) खोटी शपथ घेऊन. खोट्या शपथेंत दोन प्रकार आहेत. जी गोष्ट खरी नाहीं, ती शपथ घेऊन खरी आहे असें आपण सांगतों, हा एक प्रकार; व अमुक गोष्ट करावयाची नाहीं असा संकल्प अगोदरच मनांत केलेला असतो, परंतु ती गोष्ट खास करितों असें शपथपूर्वक दुसऱ्याला वचन देतों, किंवा अशा खुबीदार शब्दांनीं वचन देतों कीं, त्यावरून दुसऱ्याला तें खरेंच आहे असें वाटावें, हा दुसरा प्रकार. ( ३ ) नेहमींच्या भाषणांत कारणावांचून व विचार न करितां उगीच भराभर शपथा घेऊन. खोटें बोलण्यामध्यें आपण ईश्वराची शपथ घेऊन त्याला इतका कमीपणा आणितों कीं, आपल्याबरोबर त्यालाही खोटा ठरवितों. खोटी शपथ न घेतल्यानें हा फायदा होतो कीं, आपण एखादी गोष्ट करूं, किंवा करणार नाहीं, असें संदिग्ध वचन देऊन दुसऱ्याला घोंटाळ्यांत पाडिलें असें होत नाहीं; व आपणालाही आपलें वचन मोडण्याचा प्रसंग येत नाहीं.

बि. ६०

सारांश, त्याचें अस्तित्व कबूल करणें, त्याची भीति बाळगणें, त्याच्यावर प्रीति करणें, त्याचे उपकार स्मरणें, त्याची भक्ति करणें, त्याच्यावर भरंवसा ठेवणें, त्याचा धांवा करणें, त्याच्याबद्दल पूज्यबुद्धि बाळगणें, व नेहमीं त्याची प्रामाणिकपणानें सेवा करणें, हीं ईश्वराविषयीं मनुष्याचीं मुख्य कर्तव्यकर्मे होत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

---

# भाग २ रा.

## मनुष्याचीं स्वतःविषयीं कर्तव्यकर्मे.

मनुष्याचीं स्वतःविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे दोन आहेतः—

( १ ) मनोविकारांना वश न होणें.

( २ ) इंद्रियांच्या योगानें तृप्त होणाऱ्या इच्छा प्रबळ न होऊं देणें.

---

### ( १ ) मनोविकारांना वश न होणें.

मनोविकारांना वश न होण्यास, नम्रता हा गुण अंगीं असला पाहिजे.

नम्रता दोन तऱ्हेची आहे. ( १ ) आपली योग्यता फार कमी आहे असें आपण समजणें. ( २ ) व

दुसऱ्यानीं आपली योग्यता कमी आहे असें ह्मटलें, तरी राग न येतां समाधान मानणें.

अंगीं पुष्कळ योग्यता असली, तथापि ती पुष्कळ आहे असें आपण मानूं नये. तसें मानिलें, तर आपण गर्विष्ठ आहों असें दिसून येतें. त्याचप्रमाणें आपली योग्यता कमी असतां दुसऱ्यांनीं ती कमी आहे असें ह्मटलें, तर राग न येतां किंवा वाईट न वाटतां समाधान मानिलें पाहिजे. तसें न केलें, तर आपण उगीच बढाई मिरवितों असें दिसून येतें.

गर्वाच्या योगानें आपल्या हातून पातक घडतें, त्याच्या योगानें आपला मूर्खपणा दिसून येतो, व आपला नाश होतो. मूर्खपणा असा दिसून येतो कीं, आपल्या हातून जें जें चांगलें घडतें, किंवा आपणाला जें जें सुख मिळतें, तें ईश्वराच्या दयेनें मिळत असून त्याबद्दल आपण गर्व वाहतों. व नाश असा होतो कीं, गर्वाच्या योगानें आपण भलतीच एखादी गोष्ट करितों, व तेणेंकरून आपल्याला पुष्कळ दुःख सोसावें लागतें.

गर्वाप्रमाणेंच बढाई हीही पातकाचें मुख्य बीज आहे. तिच्या योगानें आपलें शहाणपण तर दिसून येत नाहींच; उलट आपण केवळ मूर्ख आहों, असें मात्र दिसून येतें. कारण, आपला कांहीं एक फायदा नसतांना ती आपण मिरवितों. तिच्या योगानें आपला नाशही होतो. कां कीं, या जगांत जीं पापें वाईट मानिलीं आहेत, तीं आपल्या हातून घडतात.

मनोविकारांना वश न होण्यास सौम्यता हा दुसरा गुण अंगीं असला पाहिजे. उतावीळपणा व राग यां-

पासून काय काय परिणाम होतात, हें लक्षांत आणिलें ह्मणजे जे लोक सौम्य आहेत, त्यांनाच खरें सुख मिळतें असें दिसून येतें.

मनोविकारांना वश न होण्यास सारासारविचार करणें हा तिसरा गुण अंगीं असला पाहिजे. सारासारविचार करणें ह्मणजे काय? तर जो मनुष्य कोणतीही गोष्ट एकाएकीं न करितां, ती करावी किंवा न करावी याचा विचार करितो, याचें नांव सारासारविचार करणें. सारासारविचार केला ह्मणजे कोणत्याही गोष्टीपासून चांगला किंवा वाईट परिणाम होईल हें अगोदर आपणाला कळतें. व ती गोष्ट केल्यानंतर त्याबद्दल पुढें आपणाला पश्चात्ताप करावा लागत नाहीं.

विकारवश न होण्यास समाधान हा चवथा गुण अंगीं असला पाहिजे. समाधान ह्मणजे काय? तर, ईश्वरानें ज्या स्थितींत आपणाला ठेविलें आहे, ती स्थिति बरी आहे असें मानणें, व कोणत्याही गोष्टीबद्दल कुरकुर, हेवा, अथवा द्वेषबुद्धि नसणें, याचें नांव समाधान.

मनोविकारांना वश न होण्यास मानसिक उत्साह हा पांचवा गुण अंगीं असला पाहिजे. मानसिक उत्साहामध्यें दोन गोष्टी येतात. (१) मनाचा सावधपणा. (२) मनाचा उद्योग. मनाच्या सावधपणानें आपली पापांपासून निवृत्ति होते, व मनाच्या उद्योगानें नेहमीं सत्कृत्यें करण्याकडे आपली प्रवृत्ति असते.

---

## (२) इंद्रियांच्या योगानें तृप्त होणाऱ्या इच्छा प्रबळ न होऊं देणें.

इंद्रियांनीं तृप्त होणाऱ्या इच्छा प्रबळ न होऊं देण्यास पवित्रपणा हा गुण अंगीं असला पाहिजे. पवित्रपणा ह्मणजे काय? तर, व्यभिचार अथवा जारकर्म यापासून दूर राहणें याचें नांव पवित्रपणा. पवित्रपणा अंगीं येण्यास, व तो कायम राखण्यास, आपले नेत्र, जिव्हा, व कल्पनाशक्ति हीं स्वाधीन ठेविलीं पाहिजेत; स्त्री, धन, इत्यादिकांचा मोह उत्पन्न होण्याबरोबर तो घालविला पाहिजे; व उपयुक्त धंद्यांत नेहमीं निमग्न असलें पाहिजे.

इच्छा प्रबळ होऊं न देण्यास नियमितपणा हा दुसरा गुण अंगीं असला पाहिजे. नियमितपणा बहुतकरून इतक्या गोष्टींत असला पाहिजेः—आहार, पोषाख, निद्रा व कर्मणूक.

आहारांत असा नियमितपणा पाहिजे कीं, उगीच शरीर स्थूल न होतां, अंगांत शक्ति येईल अशा बेतानेंच आहार ठेविला पाहिजे. त्याचप्रमाणें ऋण काढून सण न करितां, आपल्याला जें अन्न मिळतें, तेंच खाल्लें पाहिजे.

पोषाखांत असा नियमितपणा पाहिजे कीं, ईश्वरानें आपणाला पुष्कळ संपत्ति दिली असल्यास, भपकेदार पोषाख न करितां, उंची व टिकाऊ पोषाखच करावा. व आपण गरीब असल्यास, कर्ज काढून दिखा-

ऊ पोषाख करण्यापेक्षां आपल्याला जें मिळतें, त्यांतच साधा आणि टिकाऊ पोषाख करावा.

निद्रेमध्यें असा नियमितपणा पाहिजे कीं, वाजवीपेक्षां फाजील निद्रा न घेतां, श्रमपरिहार होऊन हुषारी वाटेल इतकीच निद्रा घेतली पाहिजे.

कर्मणुकीमध्यें असा नियमितपणा पाहिजे कीं, भलत्यासलत्या गोष्टींपासून आपण कर्मणूक करून घेऊं नये. त्याचप्रमाणें वाजवीपेक्षां अधिक कर्मणूक न करितां, जीपासून मानसिक व शारीरिक श्रम परिहार होऊन पुन्हां काम करण्याची उमेद येईल, इतकीच कर्मणूक केली पाहिजे.

---

# भाग ३ रा.

## स्वजातीयांविषयीं आपलीं कर्तव्यकर्में.

स्वजातीयांविषयीं जीं आपलीं कर्तव्यकर्में आहेत, त्यांचे दोन वर्ग करितां येतात. ( १ ) न्याय. (२) परोपकार.

---

### न्याय.

न्याय या सदराखालीं येणाऱ्या कर्तव्यकर्मांचे दोन प्रकार आहेत. ( १ ) दुसऱ्याला इजा किंवा दुखताप

न करणें. (२) दुसऱ्याशीं योग्य अथवा वाजवी रीतीनें वागणें.

---

## (१) दुसऱ्याला इजा किंवा दुखापत न करणें.

दुसऱ्याला इजा किंवा दुखापत न करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे. या कर्तव्यकर्माप्रमाणें वागतां येण्यास आपण कोणत्याही रीतीनें दुसऱ्याला दुःख देतां उपयोगी नाहीं. दुसऱ्याला दुःख देण्याचे मुख्य मार्ग ह्मटले ह्मणजे चार आहेतः—(१) दुसऱ्याचें अन्तःकरण दुखविणें. (२) त्याच्या शरीराला दुखापत करणें. (३) त्याच्या मालमत्तेचें नुकसान करणें. (४) त्याच्या अब्रूची नालस्ती करणें.

### (१) अन्तःकरण दुखविणें.

एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याचा द्वेष करीत असल्यामुळें त्याजकडून दुसऱ्याला विनाकारण पुष्कळ पीडा होते. त्याचप्रमाणें एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यावर जुलूम केल्यामुळें, किंवा मन वळविल्यामुळें, किंवा फसविल्यामुळें, अथवा त्याला मदत केल्यामुळें, त्या दुसऱ्या मनुष्याच्या हातून वाईट गोष्टी घडतात ; आणि आपल्या हातून वाईट गोष्टी घडल्या, तेव्हां ईश्वर आतां आपणाला कडक शिक्षा करील, असा विचार मागून त्याचे मनांत येऊन त्याला फार दुःख होतें.

अप्रत्यक्ष रीतीनें दुसऱ्याला दुःख देण्याचे पुष्कळ मार्ग आहेतः—(१) दुसऱ्यांला वाईट कित्ता घालून

दिल्यामुळें त्याच्या हातून वाईट गोष्टी घडतात; व त्यापासून त्याला जें दुःख होतें, तें आपणच दिल्यासारखें होतें. ( २ ) दुष्ट मनुष्याला उत्तेजन दिल्यामुळें, किंवा त्याला शिक्षा करावयाला चुकल्यामुळें, त्याच्याहातून दुसऱ्याला जें दुःख होतें, तें आपणच दिल्यासारखें होतें. ( ३ ) सद्वर्तनानें वागणाऱ्या मनुष्याचा उपहास करून त्याच्या कर्तव्यकर्माला अडथळा आणल्यामुळें त्याला जें दुःख होतें, तें आपणच दिल्यासारखें होतें.

## (२) दुसऱ्याच्या शरीराला दुखापत करणें.

दुसऱ्याच्या शरीराला दुखापत करण्याचे मुख्य चार मार्ग आहेतः—(१) खून किंवा बेकायदेशीर रीतीनें दुसऱ्याचा जीव घेणें. खून किंवा बेकायदेशीर रीतीनें दुसऱ्याचा जीव घेणें ह्मणजे काय? तर जो मनुष्य दुसऱ्यावर बलात्कार करून किंवा अन्नांत अगर पाण्यांत विष कालवून स्वतः अगर दुसऱ्याकडून तें त्याला खावयाला देतो, व तेणेंकरून त्याचा जीव घेतो, याचें नांव खून किंवा बेकायदेशीर रीतीनें दुसऱ्याचा जीव घेणें. (२) अन्यायानें दुसऱ्याला मारणें, किंवा लंगडा करणें, थोटा करणें, अगर दुसऱ्या कसल्याही प्रकारची जखम करणें. (३) एकानें दुसऱ्याचा खून करावा ह्मणून परस्परांत भांडण लावणें. (४) शरीराची खराबी व्हावी या हेतूनें दुसऱ्याला दुर्व्यसन लावणें.

## (३) मालमत्तेचें नुकसान करणें.

दुसऱ्याच्या मालमत्तेचें नुकसान करण्याचा पहिला मार्ग ह्मटला ह्मणजे त्याच्या स्त्रीशीं जारकर्म करणें

हा होय. ज्या अर्थीं हें नुकसान कोणत्याही तऱ्हेनें भरून देतां येत नाहीं, त्या अर्थीं हा सर्वांत मोठा अपराध आहे असें मानिलें आहे. दुसरा मार्ग हा कीं, स्वतःचा कांहीं एक फायदा नसतां, केवळ द्वेषबुद्धीनें, किंवा आपल्याला त्याची मालमत्ता मिळावी या लोभानें ती लुटणें.

लोभानें दुसऱ्याची चीजवस्त लुबाडण्याचे तीन मार्ग आहेतः--(१) बलात्कार. उदाहरणार्थ, एकापेक्षां दुसरा बलवान् असला ह्मणजे दुसरा त्याची चीजवस्त लुटतो. (२) चोरी. चोरी करण्याचे दोन प्रकार आहेत. दुसऱ्याचें कर्ज बुडविणें, किंवा एखादी वस्तु देतों असें दुसऱ्याला वचन देऊन ती न देणें, हा एक प्रकार; व दुसऱ्याला न कळत त्याची वस्तु घेणें, हा दुसरा प्रकार. दुसऱ्या प्रकारच्या चोरीला मोठा गुन्हा असें मानून सरकार कायद्याप्रमाणें कडक शिक्षा करितें. (३) कपट. कपट दोन गोष्टींत करितां येतें. एक, विश्वासाच्या कामांत, व दुसरें, व्यापाराच्या कामांत.

दुसऱ्यावर जुलूम किंवा बलात्कार करण्याचा सर्वांत वाईट प्रकार ह्मटला ह्मणजे कायद्याचें साहाय्य घेऊन त्याच्यावर जुलूम करणें हा होय. या प्रकारानें दुसऱ्याच्या मालमत्तेच्या लोभास्तव तीवर खरा हक्क नसतां, लांच देऊन खरा हक्क आहे असें शाबीत करितां येतें. मनुष्याच्या हक्कांचें संरक्षण व्हावें, हा कायदे करण्याचा मुख्य हेतु. त्या कायद्याच्या साहाय्यानें जर तेच हक्क नाहींसे केले, तर या सारखा मोठा अपराध तो कोणता ? आणि जो अन्यायानें शिक्षा करवितो,

तोच एक अपराधी असतो असें नाहीं, तर जे जे त्याला मदत करितात, ते सर्व अपराधी असतात.

जुलूम करण्याचा आणखी एक वाईट प्रकार ह्मटला ह्मणजे दुसरा गरजू आहे, ही संधि पाहून त्याच्यावर जुलूम करणें हा होय. उदाहरणार्थ, जुलूम करणारा दुसऱ्याला कोणत्या तरी पदार्थाची गरज लागली ह्मणजे त्याच्याकडून त्याच्या अवसानाबाहेर किंमत घेतो; किंवा सावकार अगर जमिनीचा मालक, आपलें कुळ दरिद्री आहे असें पाहून, आपल्या हातून होईल तितकी खटपट करून, त्याच्याकडून निघेल तेवढा पैसा उकळतो. ज्याच्यावर जुलूम होतो, तो जितका निराश्रित असेल तितका जुलूम करणाऱ्याच्या हातून मोठा अपराध होतो असें समजावें. याप्रमाणें विधवा स्त्रियांवर किंवा पोरक्या मुलांवर जो जुलूम करितो, तो मोठा पातकी आहे असें समजून ईश्वर त्याला कडक शिक्षा करितो.

कपटानें दुसऱ्याचा विश्वासघात करितां येतो. उदाहरणार्थ, सरकारी अथवा खासगी नोकराला आपल्या धन्यासाठीं कोणताही जिन्नस खरेदी करण्याचा, अथवा धन्याच्या मालमत्तेची व्यवस्था लावण्याचा, अथवा धन्याचें हित करावें या उद्देशानें कोणतेंही काम करण्याचा अधिकार दिला असतां, तो आपल्या कामाप्रमाणें धन्याचें काम प्रामाणिकपणानें न करील, किंवा आपल्या स्वाधीन केलेल्या जिनसांचा नाश अगर अपव्यय करील, तर धन्याशीं विश्वासघात केल्याचा त्यानें अपराध केला असें होईल.

व्यापाराच्या कामांत व्यापाऱ्यानें कोणत्याही मालाची विक्री करितांना गिऱ्हाइकाशीं कपट करूं नये. व्यापारी कपट करितात तें बहुतकरून इतक्या गोष्टींत करितात—(१) माल खराब असतांना मालाची खोटी तारीफ करून. (२) माल चांगला दिसावा ह्मणून एखादी युक्ति लढवून. (३) खोटें वजनमाप करून. (४) गिऱ्हाइकाला मालाची किंमत माहित नसल्यामुळें वाजवीपेक्षां फाजील किंमत त्याच्याकडून घेऊन. गिऱ्हाइकानेंही व्यापाऱ्याला मालाची किंमत माहित नसल्यामुळें, अगर त्याला आपल्या मालाची विक्री करणें भाग पडल्यामुळें, अगर त्याच्या नजरचुकीमुळें, त्याला कपटानें फसवूं नये.

वर सांगितलेल्या रीतींपैकीं कोणत्याही रीतीनें आपण गिऱ्हाइकास फसविलें, असें व्यापाऱ्याला समजल्यास, व्यापाऱ्यानें योग्य असेल तें लागलेंच गिऱ्हाइकास द्यावें. त्याचप्रमाणें आपण व्यापाऱ्याला फसविलें असें गिऱ्हाइकास कळून आल्यास,गिऱ्हाइकानें व्यापाऱ्याला त्याच्या मालाबद्दल योग्य किंमत असती लागलीच द्यावी. कारण, ह्या गोष्टी जरी लोकांस कळून येत नाहींत, तरी ईश्वराला ठाऊक असल्यामुळें याबद्दल तो दंड करीलच करील.

### (४) अब्रूची नालस्ती करणें.

दुसऱ्याला दुःख देण्याचा चवथा मार्ग म्हटला म्हणजे त्याजबद्दल तिरस्कार दाखवून, किंवा त्याचा उपहास करून किंवा त्याच्याबद्दल खोट्या बातम्या पसरवून



त्याच्या अब्रूची नालस्ती करणें हा होय. दुसऱ्याच्या अब्रूची आपण नालस्ती केल्यानें त्याला इतकें दुःख होतें कीं, तितकें दुःख दुसऱ्या कशानेंही होत नाहीं. कारण, अब्रू ही कांचेसारखी आहे. कांचेचें भांडें एकदां फुटलें म्हणजे तें जसें नीट करितां येत नाहीं, त्याप्रमाणें एक वेळ अब्रू गेली कीं, ती फिरून कधींही मिळत नाहीं.

याप्रमाणें दुसऱ्याला दुःख देण्याचे जे जे मार्ग वर सांगितले आहेत, त्यांपैकीं कोणत्याही मार्गाचें अवलंबन करून कोणी कोणाला कसल्याही प्रकारचें दुःख देऊं नये. दुःख देऊं नये येवढेंच नव्हे, तर दुःख देण्याचें मनांत सुद्धां आणूं नये. त्याचप्रमाणें एखाद्याला वर सांगितल्यापैकीं कोणत्याही तऱ्हेचें दुःख व्हावें, अशी इच्छा आपण धरूं नये. किंवा दुःख झालें असेल, तर आनंद मानूं नये.

---

## २ दुसऱ्याशीं योग्य अथवा वाजवी रीतीनें वागणें.

दुसऱ्याशीं योग्य अथवा वाजवी रीतीनें वागणें हा न्याय या सदराखालीं येणाऱ्या कर्तव्यकर्मांचा दुसरा प्रकार होय. याचे दोन विभाग करितां येतात. (१)सर्व मानव जातीविषयीं आपण आपलीं कर्तव्यकर्में बजावणें हा एक विभाग. (२)व आपला ज्या मनुष्यांशीं विशेष संबंध आहे, त्यांविषयीं आपण आपलीं कर्तव्यकर्में बजावणें, हा दुसरा विभाग.

सर्व मानव जातीविषयीं आपलें मुख्य कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे खरें बोलणें हें होय. हें मुख्य असण्याचें पहिलें कारण असें आहे कीं, ईश्वरानें आपणांला जी वाचा दिली आहे, ती दुसऱ्याला आपले विचार कळवितां यावेत याच उद्देशानें दिली आहे; आणि तिचा उपयोग जर आपण खोटें बोलण्याकडे करूं लागलों, तर ईश्वरानें दिलेल्या देणगीचा दुरुपयोग केल्याबद्दल आपण ईश्वराचे अपराधी होतों. दुसरें कारण असें आहे कीं, असत्य भाषणानें समाजाची वाताहत होऊन समाज फार वेळ टिकणार नाहीं. उदाहरणार्थ, जर एखादा मनुष्य आपल्या ज्ञातिबांधवांच्या बोलण्यावर भरंवसा ठेवणार नाहीं, तर त्यांच्यापासून जें सुख त्याला मिळावयाचें, त्याला तो मुकेल, व खुद्द समाजाचाही अगदीं नाश होऊन जाईल.

सर्व मानव जातीशीं सभ्यपणानें वागणें हें मानव जातीविषयीं आपलें दुसरें कर्तव्यकर्म होय. सभ्यपणानें आपलें लोकांत वजन वाढतें, व आपलें पुष्कळ हित होतें. सभ्यपणानें आपण लोकांना प्रिय होतों, व लोक आपणांला फार चहातात.

अंगीं लीनता धारण करणें हें मानव जातीविषयीं आपलें तिसरें कर्तव्यकर्म होय. लीनता धारण करणें म्हणजे काय ? तर, अंगीं सहनशीलता असणें याचें नांव लीनता धारण करणें. लीनता धारण केल्यानें मनुष्याला आपला राग आवरतां येतो; व राग आवरतां आल्यानें रागापासून होणारे दुष्परिणाम टाळितां येतात.

ज्या मनुष्यांशीं आपला विशेष संबंध आहे, त्यां-



विषयीं आपलीं मुख्य कर्तव्यकर्में तीन प्रकारचीं आहेत—(१) आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहेत त्यांना मान देणें, त्यांचा पाणउतारा न करणें, त्यांच्याशीं द्वेषभाव न धरणें, इत्यादि कर्तव्यकर्मांचा पहिल्या प्रकारांत समावेश होतो. (२) अज्ञान आहेत त्यांना सज्ञान करणें, दुःखार्तांचें दुःख निवारण करणें, दुर्बल आहेत त्यांचें संरक्षण करणें, दरिद्री आहेत त्यांना अन्नवस्त्र देणें, सारांश, आपल्यापेक्षां जे सर्व गोष्टींनीं कमी आहेत, त्यांच्या गरजा भागविणें यांचा दुसऱ्या प्रकारांत समावेश करितां येतो. (३) आपलें जीवित सर्वथैव ज्यांच्यावर अवलंबून आहे, त्यांच्याशीं तिसऱ्या प्रकाराखालीं येणाऱ्या कर्तव्यकर्मांचा संबंध असून, तीं फार व्यापक व महत्वाचीं असल्यामुळें, त्यांजकडे आपण विशेष लक्ष दिलें पाहिजे. तीं कर्तव्यकर्में येणेंप्रमाणें आहेतः——

(१) मुलाचीं आईबापांविषयीं, व आईबापांचीं मुलाविषयीं. (२) विद्यार्थ्यांचीं शिक्षकाविषयीं, व शिक्षकाचीं विद्यार्थ्याविषयीं. (३) प्रजेचीं राजाविषयीं व राजाचीं प्रजेविषयीं. (४) चाकराचीं धन्याविषयीं व धन्याचीं चाकराविषयीं. (५) नवऱ्याचीं बायकोविषयीं व बायकोचीं नवऱ्याविषयीं. (६) मित्राचीं मित्राविषयीं. (७) कोणावर कोणी उपकार केला असल्यास, ज्याच्यावर उपकार केला त्याचीं उपकार करणाऱ्याविषयीं.

मुलाचीं आईबापांविषयीं मुख्य कर्तव्यकर्में हीं आहेत—(१) त्यांना मान देणें. (२) त्यांच्यावर ममता करणें. आईबापांना ज्या गोष्टींपासून आनंद होईल, त्या गोष्टी जर मुलगा करील, व त्यांना ज्या गोष्टींपासून दुःख

होईल त्या गोष्टी जर तो न करील, तरच मुलाचें आईबापांवर प्रेम आहे असें समजावें. (३) त्यांच्या आज्ञेंत वागणें. आईबापांनीं आपल्या मुलास कोणतीही योग्य आज्ञा केल्यास ती कितीही कडक असली, तरी त्यानें पाळली पाहिजे. (४) त्यांना वेळेवर सहाय करणें, व म्हातारपणीं त्यांची शुश्रूषा करणें. (५) त्यांच्याबद्दल कृतज्ञ असणें. कृतज्ञ असण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, बाळपणीं जेव्हां आपण अगदीं अजाण होतों, व स्वतःची काळजी घेण्याला असमर्थ होतों, तेव्हां त्यांनींच आम्हांला अन्नवस्त्र देऊन आमचा सांभाळ केला नसता, तर कधींच आपण मेलों असतों.

आईबापांचीं मुलाविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) त्याचें लहानपणीं पालन पोषण करणें. (२) त्याला शिक्षण देणें. (३) त्याला सद्गुणी करणें. (४) त्याला उदर निर्वाहाचा एखादा मार्ग दाखविणें. (५) व त्याला चांगला कित्ता घालून देणें.

विद्यार्थ्याचीं शिक्षकाविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) त्याचा हुकूम मानणें. (२) त्यानें नेमून दिलेले धडे काळजीनें तयार करणें. (३) त्याचा मान राखणें. (४) त्यानें आपल्याला ज्ञान दिलें याबद्दल त्याजविषयीं कृतज्ञ असणें.

शिक्षकाचीं विद्यार्थ्याविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत--(१) त्याला काळजीपूर्वक व उत्साहानें शिकविणें. (२) त्याला वाईट मार्गाकडे न जाऊं देणें.(३) व त्याला नीतीनें वागावयाला शिकविणें.

प्रजेचीं राजाविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत. (१) त्याच्याविषयीं पूज्यबुद्धि बाळगणें. (२) त्याला योग्य कर असतील ते देणें. (३) त्यानें केलेले योग्य हुकूम व कायदे पाळणें. (४) त्याला आपलीं गाऱ्हाणीं सांगणें व त्यांबद्दल त्याजपाशीं दाद मागणें. (५) व प्रसंगीं त्याला सहाय्य करणें.

राजाचीं प्रजेविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) तिचें संरक्षण करणें. (२) तिचे हक्क राखणें. (३) अपराध्यांना शिक्षा करणें. (४) चांगल्या लोकांना उत्तेजन देणें. (५) व लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकून त्यांना न्याय देणें.

चाकराचीं धन्याविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) त्याचा हुकूम मानणें. (२) त्याचे आपणावर लक्ष नसलें, तरी आपण त्याचें काम इमानइतबारें करणें. (३) त्याच्या मालमत्तेचें प्रामाणिकपणानें संरक्षण करणें. (४) त्याच्या सेवेला नेहमीं तत्पर असणें. (५) व त्यानें आपली चूक सुधारली, किंवा आपल्या अपराधाबद्दल तो बोलला, तर तें आपण मुकाट्यानें सहन करणें.

धन्याचीं चाकराविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) त्याला वेळच्या वेळेवर पगार देणें. (२) चांगली गोष्ट केल्याबद्दल त्याची पाठ थोपटणें. (३) त्याच्यावर दया करणें. (४) व त्याला चांगला कित्ता घालून देणें.

नवऱ्याचीं बायकोविषयीं मुख्य कर्तव्यकर्मे हीं आहेत—(१) तिच्यावर प्रेम करणें. (२) तिचा सांभाळ

करणें. (३) तिला सुख देणें. (४) व एकपत्नीव्रत पाळणें.

बायकोचीं नवऱ्याविषयीं मुख्य कर्तव्यकर्में हीं आहेत---(१) त्याच्यावर प्रीति करणें. (२) त्याच्या आज्ञेंत वागणें. (३) त्याला सुख देणें. (४) व आपलें पातिव्रत्य राखणें.

मित्रामित्रांचीं मुख्य कर्तव्यकर्में हीं आहेत---(१) परस्परांनीं परस्परांशीं प्रामाणिकपणानें वागावें. (२) परस्परांनीं परस्परांला गुह्य गोष्टी सांगाव्यात. (३)एकमेकांनीं एकमेकांवर विश्वास ठेवावा.(४)गरज पडल्यास एकमेकांनीं एकमेकांला मदत करावी. (५)अडचण आल्यास त्यांतून निघण्याची युक्ति सांगावी. (६ )अपराध झाल्यास ते कळवावेत. (७) व मैत्री ढळूं देऊं नये.

ज्या मनुष्यावर उपकार झाले असतील, त्याचें उपकार करणाऱ्या मनुष्याविषयीं मुख्य कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे त्याजविषयीं कृतज्ञताबुद्धि प्रगट करणें हें होय. कृतज्ञताबुद्धि प्रगट करण्याचे साधारण मार्ग म्हटले ह्मणजे दोन आहेत---(१) आपल्यावर ज्यानें उपकार केले असतील त्याचें बरें करण्याची जर संधि आली, तर ती त्यानें दवडूं नये हा एक मार्ग. (२) व ज्यानें आपणावर उपकार केले असतील त्याला 'तूं मजवर उपकार केले नाहींस' असें ह्मणूं नये हा दुसरा मार्ग. त्याचप्रमाणें एका मनुष्याची दुसऱ्या मनुष्यावर अतिशय प्रीति जडून प्रीतीच्या भरांत त्यानें जर दुसऱ्याचे दोष दाखविले, तर दुसऱ्यानेंही त्याजविषयीं कृतज्ञ असावें.

# परोपकार.

परोपकार या सदराखालीं येणाऱ्या कर्तव्यकर्मांचे दोन प्रकार आहेतः--(१) दुसऱ्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा असणें हा एक प्रकार. (२) व दुसऱ्याचें कल्याण व्हावें या हेतूनें एखादी गोष्ट करणें हा दुसरा प्रकार.

दुसऱ्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा ज्याच्या मनांत असते, त्याचा स्वभाव शांत असतो. दुसऱ्याचें दुःख पाहून त्याला कळवळा येतो. त्याचा उत्कर्ष होऊं लागला ह्मणजे त्याला आनंद होतो. त्याचा हेवा किंवा द्वेष तो करीत नाहीं. त्याचा सूड घ्यावा असें त्याच्या मनांत येत नाहीं. व त्याची निंदा करावी आणि आपण ऐट मिरवावी असें त्याला वाटत नाहीं.

दुसऱ्याचें कल्याण पांच गोष्टींनीं करितां येतें. पहिली गोष्ट अशी आहे कीं, दुसऱ्याच्या अन्तःकरणाला जेणेंकरून सुख होईल तें आपण करावें. उदाहरणार्थ, ज्याचे हाल चालले असतील, त्याला हालांतून सोडवावें. जो अशिक्षित असेल, त्याला शिक्षण देण्याची तजवीज करावी. जो वांकड्या मार्गानें चालला असेल, त्याला सरळ मार्ग दाखवावा. व ज्यानें चांगला उद्योग आरंभिला असेल, त्याला प्रोत्साहन द्यावें.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, दुसऱ्याच्या शरीराला जेणेंकरून सुख होईल, तें आपण करावें. उदाहरणार्थ,

जो भुकेनें व्याकुळ झाला असेल, त्याला पोटभर अन्न द्यावें. ज्याला थंडी वाऱ्यांत पांघरायला कांहीं नसेल त्याला अंगभर वस्त्र द्यावें. व हिव, ताप, इ० रोगांपासून ज्याच्या शरीराला वेदना होत असतील, त्याला औषधोपचार करावेत.

तिसरी गोष्ट अशी आहे कीं, आपल्या ज्ञातिबांधवांचें जेणेंकरून सुख वाढेल तें आपण करावें. उदाहरणार्थ, त्यांची संपत्ति वाढावी व त्यांची मालमत्ता सुरक्षित राहावी ह्मणून अन्तःकरणपूर्वक व आपल्या हातून होईल तितकी त्यांना मदत करावी. त्याचप्रमाणें जे अनाथ व गरिब आहेत, त्यांना दानधर्म करावा.

दान कारवयाचे वेळीं मुख्य पांच गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत (१) दान द्यावयाचें तें खुषीनें व आनंदानें द्यावें. (२) तें योग्यवेळीं करावें. (३) तें सत्पात्रीं द्यावें. (४) तें घेणाऱ्याला सुख होईल या रीतीनें करावें. (५) व तें आपल्या योग्यतेनुरूप करावें.

दुसऱ्याचें कल्याण करण्याची चवथी गोष्ट अशी आहे कीं, त्याच्या अब्रूचें रक्षण जेणेंकरून होईल तें आपण करावें. उदाहरणार्थ, एका मनुष्यानें कांहीं एक अपराध केला नाहीं, असें आपणाला पक्के ठाऊक असून जर कोणी त्याला अपराधी ठरविलें असेल, तर त्याच्यावर अपराधाचा खोटा आरोप आणिला आहे, असें आपण दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणें जे अपराध उघडकीला न आले तरी चालतील, ते अपराध विनाकारण आपण उघडकीला आणूं

नयेत; किंवा ज्या अपराधाबद्दल शिक्षा झालीच पाहिजे ते अपराध छपविण्याची आपण खटपट करूं नये.

पांचवी गोष्ट अशी आहे कीं, लोकांमध्यें वैमनस्य असल्यास त्यांच्यांत एकी व शांतता जेणेंकरून होईल ते आपण करावें. त्याचप्रमाणें त्यांच्या भांडणांचीं जीं कारणें असतील, तींही आपण नाहींशीं करून टाकण्याची खटपट करावी.

आपण नेहमीं दुसऱ्याच्या कल्याणाची इच्छा करावी व त्याकरितां रात्रंदिवस खटपटही करावी. आपल्याशीं जे चांगल्या तऱ्हेनें वागतात, त्यांच्याच कल्याणाची इच्छा करावी असें नाहीं; तर जे आपल्याशीं वाईट रीतीनें वागतात, त्यांचें सुद्धां कल्याण करावें अशी आपली इच्छा असली पाहिजे. त्याचप्रमाणें जे आपले मित्र आहेत, त्यांचेंच कल्याण व्हावें या हेतूनें एखादी गोष्ट करावी असें नाहीं, तर जे आपले शत्रु आहेत, त्यांच्यासुद्धां कल्याणाकरितां आपण झटलें पाहिजे.

दुसऱ्याच्या चुकीबद्दल तर आपण कधींही त्याला शिक्षा करूं नये, व शिक्षा करणें हा अन्याय आहे. कां कीं, प्रत्येक मनुष्य कैक वेळ आपलें कर्तव्य करण्याला चुकतो, आणि त्याबद्दल त्याला क्षमा मिळण्याची किती अवश्यकता आहे हें पाहिलें ह्मणजे दुसऱ्याच्या चुकीबद्दल त्याला शिक्षा न करितां क्षमा करावी, हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे.

सारांश, आपल्याप्रमाणें सर्वांवर प्रीति करणें; आपणांशीं दुसऱ्यांनीं जसें वागावें असें आपणाला वाटतें,

तसेंच आपणही दुसऱ्यांशीं वागणें; आईबापांवर प्रीति करणें, त्यांचा मान राखणें, व त्यांना मदत करणें; राजाविषयीं पूज्यबुद्धि बाळगणें, व त्याची आणि त्यानें नेमलेल्या अधिकाऱ्यांची आज्ञा पाळणें; शिक्षकाच्या आज्ञेंत वागणें; आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ असतील, त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि बाळगणें; कोणालाही कठोर भाषणानें न दुखविणें; सर्वांशीं खरेपणानें व न्यायानें वागणें; व कोणाचा हेवा किंवा द्वेष न करणें; चोरी किंवा चहाडी न करणें; खोटें किंवा अभद्र भाषण न बोलणें; नियमितपणानें, प्रामाणिकपणानें व पवित्रपणानें वागणें; दुसऱ्याच्या मालमत्तेचा लोभ न धरितां आपल्या श्रमानें व उद्योगानें आपला उदरनिर्वाह करणें; व ईश्वरानें ज्या स्थितींत आपणाला ठेविलें असेल त्या स्थितींत आपण सुख मानून राहणें, हीं आपलीं मुख्य कर्तव्यकर्में होत.

# उपसंहार.

मागील तीन भागांत, मनुष्याचीं मुख्य कर्तव्यकर्में कोणतीं आहेत, तीं सांगितलीं आहेत. तीं जो मनुष्य करील त्यानेंच आपलीं सर्व कर्तव्यकर्में बजाविलीं असें ह्मणतां येईल. एरव्हीं एक दोन कर्तव्यकर्में करून आपलीं सर्व कर्तव्यकर्में आटपलीं असें कोणालाही ह्मणतां येणार नाहीं. जो मनुष्य आपलीं कर्तव्यकर्में बजावील तोच, 'मनुष्य' या पदवीस पात्र होईल, व त्यालाच चिरकाल सुख मिळेल. शेवटीं, सर्व मनुष्यांना आपापलीं कर्तव्यकर्में बजाविण्याची स्फूर्ति द्यावी, व त्यांना चिरकाल सुखी ठेवावें, येवढीच जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

## नीतितत्त्वें.

किंमत २॥ आणे. ट० ह० ००६ पै.

पत्ताः—आप्पाजी विष्णु कुळकर्णी,
खरी, घोरपडे यांचा वाडा.
कोल्हापूर.

---

## विक्रीस तयार.

| | कि० ट० ह० | |
|---|---|---|
| पक्ष–पुष्प | ०४ | ००६ |
| मंजाबाई | ०२ | ००६ |

वरील दोन्ही नीतिबोधक पुस्तकें लहान मुलांच्या व मुलींच्या उपयोगासाठीं मुद्दाम तयार केलीं आहेत त्यांच्या चांगुलपणाबद्दल विद्वानांनीं आपापले योग्य अभिप्राय दिले आहेत. हीं पुस्तकें प्रत्येक मनुष्यानें एकदां तरी वाचावींच. पुस्तकें खालील पत्त्यावर विकत मिळतील.

पत्ताः–विनायक दत्तात्रय भिलवडीकर,
कोल्हापूर.

# तान्ह्या बालकांचें संगोपन.

सुलभग्रंथप्रसारक मंडळीनें

प्रसिद्ध केलें.

मुंबईंत,

सुबोधप्रकाश छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

किंमत अर्धा आणा.

३८२
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ३८२
ठाणें

# सूचना.

हा लहानसा पण फार उपयुक्त निबंध कांहीं वर्षांपूर्वीं ज्ञानदीप मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झाला होता. त्यांत थोडा फेरफार करून हल्लीं तो निराळा छापिला आहे.

यांत १ मूल उपजल्याबरोबरची त्याची व्यवस्था, २ त्यांचीं वस्त्रें, ३ स्वच्छता, ४ निद्रा, ५ पिणें, ६ दाई, ७ वरचें दूध, ८ अंगावरून तोडणें, ९ दांत येण्याचा क्रम व १० अफू देणें इतक्या १० गोष्टींचें म्हणजे लहान मुलांच्या संगोपनाच्या संबंधाच्या बहुतेक मुख्य गोष्टींचें सरळ व सोप्या अशा भाषेंत थोडक्यांत विवेचन केलें आहे. ज्ञानदीप मासिक पुस्तकांतील वैद्यक विषयावरील सर्व निबंध प्रसिद्ध विद्वान व सदय गृहस्थ डा० सदाशिव वामन काणे हे लिहीत असत, त्यांणींच हाही निबंध लिहिलेला आहे इतकें सांगितल्यावर यांतील विषयविवेचनाच्या योग्यतेविषयीं अधिक सांगावयास नको. माझे देशबांधव व देशभगिनी या निबंधाचा बालकांच्या संगोपनाच्या कामीं चांगला उपयोग करून घेतील अशी आशा आहे.

प्रकाशक.

---

शुद्धि—१२ व्या पृष्ठाच्या शेवटल्या ओळींत 'पुढें' असा शब्द आहे तेथें 'पुढचे' असा समजावा.

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

वाळवेकर आणि कंपनी, रामवाडी, मुंबई.
सुबोधप्रकाश छापखाना, गिरगांवरोड, मुंबई.
शिराळकर आणि कंपनी—बुधवारपेठ, पुणें.
कल्पतरु आफीस—सोलापूर.
जगदादर्श आफीस—अहंमदनगर.

—

Bapu Krishna
नं. १८

# तान्ह्या बालकांचें संगोपन.

**उपजल्या बरोबरची व्यवस्था**—आईची सुटका झाल्यावर सुईणीनें किंवा दुसऱ्या बाईनें पहिल्यानें मुलाकडे लक्ष्य पोहोंचविलें पाहिजे. नाळ कापल्यावर त्यास प्रथम साबण लावून ऊन पाण्यानें धुऊन काढावें, व अंग चांगलें कोरडें करून गरम वस्त्रांत गुंडाळून ठेवावें. राखलेलें नाळ हळू हळू कुजत जाऊन शेवटीं थोडे दिवसांतच बेंबी पासून गळून पडतें. कुजतें ह्मणण्यापेक्षां तें कोमेजतें ह्मणणे हेंच बरें. परंतु तें गळून पडण्यापूर्वी त्यास कुजल्याप्रमाणें घाण सुटते ती न सुटावी ह्मणून नाळ चांगल्या पिंजलेल्या स्वच्छ कापसानें गुंडाळून एका स्वच्छ धुतलेल्या कापडाचे तुकड्याला कात्रीनें, निखाऱ्यानें, किंवा दिव्यावर त्या नाळाच्या बेताचें भोंक पाडून तें त्याच्यांत ओंवून बेंबीचे भोंवतालीं बसवावें, आणि हें फडकें भिजलें ह्मणजे दुसरें तसेंच नवें करून बसवावें. कधीं कधीं असें होतें कीं, नाळ गळून पडल्यावर बेंबीचें तोंड उघडेंच रहातें व तेथें क्षत पडतें. असें न होऊं देण्यास फार जपावें. कारण ह्यापासून एकादे वेळीं बालकाचे जिवास धोका असतो. नाळ गळून पडल्यावर कांहीं दिवसपर्यंत मूल रडतांना बेंबी फुगून मोठी होण्याची भीति असते, तसें न व्हावें ह्मणून एका स्वच्छ रुमालाची आठ पदरी घडी करून ती बेंबीवर ठेवून तिच्यावरून सुमारें चार

बोटें रुंदीच्या फलाणीच्या किंवा दुसऱ्या ऊबदार वस्त्राच्या पट्टयाचें वेष्टण घालावें. बेंबीचा वर सांगितल्याप्रमाणें फुगा होऊंच लागला असला तर बारा किंवा सोळा पदरी घडी करावी अगर एक लहानशी उशीच करून त्यावर दाबून बसवावी.

**वस्त्रें**—बालकाचे चिरगुटपांघरुणाची व्यवस्था ऋतुमानाप्रमाणें असावी. मूल जन्मास आलें ह्मणजे त्याचे अंगांतील उष्णता अर्थात् एकदम कमी व्हावयाचीच. कारण तें आजपर्यंत आईचे पोटांत मोठ्या उबेंत होतें, ती ऊब आतां एकाएकीं नाहींशी झाली. आणि त्यांतून पुरें दिवस भरण्याचे पूर्वींच ( अपूर्ण गर्भपात ) मूल झालें असलें ह्मणजे तर असें होण्याची विशेष भीति असते, व एकादे वेळेस तर त्याचे जिवास धोका बसतो. कारण अशा मुलांचें रक्ताभिसरण मंद असतें. ह्मणून मुलाचे अंगाची उष्णता नेहमीं एकसारखी ठेवण्याचें मोठें अगत्य आहे, व ती राहाण्याची सोय फ्लानेल कापडाच्या वेष्टणानें फार चांगली होत्ये. त्यापासून दुसरा फायदा हा आहे कीं मलमूत्रादि अंगास फार वेळ लागलेलें राहिल्यानें त्या भागाचा दाह होतो तो ह्या कापडाचे शोषक गुणामुळें होणार नाहीं. परंतु मुलाला हात पाय मोकळेपणें हालवितां येतील अशा बेतानेंच त्याचे अंगावर चिरगुटें घालावीं. लोकांची अशी समज आहे कीं, डोकें नेहमीं आच्छादित असलें पाहिजे. परंतु ही चूक आहे. खरें म्हटलें ह्मणजे डोकें थंड ठेवावें; फारच झालें तर हलकीशी एक टोपी मात्र घालावी. परंतु अंगाला व पायाला चांगली ऊब राहील अशी

लांब रुंद चिरगुटें घालावीं, व अपूर्णकाळीं झालेल्या मुलाचे पाय तर कांहीं दिवसपर्यंत कापसांत गुंडाळून ठेवावे.

**स्वच्छता**—मुलाचे संबंधानें जेवढा निर्मळपणा ठेवावा तेवढा थोडा. मलमूत्रानें भरलेलीं चिरगुटें वारंवार बदलावीं. ह्या गोष्टींत आळस झाला ह्मणजे कुल्यावर व जांघेवर चट्टे पडतात. सबब हे भाग नेहमीं कोरडे लखलखित ठेवीत जावे. मुलास रोज एकदां किंवा दोनदां पाणी घालावें. परंतु वारंवार ऊन पाणी घातलें असतां तोटा आहे. तो हा कीं मुलाला ग्लानी येते. मूल अशक्त असल्यास त्याचें अंग ऊन पाण्याच्या बोळ्यानें नुसतें लवकर पुसून मात्र घ्यावें आणि दोन किंवा तीन दिवसांआड न्हायाला घालावें. हवा व उजेड हीं जशीं झाडाच्या रोपाला पाहिजेत तशींच तीं लहान मुलासही पाहिजेत. परंतु पहिल्यानेंच फार उजेड कामाचा नाहीं. तर पहिल्यानें सौम्य व बेताचाच उजेड असला पाहिजे. मग पुढें जसजशी मुलाला त्याची संवय होत जाईल तसतसा तो अधिकाधिक खोलींत सोडावा. तसेंच हवा चांगली पाहिजे ह्मणून वाऱ्यांत मूल उघडें ठेविलें तर तसेंही चांगलें नाहीं. सर्व बेताचें पाहिजे. मूल पंधरा दिवसांचे आंत घरा बाहेर काढूं नये. पण पंधरा दिवस झाल्यावर ऋतुमानाप्रमाणें त्याच्या अंगावर चिरगुटें घालून दर रोज त्यास खुल्या हवेंत घेऊन फिरवावें. उघड्या हवेंत मूल फिरविलें असतां त्याची शरीरप्रकृति निरोगी राहून अंगापिंडानें तें चांगलें होतें.

**निद्रा**—उपजल्यापासून पुढें कांहीं दिवसपर्यंत मुलांचा

रात्रीं व दिवसाचा बहुतेक वेळ झोंपेंतच जातो. कित्येक मुलें दिवसभर एकसारखीं निजून रहातात व रात्रीं जागीं असतात. दिवसां उठलींच तर पिण्यापुरतीं तेवढीं उठतात. ही खोड मोडण्यास फारसे प्रयास पडत नाहींत. मुलास दिवसां कांहीं वेळ जागें ठेवावें, नाहीं तर त्यास सकाळीं न्हायास घालायाचें तें रात्रीं घालावें म्हणजे झालें. त्यास दर रोज हवा खायास नेल्यानेंही त्यास रात्रीं झोंप लागते. तें रात्रीं निजल्यानें आईस झोंप व विश्रांति मिळून मुलास पाजायास तिच्या अंगावर दूध येतें.

**पिणें**—मूल उपजल्यावर कांहीं वेळानें त्यास आईनें प्यावयास द्यावें. आपणांत जी समज आहे कीं, पहिलें कोंवळें दूध मुलास पाजूं नये; निदान दोन दिवस तरी लोटूं द्यावे; ती खोटी आहे. मूल उपजल्यावर सुमारें एकदोन तासांचे आंतच त्यास आईनें पाजूं लागावें, हें मुलास व आईस दोघांसही हितकर आहे. मुलाचे पोटांत सांचलेला काळसर कीट आईचे कोंवळे दुधानें साफ निघून जाऊन एरंडेल वगैरे देण्याचें कांहीं कारण रहात नाहीं. कित्येक लोकांत पहिले दोन दिवस मुलास नुसत्या गूळपाण्यावर ठेवण्याचा प्रघात आहे, तो मुलास मोठा अपायकारक आहे. ह्या पहिले दोन दिवसांत आईचें दूध पाजणेंच नसेल तर गाईचें दूध व पाणी हीं दोन्हीं, दूध चांगलें असल्यास सम भाग, चांगलें नसल्यास दोन भाग दूध व एक भाग पाणी एके ठिकाणीं मिळवून त्यांत फारच थोडी साखर घालून मुलास पाजीत जावें ह्मणजे बरें.

आईनें आपलें मूल आपण पाजावें हें चांगलें हें

आपल्या लोकांस सांगण्याचें कांहीं कारण नाहींच. आतां न पाजण्यास तशाच कांहीं अडचणी असल्या तर ती गोष्ट निराळी. ह्यापासून आई व मूल ह्या उभयतांचें कल्याण आहे. आईचा वेळोवेळ गर्भधारणाचा त्रास चुकतो व मुलाचें पोषण चांगलें होतें. मुलास पाजणें तें नियमित वेळीं पाजावें. प्रथम दोन दोन तासांनीं व मग ४ तासांनीं पाजीत जावें. ह्या मधले वेळेंत स्तनांत दूध पुन्हा येतें, व आईस झोंप मिळून दूध सदोष होत नाहीं व मुलाची पाचकशक्तिही उत्तम रहाते. मूल रडूं लागलें कीं त्यास पिण्यास, देऊं नये. असें केल्यानें मुलास अजीर्णादि विकार हटकून होतात व नाना तऱ्हेचे बाळपणीं जे अपाचनामुळें विकार होतात ते सर्व ह्यामुळेंच.

दाई—आईनें स्वतः आपलें मूल आपण पाजावें असें वर सांगितलें आहे खरें, परंतु अनेक अडचणीमुळें कित्येक प्रसंगीं तसें करतां येत नाहीं. असें कांहीं झाल्यास मुलासाठीं एक चांगली दाई ठेवावी. मुलास योग्य दाई मिळविणें हें मोठें अगत्याचें काम आहे. कारण मुलाचें सर्व भावी जीवित ह्यावर अवलंबून असतें. तेव्हां दाई पहातांना जेवढी खबरदारी ठेववेल तेवढी ठेविली पाहिजे. केवळ दुधाचें वैपुल्य किंवा त्याचा दाटपणा हें चांगल्या दाईचें लक्षण नव्हे. दुसऱ्या पुष्कळ लक्ष्य देण्याजोग्या गोष्टी आहेत. त्या मुख्यत्वेंकरून तीन आहेत. प्रथमतः तिची शरीरप्रकृति, दुसरी तिची स्थिति, व तिसरी तिचें वय. तिची शरीर प्रकृति निरोगी असली पाहिजे, हें सांगणें नकोच. कारण तिचे विकार

मुलाला तेव्हांच लागतात. कित्येक वैद्यांचें म्हणणें असें आहे कीं, दांतांच्या परीक्षेवरून तिच्या प्रकृतीचें बरोबर मान काढितां येतें. परंतु हें सर्वस्वीं विश्वसनीय नाहीं. तरी एवढें खरें कीं, पुढचे दांत नासलेले असले किंवा कीड लागून पडून गेले असले तर ती दाई वर्जच करावी. तिला कांहीं उपदंशजन्य रोगाचीं लक्षणें आहेत कीं काय, कांहीं त्वग्रोग ह्मणजे कुष्टरोग वगैरे, तसेच रक्तविकार, क्षय, अपस्मार वगैरे कांहीं आहेत कीं काय, ह्याची यथायोग्य चौकशी केल्यावांचून दाई ठेवूं नये व ह्याची योग्य चौकशी करणें असेल तर ती वैद्याकडूनच करवावी. उपदंशादि रोग तीस आहे कीं काय ह्याविषयीं फार सावध असलें पाहिजे, व तो तिला आहे किंवा नाहीं हें वैद्याकडूनच निश्चितपणें ठरेल. नंतर तिच्या स्तनांस कांहीं विकार आहे कीं काय इकडे अवश्य लक्ष्य पुरविलें पाहिजे. त्यांत दूध चांगलें विपुल आहे किंवा नाहीं, त्याला बोंडशी चांगली आहे किंवा नाहीं, त्यावर कांहीं व्रण किंवा भेगा आहेत कीं काय, हें सर्व लक्ष्यपूर्वक पाहिलें पाहिजे. बोंडशी जर चांगली नसली व दूध पुष्कळ असलें तर कांहीं उपयोग नाहीं. कारण ती असल्यावांचून मुलाला स्तनपान करितां यावयाचें नाहीं. केवळ एवढ्या कारणानेंच एकादे वेळेस मुलाची उपासमार होत असते. त्याला दूध ओढतां येत नाहीं. तसेंच स्तनावर कांहीं भेगा किंवा चिरा पडल्या असल्या तर मुलास त्या दाईकडून पोटभर दूध मिळायाचें नाहीं. कारण मूल दूध ओढूं लागलें कीं ती जागा

त्यावर ओढ बसल्यामुळें तडतडेल, व अर्थातच ती आपलें अंग चोरील. तिचें वय म्हटलें म्हणजे १८ पासून ३० इतकें असलें म्हणजे उत्तम. आणि जर साधेल तर समकालीं प्रसूत झाली असेल म्हणजे मुलाचे आई इतके दिवस जिला बाळंत होऊन झाले असतील तिला ठेवावें. परंतु अशीच दाई सांपडणें कठीण. म्हणून मागाहून जी बाळंत झाली असेल अशी ठेवावी. दाईचें मूल स्वतः पाहिल्यावांचून तीस ठेवूं नये. कारण तें जर चांगलें पोसलें असलें तर तिचें दूध चांगलें निरोगी असें समजायचें. दाईचा स्वभाव चांगला पाहिजे. ती रागीट, कुरठी, कुमार्गी असूं नये. शिवाय तिच्या खाण्यापिण्याचा चांगला बंदोबस्त ठेविला पाहिजे. साधारण अशी समज आहे कीं मूल चांगलें पोसावें म्हणून तिला जेवढें उंचें खाणें देववेल तेवढें द्यावें. अशा समजुतीनें तिला यथेच्छ खाऊं पिऊं देतात. परंतु ही मोठी चूक आहे. ज्यांचा सर्व जन्म साध्या जाड्या भरड्या अन्नावर गेला आहे व ज्यांची तनु अशाच अन्नानें पोसली आहे त्यांस एकाएकीं उंचें अन्न खाण्यास दिलें तर त्याचा परिणाम अनिष्ठ झाल्यावांचून रहाणार नाहीं. तिची स्वतःची प्रकृति बिघडेल किंवा ती न बिघडली तर तिचें दूध फार कसदार होऊन मुलास बाधक होईल. त्याला अजीर्ण होईल. ह्मणून तिचें जेवण साधें व पोटभर असावें ह्मणजे झालें.

मूल स्वभावतःच अंगावर प्यावयास घेतल्याबराबर पिऊं लागतें. एवढेंच नव्हे तर वारंवार असें पाह-

ण्यांत येतें कीं, प्रसूतीकाळीं नुसतें डोकेंच बाहेर आलें असून सर्व धड आईच्या उदरांत असतांही मूल सुईणीचें बोट चोखूं लागतें. परंतु एकादे वेळेस त्याला पितां येत नाहीं. याचीं कारणें दोन असतात. एक तर हें कीं वर सांगितल्याप्रमाणें स्तनाला जशी तोंडांत धरून ओढण्या जोगी बोंडशी असावी तशी नसते. किंवा ती यथास्थित असून मूल निःशक्त असल्यामुळें त्यास दूध ओढण्याची शक्ति नसते. पहिली अडचण असल्यास ती सहज दूर करितां येईल. आईनें स्वतः किंवा सुईणीकडून स्तन ओढवावे किंवा एकाद्या चांगल्या सशक्त मुलाला पिण्यास द्यावें. अथवा एखादी सोडावाटरची रिकामी बाटली घेऊन त्यांत थोडासा कांपूस पेटवून सोडावा व लागलीच बाटलीचें तोंड स्तनावर बसवावें ह्मणजे त्यावर कांहीं वेळ ओढ बसून ती बोंडशी वर येईल. मग ती पुनः बसूं देऊं नये. वारंवार ओढून ती वाढवावी. मूल ( बहुशः अपूर्ण गर्भ असल्या कारणानें ) निःशक्त असल्यामुळें त्यास पितां येत नसल्यास आईनें त्याच्या तोंडांतच स्तन हळूच पिळावें ह्मणजे चांगलें. बोंडल्यांत दूध पिळून काढून पाजणें चांगलें नाहीं.

एखादे वेळेस असें होतें कीं बराच वेळपर्यंत मुलास लघवी होत नाहीं. असें झाल्यास बेंबीचे खालचे भागावर थोडेंसें थंड पाणी लावावें नाहीं तर चमचाभर पाजावें, ह्मणजे लघवी सुटेल.

**वरचें दूध**—गरीबी स्थितींत दाई ठेवण्याचें सामर्थ्य नाहीं आणि मुलाचे आईचे अंगावर तर दूध नाहीं किंवा

असून तें मुलास मानवत नाहीं. अशा ठिकाणीं काय करावें ? अशा ठिकाणी मुलाचा निर्वाह वरच्या दुधानें झाला पाहिजे एवढ्यासाठीं जोंपर्यंत होईल तोंपर्यंत वरचें दूध आईचे दुधाचे सारखें तयार करण्याकडे लक्ष्य दिलें पाहिजे. पुष्कळसें मनुष्याचे दुधासारखें दूध ह्मटलें ह्मणजे जनावरांत गाढवीचें किंवा बकरीचें. परंतु हें मिळण्याची सोय नसल्यास गाईचें किंवा ह्मशीचें दूध द्यावें लागतें. ह्या दोहोंत निवड करणें झाली तर गाईचे दुधाची बनेल तोंपर्यंत करावी. कारण ह्मशीचें दूध गाईचे दुधापेक्षां कमदार ज्यास्त असतें. तरी गाईचें दूधही नुस्तें देणें चांगलें नाहीं. लहानपणचे पुष्कळसे अजीर्णादि विकार ह्यामुळेंच होतात. मुलांचें पोट फुगतें व दुखतें. त्यांस अतिसार व आमांश होतो. व दूध अंगीं न लागल्यामुळें दिवसें दिवस तीं कृश होत जातात. स्त्रियांच्या व गाईच्या दुधांतला भेद खालच्या कोष्टकावरून सहज लक्ष्यांत येईल. ह्यांत १००० भागांची वांटणी दाखविली आहे.

| | पाणी भाग. | घन अंश भाग. | पैकीं साखर |
|---|---|---|---|
| स्त्रियाचें दूध... ...... | ८८९.०८ | ११०.९२ | ४३.६४ |
| गाईचें दूध ......... | ८६४.०६ | १३५.९४ | ३८.०३ |

ह्यावरून सहज समजतें कीं स्त्रियाचे दुधांत गाईचे दुधापेक्षा पाण्याचा अंश ज्यास्त आहे. तसाच साखरेचाही आहे. तेव्हां अर्थात् गाईचें दूध देतांना त्यांत पाण्याचा व साखरेचा अंश जास्त करून तें दिलें पाहिजे. गाईचें चांगलें खावीचें व ताज्यांतलें दूध असलें तर त्या दुधाचे बरोबरीनें पाणी मिळवावें. परंतु तसें नसल्यास सुमारें तिसरा हिस्साच घालावें. पाणी

घातल्यावर थोडीशी पिठी साखर घालावी. मिळाल्यास दुधांतली काढलेली साखर असते ती घालावी व असें तयार केलेलें दूध ऊन करून पाजावें. नुसतें चमच्यानें पाजण्यापेक्षां दूध पाजण्याच्या बाटलीनें पाजणें हें चांगलें. परंतु बाटलीची जपणूक चांगली राहिली पाहिजे. दूध पाजणें झाल्याबरोबर ती ऊन पाण्यानें निर्मळ धुवावी. तींत किंवा रबराचे नळींत किंवा बोंडशीचे तोंडाशीं दुधाची साय किंवा गोठलेलें दूध राहिलें तर तेव्हांच नासतें व दुसऱ्यानें दूध पाजतांना तें मुलाचे पोटांत गेलें तर त्याला अपकार होतो ह्मणून वारंवार बाटली स्वच्छ करून निर्मळ ठेवावी.

**अंगावरून तोडणें**—मुलास आईच्या अंगावरून तोडणें ह्मणजे त्याच्या आयुष्याचा एक मोठा आणीबाणीचा प्रसंग असतो आणि अर्थातच त्यापासून त्याच्या प्रकृतींत थोडी बहुत चलबिचल होत असते. असें करितांना बहुत करून आईच्या प्रकृतीच्या धोरणानें चालावें लागतें. तिची प्रकृति जर चांगली नसली ह्मणजे मुलास पाजून ती दिवसें दिवस क्षीण होत चालली असली तर मागें पुढें न पाहतां मुलास जेवढें लवकर अंगावरून तोडवेल तेवढें लवकर तोडावें. परंतु अशी जर कांहीं अडचण नसली ह्मणजे आई जर चांगली सशक्त असली तर मुलाला अंगावरून तोडण्याचा योग्य काल कोणचा ह्याचा अवश्य विचार केला पाहिजे. आपल्यांत बहुतकरून अशी चाल आहे कीं, आई फिरून गरोदर राहीपर्यंत ती मुलास पाजते. निदान गरीब लोकांत तरी हा प्रकार आढळतो. परंतु अशानें

मुलाचें व आईचें दोघांचेंही अकल्याण होतें. कारण सुमारें आठ दहा महिनें झाल्यानंतर आईचें दूध निःसत्व होत जातें. मुलाचें पोषण होण्यास जे त्यांत पदार्थ पाहिजेत ते कमी होत जातात. त्यामुळें अर्थात् मूल चांगलें पोसत नाहीं एवढेंच नाहीं, तर तें उलटें रोगी होतें. शिवाय आईचा तोटा असा होतो कीं ती अशक्त होते. आपल्या शरीरांत जेवढे ह्मणून रस उत्पन्न होतात तेवढ्याचें रक्त हें उत्पत्तिस्थान होय. त्यापासून शरीरांतील सर्व धातु उत्पन्न होतात. दूधही रक्तापासून उत्पन्न होतें. जिच्या अंगांत रक्त पुष्कळ तिला दूधही पुष्कळ. जिला रक्त थोडें तिला दूधही थोडें. मूल जसजसें मोठें होत जातें तसतशी त्याची भूकही वाढत जाते. अर्थात् त्याला दूध दिवसें दिवस ज्यास्त लागणार. आईचें दूध कांहीं काळानंतर घटत जातें व निःसत्व होतें ह्मणजे मुलाला जों जों ज्यास्त व कसदार दूध लागणार तों तों हिचें कमी व सत्वहीन होणार. अशा स्थितींत मूल अंगावर पीतच राहिलें तर तें पोट भरण्यासाठीं वारंवार पीईल. ज्या ज्या मानानें तें ज्यास्त पीईल त्या त्या मानानें आईचें रक्त घटेल व ती अशक्त होईल हें आतां सांगणें नकोच.

आई चांगली निरोगी व सशक्त असल्यास मुलास पहिल्या सहा महिनेंपर्यंत अंगावरचे दुधाखेरीज कांहीं देऊं नये. पण झोंपमोड न व्हावी ह्मणून निजण्यापूर्वीं एकदम ज्यास्त प्यावयास देणें हें मुलास फार अहितकारक आहे. ही पद्धति अवश्य मोडून टाकिली पाहिजे. मूल अंगावरून तोडण्यापूर्वीं त्यास

वरचें दूध किंवा अन्न खाऊं घालूं लागावें. असें केल्यानें त्यास हळू हळू अन्न खाण्याची संवय होत जाते व अंगावरचें दूध एकदम पाजण्याचें बंद केल्यानें एरव्हीं जी त्याची उपासमार होते, ती होत नाहीं. व त्याचा व आपला पुष्कळ त्रास चुकतो. रडूं वगैरे फारच लागलें तर दोन किंवा तीन दिवस रडेल. पुढें रडणार ओरडणार नाहीं. मूल अंगावर पिण्याचें बंद झालें ह्मणजे पुष्कळांस स्तनांत दूध सांचल्यामुळें फार त्रास व एखादे वेळेस अपायाहि होतो, ह्यासाठीं सौम्य रेचकें घ्यावीं अथवा स्तनावर थंडपाण्याची घडी भिजवून ठेवावी व द्रव पदार्थ खाण्याचे जितके कमी करवतील तेवढे करावेत.

आतां मुलाचें अंगावरचें दूध तोडतांना आईच्या प्रकृतीच्या धोरणानें जसें चालावें लागतें तसेंच मुलाच्या प्रकृतीचेंही धोरण ठेवावें लागतें. त्याची प्रकृति चांगली निरोगी असली तरच त्यास अंगावर पाजण्याचें मना करावें. त्यास ताप, पडसें, खोकला वगैरे विकार असतांना कधींही अंगावरून तोडूं नये. असें केल्यानें त्यास हटकून अपाय होतो. ह्मणून त्यास दुखणें वहाणें कांहीं नाहीं अशी संधी पाहून त्याचें अंगावरचें दुध मना करावें. मूल एरव्हीं जरी निरोगी असलें तरी त्याचे दांत फुटतांनां ते त्यास थोडे बहुत तरी नडतात. तेव्हां बहुत करून असा नियम ठेवावा कीं पुढले दांत सारे येऊन गेले ह्मणजे मग मूल अंगावरून तोडावें. मूल सशक्त, अंगापिंडानें बळकट असल्यास पुढचे दांत ७ पासून १० महिन्यापर्यंत सर्व बाहेर पडतात. व पुढें मागचे दांत

येईपर्यंत दोन तीन महिन्यांचा अवसर सांपडतो. कारण पुढल्या दाढा बहुत करून १२ व्या महिन्यांत बाहेर पडूं लागतात. तेव्हां ह्या मधल्या दोन महिन्यांत मूल दुखण्यावांचून असतें. ह्मणून ही संधी फार चांगली असें पुष्कळ वैद्यांचें ह्मणणें आहे. मूल निरोगी व आई निरोगी अशी असल्यास १० व्या महिन्यांत मुलांचें अंगावर पिणें बंद करावें असा साधारण नियम घालून देतां येतो. तरी तो अबाधित आहे असें कधींही समजूं नये. कारण दांत येण्याची तरी एक वेळ अशी कोठें आहे ? कोणास पुढचे दांत ७ वे महिन्यांत येतात. कोणास १०।१२ वे महिन्यापर्यंत येत नाहींत. तेव्हां वर सांगितला हा साधारण नियम समजावा. ह्यांत कमी ज्यास्त करणें मुलाच्या व आईच्या प्रकृतीच्या आधीन आहे.

**दांत येण्याचा क्रम**—मूल सशक्त व निरोगी असलें तर बहुत करून ७ वे महिन्यापासून दांत येण्याचा आरंभ होऊन मूल २॥ वर्षांचें होतें तों त्यांची अखेर होते. आतां हे दांत २० असून त्यांचा येण्याचा क्रम बहुशः असा असतो. प्रथम खालचे समोरचे मधले दोन दांत ७ वे महिन्यांत येतात. त्यांचे मागून वरचे समोरचे मधले येतात. मग वरचे समोरचे बाजूचे. मग खालचे समोरचे बाजूचे. त्यांच्या मागून बहुत करून खालच्या पहिल्या दाढा. एखादे वेळेस ह्या आधीं येतात. नंतर वरच्या पहिल्या दाढा. मग खालचे सुळे. त्यांच्या मागून वरचे सुळे. त्यानंतर खालच्या मागच्या दाढा. व सर शेवटीं वरच्या मागच्या दाढा. ह्या क्रमानें बहुत करून दुधाचे दांत येतात. हे दांत येत असतां मुलाच्या प्रकृतींत पुष्कळ चलबिचल होते. त्यास अनेक विकार

होतात. पण त्यांचें वर्णन देऊनत्यांवर उपचार सांगावें तर तो एक निराळाच निबंध होईल ह्मणून त्यांविषयीं एथें सांगतां येत नाहीं.

**अफू देणें**—मुलांस झोंप लागावी ह्मणून आमच्या लोकांत आया व दाया त्यांस अफू देत असतात. तिला त्या बाळगोळी असें ह्मणतात. पण ही चाल अगदीं वाईट आहे. अफूनें मुलांस झोंप लागते खरी, पण तिच्यापासून मुलांस दुसरे अनेक विकार होतात. ह्मणून मुलांस ती कधींही देऊं नये. मूल रडूं लागलें तर त्यास मोकळ्या हवेंत हिंडवावें ह्मणजे तें रडावयाचें बंद होतें. त्याच्या पोटांत वगैरे दुखत असून तें रडत असलें तर त्याला दुसरे योग्य उपचार करावे पण अफू देऊन त्याला निजवूं नये. अफू देऊं नये त्याप्रमाणें दुसराही मादक पदार्थ कधीं देऊं नये.

G. S. Tarkhad.

owner.

मालक गणपत शीतिवाल

तर्खडकर [illegible] आहे

॥ श्री ॥

॥ पुंडलीकवरदाय नमः ॥

# हंसक्षीर न्याय
## अथवा
# शिष्टपरीक्षण व भ्रष्टनिर्णय.

हा निबंध

जगन्नाथ अंतोबा निर्गुडे, कोंकणस्थ नामदेव शिंपी,

यांनीं

हिंदु ज्ञातिहितार्थ रचून.

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापविला.

श्रीपुंडलीकवरद पांडुरंगचरणीं अनन्य भक्तीनें अर्पण केला

संवत् १९४८ शके १८१३ माहे माघ खरनाम संवत्सरे.

सन १८९२ इसवी.

किंमत ६ आणे.

॥ श्री ॥

पुंडलीकवरदाय नमः

# प्रस्तावना.

आमचे ज्ञातीची एक विवाहित स्त्री थोडे दिवसांवर आपल्या बापाच्या घरांतून चोरी करून, इस्राएल जातीच्या एका यवनाच्या घरीं कितिएक दिवस दडून राहिली होती- तीस पकडल्यावर पोलिसांत चौकशी होऊन तीस दोन महिन्याच्या ठेपेची सजा झाली होती, ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध झालीच आहे. ही स्त्री जेव्हां तुरंगांतून सुटली, तेव्हां तिच्या बापानें ज्ञातीस विचारल्यावांचून तीस आणून आपल्या घरांत ठेविलें. यवनाबरोबर गेल्यामुळें ती यावद्देह पावन होणार नाहीं, असें हिंदूधर्माप्रमाणें जातिमर्यादा पाळणारे आबालवृद्ध जातींचें ह्मणणे आहे; परंतु या मर्यादेची परवा न धरणारे असे कित्येक असामींनीं आपलीच सभा भरवून तींत जे ठराव पसार केले, त्यांपैकीं एक ठराव तीस पावन केल्याचाही केला आहे. त्यावरून प्रस्तुतचा निबंध लिहिण्याचें प्रयोजन पडलें.

आलीकडे आमचे सर्व जातीचे हिंदुलोकांत शिष्ट-भ्रष्टांची इतकी मिसळ होऊन गेली आहे कीं, हरएक जातींत बंदोबस्त होण्याचे कामांत त्यामुळें अतिशय हरकत पडते. ही अडचण कांहीं अंशीं दूर व्हावी, ह्मणून हंसक्षीर न्यायानें त्यांस वेगळें वेगळें करून दाखविण्याचा प्रयत्न या निबंधांत केला आहे; ह्मणून या निबंधास "**हंसक्षीर न्याय; अथवा शिष्टपरीक्षण व भ्रष्टनिर्णय**" या नामाभिधानाची योजना केली आहे. हा प्रयत्न या निबंधांत कोठपर्यंत सिद्ध झाला आहे हें ठरविणें विद्वज्जनांकडे आहे, ह्मणून तो अतिनम्रतेनें त्यांपुढें सादर करण्याचें धैर्य केलें आहे. विद्वान लोकही हंसक्षीरन्यायानें केवळ व्याकरणाचे व शुद्धाशुद्धांचे दोषांकडे विशेष लक्ष न देतां, मजकुरावर दृष्टि ठेवून आपले रास्त अभिप्राय देतील अशी त्यांस करद्वय जोडून प्रार्थना आहे.

मुक्काम मुंबई
माहे मार्गशीर्ष व. ११
सवंत १९४८.

अतिनम्र व आज्ञांकित सेवक,
निबंधकार.

संपूर्ण मजकूर वाचकांचे ध्यानांत यावा ह्मणून या संबंधानें ज्ञातींत प्रसिद्ध झालेले पत्रव्यवहार, सभेचीं आमंत्रणें, सूचनापत्रें, परस्पर सभेंत आमनेसामने झालेले ठराव, या सर्वांच्या नकला प्रस्तावनेपुढें जोडल्या आहेत.

---

## कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळीस विज्ञापना.

॥ स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ॥
॥ आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

अर्थः–( श्रीरामचंद्रजी ह्मणतात ) स्नेह, दया, सौख्य, इतकेंच नाहीं तर निदान लोकसंतोषाकरितां जानकीचादेखील त्याग करावा लागला तरी मला खेद वाटणार नाहीं.

### !! प्रिय ज्ञातिबांधवहो ! लक्षपूर्वक वाचा !!

धर्म ही चीज जीवापलीकडे प्यारी आहे, धर्मासारखी महत्त्वाची बाबत दुसरी कोणती नाहीं. धर्म सर्व सौख्याची खाण. अब्रु, नीति, वैभव, इतकेंच नाहीं तर सर्वस्वी मनुष्यांचें इह व पारलौकिक कल्याण धर्मनिष्ठेवरच अवलंबून आहे. धर्ममर्यादा पाळून जुटीनें समाजाची उन्नति करावी ह्याच पायावर "जात" ही इमारत उभारली आहे. धर्मसंरक्षण हें सर्व जातींनीं मुख्य बंधन मानलें आहे; इतर बंधनें सैल झालीं असतां चालतील, परंतु धर्मभ्रष्ट करणारें आचरण व तेंही प्रसिद्धपणें कोणाच्या हातून घडलें असतां जातीची बेपर्वाई करणें, हें कोणासही खपणार नाहीं. आपणांस विदितच आहे कीं, आपले ज्ञातिबंधु रा. रा. गोपीनाथ

दादाजी यांची ज्येष्ठ कन्या "सुंदरा," हिनें चोरीच्या गुन्ह्याबद्दल दोन महिने तुरुंग भोगून, हल्लीं बापाच्या घरीं राहिली आहे. कोणत्या कारणानें तिनें चोरी केली हें सर्व आबालवृद्धांस महशूर आहे. रा. रा. गोपीनाथ जीनें जातीची परवानगी न घेतां तिला आपल्या घरीं आणून ठेविली ह्यांत जातीचा अपमान झाला नाहीं काय? व हा उघड झालेला जातीचा अपमान आमच्या वडिलोपार्जित अधिकारसंपन्न मानकऱ्यांनीं निमूटपणें सहन करून त्याचा योग्य विचार करण्याकरितां जातीची सभा भरविण्यांत आपले पाय मागें काढून घ्यावे ही किती शोचनीय स्थिति बरें!!! एखाद्या गरीबाच्या हातून असा उपमर्द घडला असतां त्याची कोणती वाट केली असती हें आजपर्यंत पंचायतींत झालेल्या निकालांवरून सर्वांच्या लक्षांत येऊन चुकलेंच आहे. ह्या प्रकरणीं जातींतील कित्येक सुज्ञ व होतकरू गृहस्थांनीं मानकऱ्यांबरोबर केलेला पत्रव्यवहार आपणांस विदित करावा व जातीसंबंधीं माझें उचित कर्तव्य बजावावें ह्या हेतूनें छापून प्रसिद्ध केला आहे, तो अवश्य वाचून प्रिय ज्ञातिबांधवहो! लवकरच मानकरी सभा भरीत नसल्यास आपणांमधून कांहीं सुधारणेच्छु व जात्याभिमान बाळगणाऱ्या गृहस्थांनीं ह्या वेळीं पुढें होऊन सभा भरावी व सदरील गोष्टीचा, तसेंच मानकऱ्यांच्या मान-

पनाचा विचार करावा अशी मी त्यांस शिफारस करितों. एखादी मानकऱ्याची, ट्रस्टीची, अथवा चिटणिसाची जागा मिळविण्याकरितां किंवा व्यवस्थापक मंडळींत सभासद होऊन ऐट मारण्याकरितां जसें तन, मन, धनेंकरून झटतां तसेंच ह्या वेळीं कंबर बांधणें तुमचें कर्तव्य नव्हे काय ? केवळ फंडापुरताच विचार करून अधिकार मिरविण्यांत प्राणापलिकडे प्रयत्न केल्यानें, अगर " फंड आहे तोंपर्यंतच आह्मीं, " असें प्रतिपादन-करून ज्ञातीची सुधारणा होणार नाहीं. ज्या दुर्वृत्त चालीरीतींनीं जातीचें दुर्लौकिक होत आहे अशा चाली-रीति एक जुटीनें बंदकरून, ज्ञातिसमाजावर खर्चाचा बोजा लादणारी एखादी नवीन टूम किंवा चाल कोणीं अमलांत आणूं इच्छिणारास योग्य शासन करणें; तसेंच जातीस कलंक लागणारें आचरण कोणाच्या हातून घडून तें उघडकीस आलें असतां त्याचा पंचायतींत योग्य विचार व्हावा, व धर्मसंबंधीं शिथील झालेलीं बंधनें देशकालवर्तमान ह्यांस अनुसरून दृढ करावीं इत-क्याच व्यवस्थांची तूर्त आपणांस गरज आहे, व त्या करण्याकरितां सर्वांनीं एकमतानें झटावें ह्यांतच लौकिक वैभव, मानकरीपणा, ट्रस्टीपणा, चिटणिसी व जातीचें हित आहे. शेवटीं वर निर्दिष्ट केलेल्या श्रीरामचंद्रजींच्या

उक्तीकड सर्व ज्ञातिबांधवांनीं व मुख्यत्वेंकरून रा० रा०
गोपीनाथजीनें लक्ष पुरवावें ही विनंति.
ता० २९ आकटोबर सन १८९१.

आपला ज्ञातिबांधव,

नारायण भाई बर्वे.

ताजाकलम.—हें पत्र छापत असतां जातींतील कित्येक वयांत आलेल्या अशा १०० वर गृहस्थांनीं मानकऱ्यांस केलेला लेखी अर्ज माझ्याजवळ आला आहे व तो लवकरच मानकऱ्यांस रवाना करण्यांत येईल.

---

"पत्रव्यवहार"

रा. रा. मोरोबा बाळाजी शेट गुर्जर,
" " नानाभाई विश्वनाथ शेट सदावर्ते,
" " पांडुरंग कृष्णाजी शेट भोजने,
कोंकणस्थ नामदेव शिंपी जातीचे मानकरी यांसः—

**महाराज,**

आपले जातिबंधु रा. रा. गोपिनाथ दादाजी सारंगधर यांची कन्या सुंदराबाई, मयत तुळाजी फकीरजी ढगे यांचे नातु हरि नारायण, ह्यांची लग्नपत्नी, हिनें बापाचे १४०९ रुपये किमतीचे दागिने चोरल्याबद्दल येथील गिरगाम पोलिस कोर्टाचे माजिस्ट्रेट साहेब

डब्ल्यु, आर, ह्यामिल्टन यांनीं दोन महिन्यांची सक्त मजुरीची सजा केल्या बद्दलचा मजकूर गेल्या जुलै महिन्याच्या तारीख २१ वीच्या मुंबई ग्याझेट व टाइम्स पत्रांत छापून प्रसिद्ध केला आहे, तो आपण वाचला असालच. मयत तुळाजी उर्फ मोरोबा फकीरजी यांचा जातींत दरारा, मोठमोठ्या इंग्रजी कामदारांबरोबर त्यांचें दळणवळण, व त्यायोगें त्यांनीं स्व व परजातींत मिळविलेला लौकिक ज्ञातींत सर्व श्रुत आहे. तसेंच रा. रा. गोपिनाथ दादाजी यांची जातीव्यवस्थेविषयीं कळकळ, ज्ञातिसमाजांत त्यांचा पुढारीपणा आपणांस पूर्णपणें अवगत आहे. अशा ह्या उभय कुलीन श्वशूर व माहेर घराण्यांस कलंक लागणारें त्या हतभाग्य सुंदराबाईच्या हातून घडलेल्या दुष्कृत्याची टाइम्स व ग्याझेटसारख्या प्रसिद्ध पत्रांत छापलेली बातमी वाचून ज्ञातींतील सर्व आबालवृद्धांचीं मनें हळहळत आहेत. सुंदराबाईची शिक्षा पुरी होऊन तारीख २९ सप्टेंबर १८९१ रोजीं ती कैदमुक्त झाली. हल्लीं तिला रा. गोपिनाथजीनें आपल्या घरीं आणून ठेवल्याचें आह्मीं ऐकतों. "सुंदराबाईस" बापाची चोरी करण्याच्या कामीं प्रवृत्त होण्यास ज्या इसमानें फुसलाविलें तो जातीचा बेनी इस्त्राएल असून त्याचें वय २० वर्षांचें आहे. ह्या परकीय तरुण पुरुषाबरोबर सुंदराबाईचा

परिचय बऱ्याच दिवसांपासून होता व त्याच्याबरोबर गमन करण्यास ती स्वतः सिद्ध झाली होती हें तिनें कोर्टापुढें दिलेल्या जबानींत कबूल केलें आहे. हिंदूंच्या मतें इस्राएल ही जात म्लेंछांत गणली जाते व म्लेंछा-बरोबर अन्नव्यवहार करणें हिंदुधर्मशास्त्राविरुद्ध होय, हें आपणासारख्या धर्मनिष्ठ गृहस्थांस सांगणें नकोच. विवाहित हिंदु स्त्रीनें नवरा जिवंत असतां श्वेच्छाचारिणी-प्रमाणें वर्तन ठेवून परकीय पुरुषाबरोबर सहवास करणें हें धर्मशास्त्र व रुढी ह्यांस अनुसरून कोठपर्यंत आहे याचें अनुमान करण्याचें काम आपणांकडेसच आह्मीं सोंपवितों. मशारनिल्हे रा. गोपिनाथजी यांनीं कोर्टापुढें दिलेल्या साक्षींत असें सांगितलें होतें कीं सुंदराबाई हिनें तारीख २१ जुलै सन १८९१ रोजीं दागिन्यानें भरलेलें पानदान घेऊन फरारी केली, व दोन चार दिवस तिचा पत्ताच कोठें लागला नव्हता. व ज्या अर्थीं तिला पोलिसानें सदरील इस्राएल इसमाच्या घरीं पकडलें त्या अर्थीं दरम्यान ती त्या इस्राएलाच्याच घरीं खात पित असावी असें अनुमान करणें आह्मांस भाग पडतें. आतां ह्या बाबतींत हिंदुशास्त्रांत स्त्रीधर्म व नीतिसंबंधीं घालून दिलेल्या मर्यादांचें उल्लंघन "सुंदराबाईच्या" हातून झालें किंवा नाहीं व तिला जातींत परत घेतली असतां धर्म व ज्ञातभ्रष्टता होईल कीं नाहीं एवढेंच

आमचें ज्ञातीचें पाहणें आहे. ह्या प्रकरणांतील आरोपि इस्त्राएल रफेल आरुन यानें कोर्टापुढें सांगितलेल्या कांहीं गोष्टींवरून वरील शंका उद्भवणें साहजिक आहे. सबब ह्या शंकांचें यथायोग्य निराकरण होऊन लोक संशयनिवृत्ति व्हावी एतदर्थ जातीची जाहीर सभा भरवून आपण ह्या प्रकरणाचा कोणत्या रीतीनें निकाल करण्याचा विचार केला आहांत व अशा कामीं प्रवृत्त होणाऱ्या ज्ञातींतील इतर स्त्रियांस चांगली दहशत बसण्यासारखी सुंदराबाईस कोणती शिक्षा करण्याचें योजिलें आहांत हें सर्व आबालवृद्धांस कळविणें आपणांस जरूर आहे. इतक्या प्रसिद्धपणें शास्त्र, रुढी व नीतिविरुद्ध विवाहित स्त्रीच्या हातून घडलेल्या वर्तनाचें आपल्या जातींत हें पहिलेंच उदाहरण होय. व त्याकडे दुर्लक्ष करणें ठीक नव्हे. यांत धर्माची बाबद असल्यामुळें ज्ञातींतील सर्व आबालवृद्धांचीं मनें खवदळलेलीं आहेत. करितां लवकरच जातीची सभा भरवून बहुमतानें ह्या प्रकरणाचा निकाल करावा अशी आमची ज्ञातिबांधवांची आपणास सविनय प्रार्थना आहे. जातीची सभा भरविण्याचा अधिकार वंशपरंपरेनें आपणाकडेस चालत आला आहे व त्याचा ह्या वेळीं आपण योग्य उपयोग कराल अशी आमची बळकट आशा आहे. आपणांस दिलेली तसदी माफी करावी ही विनंती.

आपले नम्र ज्ञातिबांधव,

महादेव पांडुरंगजी घेवडे.

केशव चंदु गुर्जर.

बाळकृष्ण विश्वनाथ शारंगधर.

विश्वनाथ लक्ष्मणजी पतंगे.

शिवराम चंदू गुर्जर.

मुकुंदराव लक्ष्मण घोसाळकर.

आनंदराव मुकुंदजी घोसाळकर.

गोविंदराव मुकुंदजी घोसाळकर.

यशवंत वासुदेवजी गोरे.

चिंतामण बाळकृष्णजी बर्वे.

हरिशंकर मुकुंदजी बर्वे,

वासुदेव पुतळाजी सदावर्ते.

नारायण भाई बर्वे.

---

रा.रा. बाळकृष्ण विश्वनाथ शारंगधर वगैरे मंडळी यांसः-

महाराज,

आपला अर्ज " सुंदराबाई " बाबद जो आमचे स्वाधीन आपण केला तो पोंहचला, मजकूर समजण्यांत आला. त्यासंबंधीं ज्ञातीची सभा भरणें त्यापूर्वी त्या बाईच्या बाबतींत ज्या जबान्या वगैरे गिरगाम पोलिस कोर्टांत झाल्या त्यांच्या नकला मेहेरबानी करून पैदा

कराव्या व त्या आह्मांकडे पाठवून द्याव्या ह्मणजे आह्मी सभा भरण्याचा विचार करूं.

ता० १९ आक्टोबर १८९१. { तुमचा सेवक, मोरोबा बाळाजी.

---

रा. रा. मोरोबा बाळाजी शेट गुजर यांसः—

महाराज,

रा. रा. गोपिनाथ दादाजी सारंगधर यांची कन्या सुंदरा हिच्या संबंधीं आपणा तिघां मानकऱ्यांस थोड्या दिवसांपूर्वी जो अर्ज पाठविला होता, त्यास उत्तरादाखल आपण स्वतः आपल्या एकट्याच्याच सहीचें तारिख १९ आक्टोबर १८९१ चें लिहिलेलें पत्र आह्मांस पोहोंचलें. व्यवहारिक रीतीनें पहातां आपलें पत्र सदरील अर्जावर ज्यानें प्रथम सही केली होती त्यांच्या पत्त्यावर रवाना करणें जरूर होतें, परंतु ज्या अर्थी आपण आमचें मित्र रा. बाळकृष्ण विश्वनाथ शारंगधर यांसच निवडून त्यांजकडे तें पाठविलेंत त्याअर्थी त्यांनीं तें शिस्तवार रीतीनें आमच्या सर्व मंडळीपुढें विचार करण्यास ठेविलें होतें व सर्वानुमतें पसंत होऊन जो जबाब आपणास देण्याचें ठरलें आहे तो खालीं येणेंप्रमाणेः—

१. महाराज, आमचें पत्र तिघां मानकऱ्यांस लिहिलेलें

असून त्याचें उत्तर पाठविण्यास आपण स्वतःवर जबाबदारी घेतली, हें पाहून ज्ञातिसंबंधीं पूर्वापार कळकळ आपणामध्यें जी विशेष जागृत आहे, तीबद्दल आपली तारीफ करण्यांत जितका संतोष वाटतो तितकाच आपले बंधु मानकरी रा. रा. पांडुरंगजी व नानाभाई यांचा ज्ञातिसंबंधीं हरएक कामांत निष्काळजीपणा पाहून मंडळीस खेद वाटत आहे अशाच धोरणानें आपण स्वावलंबनावर विश्वास ठेवून समाजाच्या हिताकडे लक्ष्य पोहोंचविलें असतां जातीची व्यवस्था जी आज बरींच वर्षें मागसलेली दिसत आहे तिचा उर्जितकाळ समीप आणल्याचें श्रेय आपणा स्वतःलाच मिळेल यांत बिलकूल संशय नाहीं. व परमेश्वर अशीच निरंतर सुवासना देऊन मानकरीपणाच्या सौभाग्याचा टिळा अक्षय आपल्या भाळीं विलसो अशी त्या जगन्नियंत्या प्रभूजवळ आमची अनन्यभावें करून प्रार्थना आहे.

२. कोणत्याही समाजाचें सूत्र हातीं घेऊन त्या समाजाचा पुढारीपणा करण्यांत व विशेषतः ज्ञातिसमाजांत अग्रेसर होऊन मानकरीपणाचा अधिकार चालविण्यांत, नुसती अंगमेहनतच असती तर त्या अधिकाराचें ओझें वाहण्यास हातभार लावून आपणास यथाशक्ति मदत करण्याच्या कामीं आह्मीं प्रत्येकानें झटणें हें आमचें कर्तव्य समजतों. परंतु त्या कामीं स्वतःचीच

अक्कल, हुशारी व कर्तव्यदक्षता हीं असणें अवश्य आहेत, ह्मणून परबुद्धीनें किंवा दुसऱ्यांचीच मदत घेऊन आपलें कार्य होईल असें आमच्या अल्प बुद्धीस वाटत नसल्यामुळें प्रस्तुत " सुंदरा " हिच्या बाबतींत आपणास हवी तशी आह्मांपासून मदत मिळणार नाहीं हें स्पष्टपणें सांगण्यांत आह्मांस फारच दिलगिरी वाटते. तरी पण आपल्या पत्रांत फर्माविलेल्या हुकुमास योग्य मान देण्याकरितां आह्मी एवढीच विनंती करितों कीं, सदरील प्रकरणांत कोणत्या मुद्यावर विचार करण्याकरितां आपणास गिरगाम पोलिस कोर्टांतील पुराव्याची गरज आहे व हें प्रकरण ज्ञातिसभेंत आणण्यांत आपणास कोणतें गूढ पडलें आहे याचा जर यथाकालीं पत्रजबाबें निर्देश कराल तर त्या कामीं आपणास यथाशक्ति मदत करण्याचें आह्मी अभिवचन देतों. आमच्या मागील अर्जांत ज्या वर्तमानपत्रांचा उल्लेख केला आहे त्यांची प्रत आपणाकडेस नसल्यास व त्याप्रमाणें आह्मांस कळविलें असतां आह्मी पैदा करून ज्ञातिसभेंत सादर करूं; व त्याविषयीं आपण निष्काळजी असावें. डोंगरीच्या तुरुंगांतील दोन महिने " सुंदरा " हिचा वास हाही एक सबळ पुरावा आपणाजवळ आहे; शिवाय आपण ज्ञातीचे मानकरी ह्मणवितां, ह्मणून सर्व गोष्टी आपणास अवगत असल्याच पाहिजेत व तत्संबंधीं

आपण शोध केला असालच व तसें करणें आपलें कर्तव्य आहे हें आपणा सुज्ञ गृहस्थांस सांगणें नकोच व त्याविषयीं आपणास यथाकालीं स्मरण द्यावें व आपणाकडे या बाबतींत पक्षपातिपणाचा दोष येऊं नये ह्याच शुद्ध हेतूनें आह्मीं मागचा अर्ज केला होता व त्यापलीकडे कांहीं नाहीं हें खास लक्षांत ठेवावें.

३. एखाद्या क्षुल्लक कामास आपल्या कोत्या समजुतीनें भलतेंच स्वरूप देऊन अवाढव्य व्यूह रचावा व खरा पक्ष प्रतिपादनार्थ प्रयत्न करण्याचें सोडून खोटा पक्ष धरून बसण्यांत जी निर्बलता आपल्या ज्ञातिसमाजांत गतानुगतिक दिसून येत आहे, तिचें अनुकरण निदान या प्रकरणांत तरी आपण घेणार नाहींत अशी आमची पूर्ण उमेद आहे. नाहीं तर " भवितव्यताबलवती " हा ह्मणीकडे लक्ष ठेवून आपण " सुंदरा " हिच्या प्रकरणाचा कोणत्या रीतीनें शेवट करूं इच्छितां व ह्या पत्रास आपलें उत्तर काय येतें याची मार्गप्रतीक्षा करीत बसलोंच आहों. ज्ञातिबांधवांवर आपला लोभ असावा व ज्ञातीची व्यवस्था लावून " धर्मसंरक्षण " व्हावें एवढीच आमची आपणास शेवटची विज्ञापना आहे.

ह्यासंबंधीं ह्या मंडळीबरोबर आपणास पत्रव्यवहार करणें झाल्यास रा. रा. नारायण भाई बर्वे यांजबरोबर करावा.

आपले ज्ञातिबांधव,

नारायण भाई बर्वे.
केशव चंदू गुर्जर.
विश्वनाथ लक्ष्मण पतंगे.
यशवंत वासुदेव गोरे.
हरिशंकर मोरोबा बर्वे.
वासुदेव पुतळाजी सदावर्त.
महादेव पांडुरंगजी घेवडे.
आनंदराव मकुंदजी घोसाळकर.
बाळकृष्ण विश्वनाथ शारंगधर.

तारीख १७ आक्टोबर सन १८९१.

---

॥ श्री ॥

ता. २० आक्टोबर १८९१.

रा० रा० नारायण भाई बर्वे वगैरे मंडळी यास.—

आपला पूर्वीचा बिन तारखेचा अर्ज " सुंदराबाईच्या " बद्दल आला तो पोहोंचला व त्याचा जबाबही आपणांस पाठविला आहे, त्यावर उत्तर ता० १७ आक्टोबर १८९१ चें पोहोंचलें. आतां आपणांस कळविण्यांत येतें कीं, ज्याप्रमाणें आपली इच्छा आहे त्याचेविरुद्ध आपल्या ज्ञातींतील कितीएक मंडळीची इच्छा आहे असें त्यांनीं लेखी दर्शविल्यावरून आपणांस असें कळ-

वितों कीं, अशी ज्ञातिसंबंधीं कामें करण्याचीं आमचेवर अवलंबून असतात. तरी ह्या कामाबद्दल ज्याप्रमाणें आह्मांस जसी जरूरी वाटेल त्याप्रमाणें आह्मी तजवीज करूं आपली सूचना आली हें फार बरें.

मोरोबा बाळाजी गुर्जर.
नानाभाई विश्वनाथजी सदावर्त. } **मानकरी.**
पांडुरंग कृष्णाजी मुकुंदजी भोजनें.

---

मुंबई ता० २२ आक्टोबर सन १८९१.

रा. रा. मोरोबा बाळाजी गुर्जर.
,, पांडुरंग कृष्णाजी भोजने. } मानकरी यांस
,, नानाभाई विश्वनाथ सदावर्त.

## महाराज,

आपलें ता० २० आक्टोबर सन १८९१ चें तिघांच्या सहींचें पत्र पोहोंचलें. " सुंदरा " बाबद विचार करण्याकरितां ज्ञातीची सभा भरूं नये अशा सूचनेचा ज्ञातींतील कांहीं गृहस्थांनीं लेखी अर्ज आपणास पाठविला आहे असें आपण लिहितां. दोन्ही अर्जांचा नीट विचार करून कोणत्या अर्जास विशेष महत्व द्यावें, हें आपणावर अवलंबून आहे, ही गोष्ट आह्मांस कबूल आहे, तसेंच ज्ञातिव्यवस्थेचा कारभार आपल्या हातीं वंशपरंपरेनें आला आहे हेंही आह्मी विसरत नाहीं,

परंतु तो अधिकार चालविण्यांत किंवा आपलें काम बजाविण्यांत आपल्या हातून हयगय होत असल्यास जातींतून कोणतीही मंडळी आपणांस विचारण्यास मुखत्यार आहे, हें आपण स्वतः कबूल करालच. प्रस्तुत सुंदरा हिच्या प्रकरणीं आपण काय चौकशी केली ? ती धर्मभ्रष्ट झाली आहे किंवा नाहीं, व तिला कार्यप्रसंगीं सामाजिक जेवणखाण्यांत पाचारण केलें असतां जातीस कांहीं हरकत आहे काय ? ह्या शंकांचें साद्यंत निराकरण आपल्या पत्रांत होत नाहीं ह्मणून पत्रजबाबें सेदरील प्रश्नांचीं उत्तरें देऊन आमची संशयनिवृत्ति करावी. आपणाजवळ जो दुसरा लेखी अर्ज आला आहे त्यांतील कोणत्या मुद्यावरून आपण ता. १८-१०-९१ रोजीं सभा भरण्याचा केलेला बेत रहित केला ह्याविषयीं आमची खात्री होण्याकरितां त्या अर्जाची नक्कल आह्मांस पाठविली असतां मंडळीवर आपले फार फार आभार होतील. ह्या पत्राचें उत्तर लवकरच पाठविण्याची मेहेरबानी करावी.

मंडळीच्या हुकुमावरून,

आपला ज्ञातिबांधव,

नारायण भाई बर्वे.

---

॥ श्री ॥

# कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील आबालवृद्धांस सूचना.

रा. रा. हरिनारायण जनार्दनजी ढगे यांची पत्नी सुंदरा, रा. रा. गोपीनाथ दादाजी सारंगधर यांची ज्येष्ठ कन्या, हिच्याबाबद मानकऱ्यांबरोबर कित्येक ज्ञातिगृहस्थांनीं केलेला पत्रव्यहार जो रा. रा. नारायण भाई बर्वे यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे, तत्संबंधीं विचार करण्याकरितां तारिख १२ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं रात्रौ कित्येक जात्याभिमानी मंडळीची खासगी सभा भरली होती, तेवेळीं सर्वानुमतें झालेला ठराव आपणास खालीं विदित केला आहे तो येणेंप्रमाणें:-

" रा. रा. गोपीनाथ दादाजी सारंगधर यांची कन्या सुंदरा हिच्याबाबद विचार करण्याकरितां जातीची सभा भरण्याचें काम मानकऱ्यांचें होतें व त्यांनीं तें अद्यापि केलें नाहीं व तसें न करण्याचें कारणही कांहीं दर्शविलें नाहीं; सबब ह्या मंडळीनें सोईवार दिवशीं व वेळीं जातीची सभा भरवावी, व ह्या बाबतींत मानकऱ्यांजवळ जो पत्रव्यवहार झाला आहे तो सभेंत घेऊन येण्याकरितां त्यांस पत्र लिहावें."

सदर्हु ठरावास अनुसरून तारिख २२ नोव्हेंबर सन

१८९१ रविवार रोजीं बरोबर दोन वाजतां श्री नागेश्वर-च्या सभामंडपांत जातींतील आबालवृद्धांची सभा भरण्याचें योजिलें आहे. ते वेळीं प्रथमतः मानकऱ्यांकडून ह्या प्रकरणांत झालेल्या हयगयींविषयीं चौकशी होऊन, सदहू सुंदरा हिच्याही प्रकरणाचा विचार केला जाईल.

ज्ञातींतील सर्व जात्याभिमान बाळगणाऱ्या गृहस्थांनीं नियमित वेळीं अवश्य येण्याची कृपा करावी.

ज्ञातींतील सर्व अबालवृद्धांनीं मंजूर केलेल्या समेट-पत्रांतील १० व्या कलमास अनसरून वयांत आलेले असे कनिष्ठ ४० गृहस्थ हजर असल्याखेरीज सभेच्या कामास सुरुवात केली जाणार नाहीं.

मंडळीच्या हुकूमावरून,
जगन्नाथ फकीरजी टकले
जगन्नाथ अंतोबा दिघे
नारायण भाई बर्वे

मुंबई ता. १९ नोवेंबर सन १८९१.

---

## कोंकणस्थ नामदेव शिपी ज्ञातींतील आबालवृद्ध यांस सूचना.

तारीख १९ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं ज्ञातींतील कांहीं मंडळीनें आमच्या संमतीवांचून रा. रा. गोपीनाथ दादाजी सारंधर व त्यांची कन्या सुंदराबाई ह्यांच्यासंबं-

धानें रविवार तारिख २२ मिनहु रोजीं सभा भरण्या-करितां सूचनापत्रक छापून प्रसिद्ध केलें आहे; परंतु ह्या बाबतींत आह्मीं बारकाईनें पूर्ण चौकशी केल्यावरून असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, सुंदराबाईचा व्यवहार रा. रा. गोपीनाथ दादाजी ह्यांनीं ज्ञातिधर्मास अनुसरून ठेविला असल्यामुळें तूर्त सभा भरण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

मोरोबा बाळाजी गुजर.
नानाभाई विश्वनाथजी सदावर्त.
पांडुरंग कृष्णाजी मुकुंदजी शेट भोजने.
} मानकरी.

मुंबई, ता० २१ नोवेंबर सन १८९१.

---

॥ श्री ॥

# ठरावपत्र.

कोंकणस्थ नामदेव शिंपीज्ञातींतील सर्व आबालवृद्धांनीं मंजूर केलेल्या समेटपत्रांतील कलम १० यास अनुसरून शके १८१३ कार्तिक वद्य ७ वार रविवार ता. २२ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं श्रीनागेश्वराचे सभामंडपांत ज्ञातीच्या आबालवृद्धांची सभा भरली होती. ते वेळीं सदरील समेटपत्रांतील ११ व्या कलमान्वयें जे ठराव झाले ते येणेंप्रमाणें:--

ठराव १ ला.—रा. रा. हरिनारायण जनार्दनजी ढगे यांची पत्नी सुंदरा, रा. रा. गोपीनाथ दादाजी सारंगधर यांची ज्येष्ठ कन्या, हिच्या बाबद मानकऱ्यांबरोबर कित्येक ज्ञातिबांधवांनीं केलेला पत्रव्यवहार जो रा. रा. नारायण भाई बर्वे यानीं छापून प्रसिद्ध केला आहे तो वाचून पहातां, जातीचे मानकरी रा. रा. मोरोबा बाळाजी गुजर, रा. रा. पांडुरंग कृष्णाजी भोजने, व रा. रा. नानाभाई विश्वनाथ सदावर्त यांच्या हातून सदरील प्रकरणांत आपलें काम बजावण्यांत मोठी हयगय झाली आहे; ह्या हयगयीबद्दल तसेंच ज्ञातिसंबंधीं इतर कामें बजावण्यांत त्यांची आजपर्यंत जी निष्काळजी दिसून आली आहे त्याबद्दल विचार होऊन त्यां तिघा मानकऱ्यांस त्यांच्या कामावरून दूर केलें आहे. व ह्यापुढें शुभप्रसंगीं जातीचा विडा व मानपान ह्या तिघांपैकीं कोणासही देऊं नये. व त्यांच्या जागीं दुसऱ्यांची नेमणूक होऊन व्यवस्था लागेपर्यंत ह्यापुढें जातीचे विडे ज्ञातिफंडांत जमा होण्याकरितां ट्रस्टीच्या स्वाधीन करावे.

ठराव २ रा.–सदहू सुंदरा एका रफेल आरून नांवाच्या इस्त्रायलाबरोबर जाऊन त्याच्या घरीं कांहीं दिवस राहिली होती व चोरीच्या गुन्ह्याबद्दल दोन महिने सक्त मजुरीची सजा भोगून हल्लीं बापाच्या घरीं आहे. ती धर्मभ्रष्ट होऊन तिच्या हातून स्त्रीधर्म व नीतिविरुद्ध

आचरण घडल्यामुळें ती जातीच्या दोषास पात्र आहे. असें आचरण जातींत दुसऱ्या कोणत्याही स्त्रीच्या हातून झालें असतां ज्ञातिबहिष्काराशिवाय दुसरी शिक्षा नाहीं; परंतु सुंदरा हिच्या अल्पवयाकडे लक्ष पोहोंचवून, व तिच्यावर जो नवऱ्याचा अथवा तिच्या पित्याचा दाब ठेवणें जरूर होता तो मुळींच नसल्यामुळें तिच्या हातून ही वाईट गोष्ट घडून आली आहे हें लक्षांत आणून ज्ञातीनें दयार्द्र बुद्धीनें तिला आपलें वर्तन सुधारून घेण्याकरितां आजपासून एक वर्षाची मुदत दिली आहे. ही मुदत संपेतोंपर्यंत तिच्याबरोबर ज्ञातीपैकीं कोणींही अन्न-व्यवहार करूं नये. एक वर्षानंतर तिचें वर्तन सुधारून तिला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे असें दिसून आल्यास, तिनें अगर तिच्या नवऱ्यानें अथवा तिच्या कोणत्याही नातलगानें पुनश्च ज्ञातीची आबालवृद्धांची सभा भरवून तिला धर्मशास्त्रविधिनियुक्त प्रायश्चित्त देऊन पावन करावें.

मुंबई तारीख २६ नो-<br>व्हेंबर सन १८९१. } जगन्नाथ फकीरजी टकले.<br>अध्यक्ष

---

श्री.

## कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील आबालवृद्ध यांस सूचनाः—

ता० २१ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं आमच्या

श्री.

## कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील आबालवृद्ध यांस सूचनाः—

ता० २१ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं आमच्या सह्यानिशीं छापून प्रसिद्ध केलेल्या सूचनापत्रकांस न मानतां कित्येक कलहवर्धक मंडळीनें रविवार ता० २२ मिनहू रोजीं श्रीनागेश्वराच्या सभामंडपांत ज्ञातींतील कांहीं मंडळीची सभा भरली होती, त्या प्रसंगीं आह्मांविरुद्ध व रा० रा० गोपिनाथ दादाजी सारंगधर यांची कन्या सुंदराबाई हिजविरुद्ध कांहीं लेखी सूचना सभेपुढें आणिल्या होत्या; परंतु त्या सूचनांवर कित्येक ज्ञातिहितेच्छु गृहस्थांनीं आक्षेप घेतल्यामुळें रद्द झाल्या असून, ज्ञातींत द्विधा करण्याच्या हेतूनें सभा विसर्जन झाल्यानंतर त्या सूचना बहुमतास अनुकूळ आहेत असें कित्येक ज्ञातिगृहस्थांस समजावून त्यांच्या सह्या घेतल्या आहेत, तर ह्या गोष्टींचा विचार करण्याकरितां रविवार ता० ६ डिसेंबर सन १८९१ रोजीं दुपारीं बरोबर दोन वाजतां रा. रा. पांडुरंग कृष्णाजी शेट भोजने यांच्या सदरेंत आबालवृद्धांची सभा भरणार आहे, तर ज्ञातिहितेच्छु गृहस्थांनीं नियमित वेळीं येण्याची मेहेरबानी करावी.

मोरोबा बाळाजी गुजर.
नानाभाई विश्वनाथजी सदावर्त.
पांडुरंग कृष्णाजी मुकुंदजी शेट भोजने. } मानकरी.

ता० ५ डिसेंबर सन १८९१

---

॥ श्री ॥

## कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील आबालवृद्ध यांस सूचना.

ता. २२ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं जातीची सभा भरून ज्ञातीनें जे ठराव आपल्या सह्यानिशीं पसार केले आहेत त्यांपैकीं पहिल्या ठरावान्वयें रा. मो. बा. गुजर, रा. पां. कृ. भोजने, व रा. ना. वि. सदावर्ते, यांस मानकऱ्यांच्या जागेवरून दूर केलें आहे, त्याअर्थी त्यांस आतां त्या अधिकारानें ज्ञातिसंबंधीं कांहीं एक काम करण्याची सत्ता राहिली नाहीं; असें असून ते आज आपल्या सहीनिशीं निमंत्रणपत्र काढून जी सभा भरविणार आहेत, ती कायदेशीर ठरत नाहीं, सबब त्या सभेस कोणींही जाऊं नये.

खरा ज्ञातिहितेच्छु,

नारायण भाई बर्वे.

मुंबई ता० ६ डिसेंबर सन १८९१.

---

॥ श्री ॥

## कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील आबालवृद्ध यांस कळावें कीं,

ज्ञातींतील कित्येक गृहस्थांनीं सन १८९१ नोव्हेंबर ता.

२२ रविवार रोजीं श्री नागेश्वराच्या सभामंडपांत झालेल्या सभेची जी हकीकत छापून प्रसिद्ध केली आहे त्यासंबंधीं डिसेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेस रा. रा. पांडुरंग कृष्णाजी भोजने यांच्या सदरेंत झालेल्या ज्ञातीच्या सभेंत विचार होऊन जे ४ ठराव झाले ते येणेंप्रमाणें:-

१. ला. हरि नारायण जनार्दन ढगे यांची पत्नी सुंदरा हिच्या दुर्वर्तनाकडे मानकऱ्यांहीं बुद्ध्या दुर्लक्ष केलें असा जो कित्येकांचा समज झाला आहे तो निराधार आहे. नाजुक बाबतींत मानकऱ्यांहीं अमुक एक व्यक्तीच्या अगर व्यक्तींच्या इच्छेप्रमाणें वागावें हें प्रतिपादन करणें पोक्त विचारास साजत नाहीं.

हतभाग्य सुंदरा हिजबरोबर तिच्या आईबापांनीं व घरांतील इतर मनुष्यांनीं व्यवहार ज्ञातिधर्मास अनुसरून ठेविला आहे ह्याविषयीं मानकऱ्यांची पूर्ण खात्री झाल्यावरून त्या गोष्टीची प्रसिद्धपणें चर्चा करण्याकरितां ज्ञातीची सभा भरली नाहीं हें त्यांनीं शिष्टसंप्रदायास अनुसरूनच केलें.

२. ज्ञातीचीं इतर कामें मानकऱ्यांस कधीं कांहीं दुर्निवार अडचणीमुळें बजावतां आलीं नसतील ह्मणून ते त्या कामाविषयीं निरंतर हयगय करितात असें गृहित करून चालणें हें समंजसपणाचें लक्षण नव्हे.

३. संत व शहाणपणानें ज्ञातिसंबंधीं उपयुक्त सूचना करण्याचें टाकून सुधारणेच्छेच्या अतिरेकांत सदसद्विवे-

कशक्तीस झुगारून आकुंचित दृष्टीनें ज्ञातींत परस्परांत वितुष्टें उत्पन्न करण्याच्या कामास हात घातल्यानें आमच्या कित्येक ज्ञातिबंधूंच्या हातून नोव्हेंबर महिन्याच्या २२ व्या तारखेस श्रीनागेश्वराच्या सभामंडपांत मोठाच प्रमाद घडला.

आनंदराव राघोबा हाटाळकर.
काशिनाथ पांडुरंगजी सोमने.
गोपिनाथ आत्माराम दिघे.
शिवशंकर मलोजी चवाथे.
नानाभाई काशिनाथ नाईक;
आणि, एकाहत्तर मंडळी.

४. रा. हरि नारायण जनार्दन ढगे यांची स्त्री सुंदराहीस तिच्या दुर्वर्तनाबद्दल तिच्या आईबापांनीं व इतर आप्त मंडळींनें आज चार महिने अपंक्त ठेविलें हें त्या अल्पवयी मुलीस पुष्कळच शासन झालें व आज चार महिने तिचें वर्तन निर्दोष आहे ह्मणून आजरोजीं ज्ञातिगंगेनें तीस पावन केलें आहे.

मोरोबा बाळाजी गुजर.
नानाभाई विश्वनाथजी सदावर्त. } मानकरी.
पांडुरंग कृष्णाजी मुकुंदजी शेट भोजने.

मुंबई. ता. ६ डिसेंबर सन १८९१.

॥ श्री ॥

## कोंकणस्थ नामदेव शिंपीज्ञातींतील आबालवृद्धांस सभेचें आमंत्रण.

रविवार ता० १३ डिसेंबर सन १८९१ रोजीं बरोबर दोन वाजतां श्रीनागेश्वराच्या सभामंडपांत ज्ञातींतील आबालवृद्धांची सभा भरण्याचें योजिलें आहे. ते वेळीं रा० रा० जगन्नाथ फकीरजी टकले ह्यांच्या सहींनिशीं जे दोन ठराव ता० २९ नोव्हेंबर सन १८९१ रोजीं जातींत छापून प्रसिद्ध केले आहेत त्यांतील पहिल्या ठरावास अनुसरून ज्ञातिव्यवस्थेविषयीं पुढील विचार करण्यांत येतील.

सर्व आबालवृद्धांनीं नियमित वेळीं येण्याची कृपा करावी.

सदरील दोन्ही ठराव ज्यांस संमत आहेत त्यांसच येण्याची मोकळीक आहे.

जगन्नाथ फकीरजी टकले.

अध्यक्ष.

मुंबई ता० १२ डिसेंबर सन १८९१.

॥ श्री ॥

## पुंडलीकवरदाय नमः

॥ सर्वमात्मनि संपश्येत्सच्चासच्चसमाहितः ॥

शिष्टाचार ह्मणजे काय, हें ज्यांस यथार्थ कळत नाहीं त्या प्रत्येकास असें वाटतें कीं, शिष्ट पुरुष काय ते आह्मी, व आमचें आचरण तोच शिष्टाचार.

या सृष्टींत जिकडे पहावें तिकडे सारीं द्वंद्वें दृष्टीस पडतात. बरेंवाईट, सुखदुःख, पापपुण्य, आनंदशोक, धर्मअधर्म, सदाचारदुराचार, खरेंखोटें, हीं द्वंद्वें होत. या द्वंद्वांपैकीं सत्पक्षाची उन्नति करणारे व असत्पक्षाचा क्षय करणारे असे जे पुरुष त्यांसच शिष्टपुरुष हें नामाभिधान शोभतें. अधर्म, अनीति, दुराचार, व्यभिचार, भ्रष्टाकार, चौरकर्म इत्यादि असत्पक्षास उत्तेजन देणारांस व मदत करणारांस कोणीही शिष्ट ह्मणत नाहीं.

रा. रा. आनंदराव राघोबा हाटाळकर.
,, काशीनाथ पांडुरंगजी सोमने,
,, गोपीनाथ आत्माराम दिघे,
,, शिवशंकर मलोजी चवाथे,
,, नानाभाई काशीनाथ नाईक;
आणि एकाहत्तर मंडळी.

यांस आह्मी इतकेंच विचारितों कीं, तुमचा शिष्टसांप्रदाय कोणत्या प्रकारचा आहे, तो स्पष्ट करून

दाखवा. उगीच तोंडानें बोललें, अथवा छापून लोकांत प्रसिद्ध केलें कीं, अमूक गोष्ट शिष्टसांप्रदायास अनुसरून आहे, तर तें कोणीही मानणार नाहीं. तसेंच मानकरी व त्यांचा निर्जीव पक्ष उचलून घेणारी सदर्हू मंडळी यांस दुसरा प्रश्न हा विचारतों कीं, तुह्मी हिंदू आहांत किंवा नाहींत? हिंदू असाल तर श्रीवेदव्यास, नारद, वसिष्ठ, वाल्मीक मनु आदिकरून हिंदु लोकांनीं जगत्प्रसिद्ध मानलेले जे शिष्ट पुरुष त्यांपैकीं कोणाच्या शिष्टसांप्रदायास अनुसरून तुह्मी दुर्भाग्य सुंदरा हीस पावन केलें तें सप्रमाण सिद्ध करून दाखवावें. ज्यांस हिंदु धर्माचा खरा अभिमान आहे, ते तुमचे असले आधाररहित, परंतु आपखुद रीतीचें बोलणें कधींही कबूल करावयाचे नाहींत इतकेंच नाहीं, परंतु तुमचा बाहेरील पोकळ धर्मनिष्ठेचा भोंपळा फुटून, ते तुह्मांस तुमच्या कृतीनें व्यक्त झालेल्या रूपानें ओळखूं लागतील, आणि बनेल तितके तुमच्यापासून दूर रहाण्याविषयीं जपतील.

प्रत्येक ज्ञातींत पंचसंस्थेचें अस्तित्व कोणत्या कारणामुळें आहे, याचा किंचित तरी विचार या मानकऱ्यांस व सुंदराप्रकरणामुळें त्यांजकडे झालेल्या पक्षकारांस आहे काय ? फक्त मानकरी या शब्दास चिकटून त्यांस इतकेंच समजतें कीं, आह्मी योग्य अथवा अयोग्य पाहिजे तें केलें तरी ज्ञातीनें आह्मांस निरंतर मानच देत असावें !!

परंतु लोकप्रचारांत तर फुकटदेखील कोणी कोणास मान देत नाहीं, मग अयोग्य कृति करीत असून तो ते देतील ही आशा धरणें हें किती मूर्खत्व आहे ? लोकांनीं हरएकास मान द्यावा असा कांहीं तरी हेतु असला पाहिजे. कोणताही पूज्य हेतु असल्यावांचून कोणी कोणास मान देत नसतो. याच विचाराप्रमाणें ज्ञातिप्रकरणींदेखील ज्ञात जो पंचांस मान देते, तोही तसाच हेतु असल्याशिवाय देत नाहीं. धर्म, नीति, व व्यवहार यांचें ज्ञान ज्यांस साधारण ज्ञातिसमुदायापेक्षां विशेष असून, भ्रष्ट न होऊं देण्याविषयीं जे दक्ष, सावध, व तत्पर असतात तेच ज्ञातीच्या मानास पात्र होतात; आणि असे नसून जे रिकाम्याच मानाची अपेक्षा धरितात ते फजितीस मात्र वरितात. ज्ञातींत अधर्म, अनीति, दुराचरण, हीं कोठें वाढत आहेत त्याची बारकि चौकशी ठेवण्याचें, व त्यांचा प्रतिकार व अटकाव करण्याचें मुख्य काम पंचांचें आहे; आणि यासाठींच त्यांस ज्ञातींतून मान मिळतो. ज्ञातीनें नुक्तेंच अधिकारावरून दूर केलेले मानकरी असल्या योग्य लक्षणाचे आहेत असें पुरवार करण्याची हिम्मत त्या पक्षापैकीं एक देखील करूं शकेल काय? कैकजण यवनांच्या पोचखान्यांतून यथेच्छ भोजन करून येऊन, पुनः अजाण जातीसही भ्रष्ट करितात, या गोष्टीची मानकऱ्यांच्या राउळीं तरी मात असते

काय ? कोणी दिवसांचे दिवस व महिन्यांचे महिने वेश्येचे घरीं राहून, पुनः हवें तेव्हां घरीं येऊन घरच्या माणसांसही भ्रष्टवितात, त्यांची हे काय चौकशी ठेवितात ? कोणी स्त्रिया ज्या अगदीं एकव्या असून ज्ञातिसमाजवास सोडून जेथें ज्ञातींतील कोणाचीही नजर पडणार नाहीं अशा दूरच्या ठिकाणीं जाऊन राहिल्या आहेत, त्यांची जिंदगी त्या कोणत्या प्रकारानें गुजारित आहेत, याची खबरदारी कोणीं ठेवावी ? आज कैक वर्षें एका स्त्रीच्या घरीं एक बुढा यवन प्रसिद्धपणें वास्तव्य करीत आहे, तिजविषयीं हे मानकरी डोळ्यावर पडदे व कानावर केंस ओढून कसे निश्चेष्ट बसले आहेत ? याखेरीज ज्ञातींत आणखी किती अनाचार चालू असतील त्या सर्वांविषयीं पूर्ण डोळेझांक केली असूनही

" ज्ञातीची इतर कामें मानकऱ्यांस कधीं कांहीं दुर्निवार अडचणीमुळें बजावतां आलीं नसतील, ह्मणून ते त्या कामाविषयीं निरंतर हयगय करितात असें गृहित करून चालणें हें समंजसपणाचें लक्षण नव्हे. "

असा ठराव करणें हें तरी कोणत्या समंजसपणाचें लक्षण असेल तें हरी जाणें ! ! इतके हे अनिष्ट प्रकार व घोटाळे, जे ज्ञातींत अबाधित चालू आहेत, ते सर्व या मानकऱ्यांच्या हयगयीमुळें नव्हत तर कशा-

मुळें ? आणि असें असून जे कोणी त्यांस जागृत करण्याचा प्रयत्न करीत असतील त्यांजवर असमंजसपणाचा अनृतारोप लागू करण्यास पहाणें हें केवढें धाडस ह्मणावें ?

मानकऱ्यांच्या हयगयीचीं वर प्रदर्शित केलेलीं सर्व प्रमाणें अजूनही हयात असून आमच्या सहनशीळ ज्ञातीनें, हे आज बंदोबस्त करतील उद्यां करतील, या आशेवर वर्षांचीं वर्षें काढिलीं, परंतु यांच्या हातून कांहींएक न होतां उलट तशींच प्रकरणें दिवसानुदिवस अतिशय माजूं लागलीं असें पाहून शेवटीं नाइलाजास्तव ज्ञातीनें त्यांस त्यांच्या अधिकारावरून या ताजे प्रकरणीं मोठ्या त्वेषानें दूर केलें. यावरून आपणाला फुकाचा पोकळ मान तरी मिळत होता तोही आतां जातो असें जेव्हां त्यांस वाटलें, तेव्हां कोठें ते सभा भरण्यास जागृत झाले !! आणि तीही भरून काय केलें ? मानवृद्धि करून घेण्याचे सदसद्विवेकशक्तीस झुगारून उलट अधिकच मानहानि करून घेण्याचें काम केलें !! ह्मणजे भ्रष्टाकार व व्यभिचार यांचा सारासार विचारानें प्रतिकार करण्याची योजना करण्याचें सोडून, उलट ते वाढविण्याचें व पूर्वीच्या घोटाळ्यांत आणखी एक भर जास्त करण्याचें काम केलें.

मानकऱ्यांनीं तर सुंदराचें प्रकरणही पहिल्यापासून

त्या पूर्वीच्या इतर प्रकरणाप्रमाणेंच अघोरी वखारींत टाकून त्यांच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें घोरत राहिले होते. सदर्हु सुंदरा तुरंगांतून सुटण्याचे वेळीं तिच्या बापानें जाऊन तिला आणिलें, व ज्ञातीस विचारल्यावांचून तीस आपल्या घरांत ठेवून घेतलें. या गोष्टीस बरेच दिवस लोटले तरी या मानकऱ्यांस त्यांच्या कर्तव्यानें जागें केलें नाहीं. तेव्हां कांहीं स्वधर्माभिमानी मंडळीनें रा. रा. मोरोबाची भेट घेऊन त्यांस जाग्रत केलें. परंतु हे मानकरी काय विचारतां !! धैर्यवान पुरुष अनेक संकटें आलीं असतां जसे डगमगत नाहींत, किंवा समुद्रांतील मोठे जड खडकावर कितीही लाटा आदळल्या तरी ते जसे हालत नाहींत, तसे या मंडळीनें त्यानं तरही आणखी दोन तीन वेळां त्यांस हुसकलें असतां देखील आज उद्यांवर टाकून त्यांस जेमतेम वाटेसच लाविलें, पण आपण एक पाऊलभर देखील हालले नाहींत. हें पाहून या मंडळीनें लेखी पत्रदेखील पाठविलें. तेव्हां मोरोबांनीं त्यांच्या तंगड्या त्यांच्याच गळ्यांत घालण्याचा लपंडाव लढवून त्यांस " या बाबतींत कोर्टांत पडलेल्या जबान्यांच्या नकला पैदा करून त्या आह्मांस द्याव्या ह्मणजे आह्मी सभा भरण्याचा विचार करूं. " असा लांबणीवर टाकण्याचा जबाब दिला. परंतु यावर जेव्हां दुसरें पत्र गेलें तेव्हां

तर हे मानकरी अधिकच तोऱ्यांत येऊन " ज्ञातिसंबंधीं कामें करण्याची आम्हांवर अवलंबून असतात, तरी ह्या कामाबद्दल ज्याप्रमाणें आम्हांस जशी जरूरी वाटेल त्याप्रमाणें आम्ही तजवीज करूं," असा अधिकच बेपर्वाईचा जबाब देऊन त्यांनीं आपल्या मतें हें प्रकरण अजिबात निजवून टाकण्याची मात्र तजवीज केली. याप्रमाणें मानकरी नुस्तें दुर्लक्षच करीत नाहींत, परंतु हरएक अपेक्षणीय बंदोबस्त होऊं देण्याच्या आड जबरदस्त हरकतीसुद्धां करितात हें वर प्रदर्शित केलेल्या पुराव्यावरून सिद्ध होत असून एकंदर शहात्तर असामींनीं तारीख ६ डिसेंबरच्या त्यांच्या सभेंत जो पहिला ठराव केला कीं, " सुंदराच्या दुर्वर्तनाकडे मानकऱ्यांनीं बुद्ध्यां दुर्लक्ष केलें असा जो कित्येकांचा समज झाला आहे तो निराधार आहे. "

तर वरील पुराव्याकडे पाहून आतां त्यांचा ठराव टिकवून धरण्याचा त्यांजपाशीं कोणता आधार आहे, तो त्यानीं दाखवून द्यावा. तसेंच जी गोष्ट भर पोलिसांत शेंकडों लोकांसमक्ष, आणि पत्रोपत्रीं प्रसिद्ध झाली आहे तीस नाजूकपणाचें रूप देण्याचा आग्रह धरणें हें कोणत्या पोक्त विचारास साजत असेल तें या शहात्तरांसच ठाऊक!!! आणि प्रसिद्ध झालेल्या " गोष्टींची प्रसिद्धपणें चर्चा करण्याकरितां ज्ञातीची सभा भरली

नाहीं हें त्यांनीं शिष्टसंप्रदायास अनुसरूनच केलें. ''
तर हा त्यांचा शिष्टसंप्रदाय कोणत्या प्रकारचा असेल
याविषयीं आपण आरंभांतच प्रश्न केला आहे. मोराचीं
पिसें ल्यालेल्या डोमकावळ्याप्रमाणें वरवरून संत व
शहाणपणाचें सोंग दाखवून अंतरांतून भ्रष्टाकार, व्यभि-
चार, चौरकर्म, इत्यादि गोष्टींस अल्पही आश्रय देऊन
सामील होणें, आणि योग्य बंदोबस्ताची अपेक्षा करणा-
रांस " मोठाच प्रमाद घडला " असें आधारावां-
चून दूषण देण्याचा ठराव पसार करणें, यांत या शहा-
त्तरांचे हातून केवढा मोठा प्रमाद घडला याचें अनुमान
ते करूं शकतील काय? आमचा सदसद्विवेक तर
आह्मांस असत्पक्षास पुष्टी देण्यास सांगत नाहीं; तेव्हां
ज्यांणीं तसल्या पक्षास पुष्टी दिली आहे त्यांनींच " स-
दसद्विवेकशक्तीस झुगारून अकुंचित दृष्टीनें ज्ञातींत
परस्परांत वितुष्टें उत्पन्न करण्याच्या कामास हात
घातला आहे," किंवा आह्मीं, हें निष्पक्षपातानें सांगणें
शिष्ट पुरुषांवाचून इतराचे हातून होण्याजोगें नाहीं.
पाहिलींना कशी लपंडावाची गम्मत आहे ती? चोर
उलटा कोतवालासच दंडतो! अँ !!!

मानकऱ्यांच्या हातून पहिल्यापासून होत आलेल्या
सर्व हयगयी ते व त्यांचे हल्लींचे पक्षकार सहजच विस-
रतील, परंतु धर्मभीरू ज्ञात त्यांचीं प्रमाणें अजूनही

जिवंत पहात असून विव्हळ होत्साती कसी विसरील? हल्लींच्या प्रकरणांत जर त्यांनीं आड मार्गीं शिरण्याचें सोडून योग्य मार्ग धरिला असता, तर मागील सर्व अपवाद दूर करण्याचें हळूहळू बनलें असतें, व इतर सुधारणा करण्याचें काम सुरू झालें असतें. असें करण्याचा योग्य मार्ग त्यांस हाच होता कीं, प्रस्तुतच्या चालू प्रकरणीं ज्ञातीची सभा भरून चौकशी करून निकाल करण्याचें होतें. हें तर त्यांनीं केलें नाहीं; परंतु ज्ञातीनें यांस सांगूनसवरून थकल्यावर जेव्हां आपणच जमून त्या संबंधानें एकंदर निर्णय ठरविले, तेव्हां स्वतःच्या मानाबद्दल विचार करण्यास मात्र त्यांनीं सभा केली. मग त्या सभेस ज्ञात कशास जाईल? फक्त त्यांचेच मिलाफी थोडे असामी जमा करून त्यांनीं ती सन १८९१ डिसेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेस भरली. यांत त्यांनीं जातीचे शिंपी असून सुईपुरता देखील विचार केला नाहीं. नागेश्वराच्या सभामंडपांत तारीख २२ नोव्हेंबर रोजीं जेव्हां जातीनें आपण होऊन सभा भरली, त्याच वेळेस तुक्का फाट पडतो असें जाणून सुईदोरा घेऊन त्यास सांधण्याचा इलाज करावयाचा होता. तसें न करितां उलट फाटक्यांत पाय घालून, तारीख ६ डिसेंबर रोजीं जातीच्या चढीनें दुसरी सभा भरवून, अगदींच फाडण्याचें काम केलें. जातीनें

केलेले ठराव प्रसिद्ध झाल्याबरोबर त्यांनीं आपली हयगय कबूल करून योग्य बंदोबस्त करण्याचें जातीस अभिवचन दिलें असतें, ह्मणजे सर्व प्रकरण गोडीनें मिटलें असतें. पण आमच्या मानकऱ्यांचें शहाणपण काय विचारतां? जातीनें सभा करून ठराव केले त्यांवर चढ करून यांनीं ही आपली सभा भरून ठराव पसार केले. या ठरावांत शहाणपण, पोक्तपणा, संत-वृत्ति, सदसद्विवेक, शिष्टाचार, इत्यादि कर्णास गोड लागणाऱ्या शब्दांची जशी रेलचेल केली आहे तसे त्यांचे प्रायः अस्तित्व यांत केवढें आहे याचा घटस्फोट एथवर होऊन चुकला आहे, त्यावरून सर्वांच्या ध्यानां-त येऊन चुकलेंच असेल. यावरून ही द्विधा उत्पन्न होण्यांत मुळापासून मानकऱ्यांचाच वांक आहे, हें प्रमाणांसह सिद्ध झालें.

मानकऱ्यांबरोबरचा सर्व पत्रव्यवहार छापून ज्ञातींत प्रसिद्ध झाला, तरी ज्ञातीस समर्पक उत्तर देऊन त्यांचें समाधान करण्याची या मानकऱ्यांनीं तिळमात्र पर्वा धरली नाहीं. धर्मरक्षक मंडळीनें थोडे दिवस दम धरून शेवटीं जेव्हां आबालवृद्धांची सभा भरण्याचें निमंत्रणपत्र वांटलें, तेव्हां लोकांत गैरसमजूत फैलावून ती सभा जमा होण्याचा मोड व्हावा या उद्देशानें ज्ञातींत त्यांनीं ऐन आयतेवेळीं एक सूचनापत्र वांटलें.

यांत त्यांनीं अस्पष्ट व संदिग्धच मतलब देण्याची खुबी ठेविली.

"ह्या बाबतींत आह्मी बारकाईनें पूर्ण चौकशी केल्यावरून असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, सुंदराबाईचा व्यवहार रा. रा. गोपीनाथ दादाजी ह्यांनीं ज्ञातिधर्मास अनुसरून ठेविला असल्या-मुळें तूर्त सभा भरण्याचें प्रयोजन दिसत नाहीं."

या पत्रामुळें बरेच लोक गैरसमजुतीनें सभेस येण्याचे राहून गेले, नाहीं तर मोठाच समाज जमला असता. तथापि तो जमाव सरासरी दीडशें असामींचा झाला होता. मानकऱ्यांनीं भरलेल्या सभेंत त्यांच्यासगट सारे ७९ असामी जमले होते, असें त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ठरावपत्रावरून सिद्ध होतें. असोः परंतु "सुंदराचा व्यवहार गोपीनाथजींनीं ज्ञातिधर्मास अनुसरून ठेविला आहे" यावरून काय समजावें ? ज्याप्रमाणें गोपीनाथजींनीं ज्ञातीची बेपर्वा करून तीस ज्ञातीला विचारल्यावांचून आपल्या घरांत आणून ठेविलें, त्याच-प्रमाणें असें तरी कशावरून नसावें कीं, ती भ्रष्टच झाली नाहीं असें गृहित करून, ती घरांत ठेविली हें ज्ञाति-धर्मासच अनुसरून केलें ? अथवा ती पतित आहे असें कबूल करून तिला–

॥ वस्त्रान्नपानं देयंतु वसेयुश्च गृहांतिके॥

या मनुस्मृतीच्या व्यवस्थेनें ठेविली आहे? या दोहों पैकीं एकही स्पष्ट न होतां, हें किंवा तें ही संदिग्धता रहातें. तेव्हां या संदिग्ध जबाबावरून ज्ञातीची पूर्ण खातरी झाली कीं, मानकऱ्यांच्या सर्व तजविजी उडवा-उडवीच्या व लोकांस मुद्दाम अज्ञानांत ठेवण्याच्या आहेत. तथापि या सर्व कवायती करण्यास रा. रा. मोरोबा व त्यांचे इतर मंत्री खेरीज करून दुसरे दोन मानकरी बिचारे अजून पक्क झाले नाहींत, हें आह्मी समजतों. मोरोबानीं सही केल्याबरोबर त्यांनीं आपल्या निमूटपणें सह्या कराव्या इतकेंच त्यांस ठाऊक आहे. तस्मात् या व मागें प्रदर्शित केलेल्या कारणांवरून ज्ञातीनें जे त्यांस अधिकारावरून काढलें तें यथायोग्यच केलें.

तिर्यग्पशुवर्गास ज्ञान नसतें, ह्मणून त्यांस संबंध ह्मणजे काय, हें जसें कळत नसतें, तसेंच त्यांची बंधनेंही त्यांस नसतात. परंतु मनुष्य प्राणी तसा नव्हे. त्यास ईश्वरानें ज्ञान दिलें आहे, ह्मणून तो भिन्न भिन्न संबंध ओळखतो, व तदनुरूप बंधनेंही जाणतो. संबंध अनेक प्रकारचे असतात; परंतु त्या सर्वांत तीन प्रकार मुख्य आहेत, व बाकीचे गौण आहेत. पहिला आत्म अथवा जीवसंबंध, दुसरा शरीर अथवा जन्म संबंध, आणि तिसरा संपूर्ण व्यवहारसंबंध. पहिल्या संबंधापासून मनुष्यास धर्मबंधनें, दुसऱ्यापासून जाति-

बंधनें, व तिसऱ्यापासून व्यवहारबंधनें अथवा ऋणानुबंध, अशीं तीन प्रकारचीं बंधनें असतात. जिवाचा धनी ईश्वर, शरीराचे धनी आईबाप, व व्यवहाराचे धनी प्रत्येकासहित सर्व विश्व. प्रस्तुत आपणास या ठिकाणीं सर्व बंधनांचे विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं, ह्मणून त्यांच्या विस्ताराची गरज नाहीं. परंतु जातिबंधनाचा विचार करावयाचा आहे. हिंदुस्थान देश खेरीजकरून पृथ्वींतील बाकीच्या सर्व देशांत जातिभेद मानीत नाहींत, ह्मणून त्यांस तत्संबंधी शास्त्र नाहीं. परंतु आमच्या देशांत शास्त्रानें दिलेल्या मर्यादेनें जातिव्यवहार पाळतात, ह्मणूनच आमच्यांत जातिभेदाचें रक्षण झालें आहे; नाहीं तर तो केव्हांच नाहींसा होऊन इतर देशांप्रमाणें या हिंदुस्थानांतही वर्णसंकर झाला असतां. आमचा जातिभेद मोडण्याकरितां बाहेरील लोकांचे प्रयत्न तर चालू आहेतच. परंतु आह्मांतून कित्येक अतताई मनुष्यें "कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ" याप्रमाणें उत्पन्न होऊन त्या परकीय लोकांस सामील होतात, आणि आह्मांतच राहून जातिमर्यादा उल्लंघन करण्यास आंतून बनेल तितकें करीत असतात. पूर्वीं मुसलमान, पोर्तुगीझ, आदिकरून लोकांनीं आमच्यांतील कित्येक लोकांस जबरीनें बाटविलें, परंतु हल्लीं राणीसरकारच्या

राज्यांत जबरीनें बाटविण्याची सक्त मनाई आहे. जबरीनें बाटविणारांनीं या देशांतील राज्याचा उपभोग थोडाच वेळ घेतला हें इतिहासावरून समजतें. परंतु राणीसरकारच्या कारकीर्दींत जबरीनें बाटविण्याची सक्त मनाई असल्यामुळें या राज्यास बळकटी आली आहे हेंही आपण प्रत्यक्ष पहातों. जबरीनें बाटवितां येत नाहीं ह्मणून आतां इतर लोक अनेक प्रकारची लालूच दाखवून व उलटेंसुलटें समजावून मनुष्यांची बुद्धि फिरवितात, व त्यांस आत्मखुषीनेंच बाटण्यास प्रवृत्त करितात. ज्यांस स्वधर्माचें शिक्षण मिळालें नाहीं असे अनेक लोक अशा रीतीनें फसून भ्रष्ट झाले आहेत. यांपैकीं कित्येक लोक स्वतःचे जातीगोत सोडून उघड रीतीनें परके जातींत गेले आहेत; परंतु दुसरे कितीएक जाती कुटुंबांतच राहून अप्रसिद्ध रीतीनें ह्मणजे चोरूनछपून भ्रष्टतेचीं कर्में आचरीत आहेत. उघड बाटलेले बरे, परंतु चोरून भ्रष्टता वाढविणारे फारच घातकी समजले पाहिजेत, कारण ते प्रत्येक ज्ञातींत नाना तऱ्हेचे अनर्थ उत्पन्न करितात. अशा प्रकारच्या लोकांतून एखाद्याचें आचरण जर कोणास समजलें, आणि त्यानें तें ज्ञातीस सांगितलें, तर त्याचे दुसरे सोबती त्यास साहाय्य होऊन त्याचें कर्म झांकून नेतात; आणि तें कर्म पाहून सांगणारास खोटें पाडतात, अथवा त्यावर बदनक्षीचा आरोप

आणून कायद्याच्या एखाद्या बारकाईची खुबी लढवून धर्मशास्त्रास व न्यायशास्त्रास मागें हटवितात, आणि त्या बिचाऱ्या सांगणारास जबरा गोता भोगायास लावतात. या सुंदरा प्रकरणीं द्विधेंतदेखील असा प्रकार नाहींच, असें जरी खातरीनें बोलतां येत नाहीं, तथापि आहे असेंही ह्मणण्यास उघड प्रमाण दिसत नाहीं. यास्तव ज्याचा त्यानें मनोमय निश्चय करून तदनुसार आचरण ठेवावें, परंतु वाणीनें उच्चार करूं नये, हाच सुरक्षित मार्ग दिसतो.

परंतु या प्रकरणांत आह्मी रा॰ रा॰ नारायण भाई बरवे यांस शाबासकी देतों. परंपरेनें व पर्यायानें सर्व ज्ञातींचा संबंध तर या बाबतींत आहेच; परंतु त्यांच्या कुटुंबाचा जसा प्रत्यक्ष संबंध आहे, तसा ज्ञातींतून दुसरे थोड्यांचाच असेल. सदर्हू सुंदराची धाकटी बहीण यांच्या धाकट्या भावास दिलेली आहे, तेव्हां जेवणखाणाचें संघट्टण यांच्याशीं अगदीं निकट पडलें. यामुळें तसेंच यांच्यांत धर्मनिष्ठा जागृत असल्यावरून, त्यांस या प्रकरणीं आपलें धर्मसंरक्षण कसें करावें याची काळजी पडली. त्यावरून या कामांत त्यांनीं योग्य मार्गाचें अवलंबन करून, व मोठ्या धैर्यानें अग्रेसरपणा घेऊन, सर्व धर्मनिष्ठ आबालवृद्ध जातीकडून वाहवा मिळविली!!! पाहिलें असतां यांच्या घरांत यांजकडे वडील

पणाचें नातें नाहीं. यांचे वडील बंधु रा. रा. दीनानाथ भाई हे त्या घरांत सर्वांवर वडीलपणा मिरवितात; यावरून नारायणजीनीं हातीं धरलेलें काम प्रथम त्यांसच उचलून घेण्यास घटत होतें. परंतु दुर्दैवानें ते विरुद्ध पक्षांस जीवप्राण सामील झाल्यामुळें तें यांसच हातीं धरणें भाग पडलें. यावरून दिनाजींची सद्धर्मावर केवढी निष्ठा असेल हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे.

मानकऱ्याच्या बाजूच्या ज्ञातिपक्षानें ता० ६ डिसेंबरच्या सभेंत जे एकंदर ४ ठराव पसार केले आहेत, तेही नीट लक्ष लावून पाहिलें तर मोठी गम्मत दृष्टीस पडते. पहिल्या तीनच ठरावांवर, एकाहत्तर व पांच, शाहात्तर ज्ञातिगृहस्थांनीं सह्या केल्या आहेत; व शेवटील चौथ्या ठरावाखालीं फक्त मानकरी त्रिकुटानेंच केल्या आहेत. पहिले तीन ठराव त्यांनीं ता० २२ नव्हेंबर रोजीं आबालवृद्ध ज्ञातीनें केलेल्या ठरावांस पालथे पाडण्याच्या उद्देशानें केले आहेत; परंतू शेवटचा चौथा ठराव तर सुंदरीस " ज्ञातगंगे " च्या नांवानें पावन केल्याचा केला आहे. या शेवटील ठरावावर सर्व शाहात्तर आसामींनीं काय ह्मणून सह्या केल्या नाहींत? तो ठराव त्यांस मान्य नाहीं ह्मणूनच कीं काय ? अथवा असें करून त्यांनीं कोणती मोठी मार्मिक खुबी रडविली, नाहीं, लढविली आहे ? त्यांस मात्र वाटत असेल कीं, असें के-

त्यानें लोक कधींही न उलगडणाऱ्या गुढांत पडतील!!! पण आह्मी केवढे वस्ताद आहोंत हें त्यांच्या घमेंडीत त्यांस कोठून समजणार ? यांत बरेंच जोखीम आहे असें पाहून, " आलें गेलें ह्मातारीच्या बोडक्यावर, आपण बापडे कशांत कांहीं नाहीं " असा आपला भित्रेपणा मात्र त्यांनीं उघडकीस आणिला आहे, दुसरें कांहीं नाहीं. परंतु हे लोक आमच्या बोडक्यावर केवढें जोखीम ढकलीत आहेत याचें भान देखील या मानकऱ्यांस सह्या करितांना जर राहिलें नाहीं, तर हे किती विचारशून्य आहेत हें सहज समजण्याजोगें आहे. यांच्या सह्यांस " मानकरी " हीं अक्षरें जोडली ह्मणजे पुरें, मग त्यांस दुसरे कोणत्याच गोष्टींचा विचार नसला तरी चालतें !!! सदर्हु ठरावांत " ज्ञातगंगे "चें नांव बळेंच घुसविलें आहे. परंतु त्यांस पक्कें समजतें कीं, आह्मी शाहात्तर असामीच केवळ " ज्ञातगंगा " नाहीं. यावरून आह्मी या ठरावावर सह्या करूं, तर " ज्ञातगंगे " च्या मोठ्या प्रवाहापासून आह्मी आपणांस आपल्याच हातानें वेगळें पाडून घेऊं, या भीतीनें त्यांनीं त्या ठरावाखालीं सह्या न करितां, त्याचें सर्व जोखीम मानकऱ्यांच्याच डोक्यावर लाधलें आहे. असो, आतां या आमने सामने झालेल्या ठरावांचा निर्णय आह्मांस हाच सुयुक्त दिसतो कीं, जेथें अधिक संमतें असतील तेच ठराव कायमः

कमी असतील ते रद्द; आणि सर्वत्र व्यवहारही असाच आहे. ज्ञातीतील दोन पक्षांपैकीं कोणाकडे जास्त संमत्ति आहेत हें आतां पाहिलें पाहिजे. ज्ञातिपक्षांकडे जर सुमारें दोनशें सह्या आहेत, आणि सुंदरा उर्फ मानकरी पक्षाकडे जर मानकऱ्यासहित साऱ्या एकूणऐंशींच आहेत, तर लघुपक्षानें गुरुपक्षास शरण व्हावें, हाच योग्य न्याय दिसतो. या न्यायास अनुसरून जर हा लघुपक्ष शुद्धीवर न येतां हट्ट धरून बसेल, तर तो इष्ट परिणाम पाहणार नाहीं याची खूब आठवण ठेवावी; कारण हें धर्माचें प्रकरण आहे, दुसरें तिसरें नाहीं.

तुह्मी ह्मणाल यापूर्वींच्या दुसऱ्या गोष्टी ज्ञातीनें कशा चालूं दिल्या ? तर हा ज्ञातिचा अपराध नाहीं, परंतु मानकऱ्यांचाच आहे हें मागेंच सिद्ध केलें आहे. शि-वाय दुसऱ्या सर्व गोष्टी प्रस्तुतच्या प्रकरणा इतक्या गंभीर नाहींत. धाधांत यवनाबरोबर जाऊन आलेली ज्ञातींत घेतल्याचें एकही उदाहरण नाहीं, आणि हें पहि-लेंच आहे. यामुळें जेव्हां डोक्यावर पाणी चढूं लागलें असें ज्ञातीनें पाहिलें, तेव्हां आतां या मानकऱ्यांची वाट पहात बसणें फुकट आहे, व इतउत्तर हें साहून घेण्यास अवकाश कामाचा नाहीं, असें जाणून ज्ञातीनेंच बंदो-बस्त करण्याचें काम आपल्या हातांत घेतलें आहे. या-

बद्दल सर्व जरूरीच्या व्यवस्था लागल्या ह्मणजे ज्ञात दुसऱ्या प्रकरणाचाही क्रमानें विचार करील.

मनुष्यें जीं गुप्त कर्में करितात त्या सर्वांचा साक्षी फक्त ईश्वरच आहे, ह्मणून त्यांची पुस्ती घेणारही त्यावांचून दुसरें कोणी नाहीं. परंतु जीं कुकर्में उजेडास येतात त्यांची चौकशी ठेवून वृद्धि न होऊं देण्याचे इलाज करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. कारण तें काम ईश्वरानें मनुष्यावर सोंपवून दिलें आहे असें समजण्यास पुष्कळ आधार आहेत. प्रजेचे पापास राजा विभागी होतो, स्त्रियेच्या पापास तिचा पति विभागी होतो इत्यादि वचनें आपल्या शास्त्रांत पुष्कळ आढळतात. यावरून ज्ञातीच्या पापासही तिचे पंच व प्रवर्तक विभागी होतात असें मानण्यास हरकत नाहीं. शास्त्राच्या अशा आज्ञेवरून स्पष्ट होतें कीं, मनुष्यांनीं यासंबंधानें अनास्था हयगय अथवा कसर करूं नये असाच ईश्वरी संकेत आहे. अतएव कोणी एक गुप्त रीतीनें स्वतः भ्रष्ट होऊन पुनः ज्ञातीसही आपल्या संसर्गानें भ्रष्ट करितो, तर भ्रष्टतेचा दोष ज्ञातीस लागत नाहीं, परंतु असें करणाराच्या शिरावर दुप्पट दोष पडतो. पण सुंदरासारखें प्रसिद्ध प्रकरणाविषयीं जर डोळेझांक केली, तर कुकर्माची वृद्धि होण्यास दुसरें काय पाहिजे! या संबंधानें राजानें तर आपलें कर्त्तव्य बजाविलेंच आहे, परंतु आतां

ज्ञातीचें काम मात्र राहिलें आहे. कुकर्मांचा ऱ्हास करण्यास एकट्या राजाचा बंदोबस्त पुरा पडत नाहीं. या कामीं सामाजिक अथवा ज्ञातीचे, तसेंच प्रत्येक गृहचालक गृहस्थाचेही संयुक्त व्यवस्थेची आवश्यकता आहे. पृथ्वीवरील हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत आह्मी हें एक मोठें व्यंगच समजतों कीं, ज्ञातीचे, आईबापाचे, पतीचे इत्यादि जे शास्त्रोक्त अधिकार ते या व्यवस्थेंत बरेचअंशीं कमी झाले आहेत. उघडच आहे कीं, पृथ्वींत ज्या अर्थीं ज्ञातिभेद न मानणारे राजे झाले आहेत, त्या अर्थीं तत्संबंधी शास्त्राची त्यांस माहिती नाहीं; आणि असें आहे ह्मणूनच त्यांजकडून ही एक जबरदस्त चूक घडत आहे. या चुकीमुळें इंग्रजसरकारासारखे महान् महान् कुशळ व्यवस्था करणारे असूनही मोठमोठाले अनर्थ होण्याचे रहात नाहींत. इंग्रजी राज्याची बळकटी होण्याचे कारणांपैकीं एक त्यांची उत्कृष्ट व्यवस्था ही होय. इंग्रजांसारखे व्यवस्था ठेवण्यांत बहादर राजे इतिहासांत पूर्वी कोणी झाले नाहींत, अशी त्यांची सर्वतोमुखीं आख्या आहे. वाघबकरींस यांनीं एका ठिकाणीं पाणी प्यावयास लाविलें आहे. परंतु इतकेंही असून गुन्हे होण्याचें कोठें कमी झालें आहे! वर्षानुवर्ष अनेक हलके, मोठे व अघोर गुन्हे होतच असतात, हें आडमिनिस्ट्रेशन रिपोर्टवरून वाचणारांस ठाऊकच आहे. तसेंच अलीकडे

यूरोप व अमेरिकेंत राज्याधिकारास झुगारून लोकसत्तात्मक राज्याची ( रिपब्लिकन गव्हरन्मेंटची ) स्थापना करण्यामागें ते लोक लागले आहेत. अमेरिकेंत तर रिपब्लिकन पक्ष झालें असूनही तिकडील प्रजेस अजून स्वस्थतेचा उपभोग मिळत नाहीं. तर या सर्वांचें कारण काय ? एकीकडून राज्यव्यवस्था व दुसरे बाजूनें सामाजिक अथवा ज्ञातिव्यवस्था हे दोन्ही पक्ष जर स्वयंत्र चालतील तरच गुन्हे होण्याचें मान कमी होत जाईल. झालेल्या गुन्ह्यांस शासन करण्याचें मात्र राज्यसत्तेंत आहे, पण तें न होऊं देण्याचें नाहीं. प्रतिबंध करण्याचें काम ज्ञातीच्या सत्तेखालीं जसें आबाद चालण्याजोगें आहे, तसें राज्यसत्तेखालीं नाहीं. हल्लींच्या राज्यकर्त्यांस असें वाटतें कीं, सामाजिक व्यवस्था ही आह्मी आपल्या हातीं ठेवूं शकूं, परंतु आह्मीं वर ह्मटलें आहे त्याप्रमाणें एकटें सरकार सर्व ठिकाणीं पुरूं शकणार नाहीं. यास्तव राज्यकारभारांत दोन मुख्य तत्त्वें अवश्य असलीं पाहिजेत. तीं हींच कीं, पहिली सामाजिक अथवा ज्ञातिसत्ता, व दुसरी राज्यसत्ता. अशा उभय सत्तात्मक संयुक्त व्यवस्थेची आवश्यकता त्यांस जसजसे अनुभव येऊं लागतील तसतशी पुढें कळूं लागेल. कारण कीं, ते मोठे गंभीरपणानें विचार करणारे लोक आहेत. परंतु ते अन्य धर्मी असल्यामुळें ते आतांच आमच्या शास्त्रावरून घेणार नाहींत.

ईश्वर ज्यांस राज्यलक्ष्मी देतो त्यांस राजैश्वर्य भोगण्यास देतो हें जरी सत्य आहे, तरी त्यांचे मागें आपापले प्रजेस ईश्वरी धर्मनिरत ठेवण्याचें काम लावून दिलें आहे हें त्यांनीं विसरतां कामा नये. तस्मात् ही ईश्वरी चाकरी बजाविल्यावांचून राजांस राजैश्वर्य भोगण्याचा अधिकार नाहीं, हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें. बलाढ्य राजानें दुर्बळ राजाचें राज्य विनाकारण हिसकावून घ्यावें यासाठीं देव कोणास राज्य देत नाहीं, परंतु अधर्मी राजांस शिक्षा देण्याकरितां तो त्यांस बळ देत असतो. यावरून आपलेंच ऐश्वर्य वाढविण्याकरितां जे राजे दुसऱ्यांच्या राज्यावर डोळा ठेवून तें अन्यायानें व जबरीनें संपादन करण्याकरितां अघोर लढाया उभारतात अथवा कावित्रें रचितात, ते परिणामीं महान विपत्तींत पडतात. याचे दाखले आमच्या पुराणांत हिरण्यकश्यपूपासून रावणादिकांपर्यंत विपुल आहेत. सारांश बलवान राजाचा अधिकार अनीतिमान व अधर्मी राजांस शासन करण्याकरितां मात्र आहे, परंतु एकाद्या गरीब निरपराधी राजाच्या ऐश्वर्याचा अभिलाष धरून त्यास लुटण्याचा नाहीं. आतां कोणी ह्मणेल कीं, ज्ञातिप्रकरणांत राज्यप्रकरण घेण्याचें प्रयोजन काय? तर प्रजेंत जसे शिष्ट नष्ट असतात, तसेंच राजांतही तस-

त्यांचें दिग्दर्शन करण्यापुरता जितका भाग ओघास आला आहे तितका एथें घेतला आहे.

आपण आतां आपल्या प्रकरणाकडे वळूं. दुर्गुण अथवा दुराचरणांच्या वृद्धीची गति खुंटविण्याजोगी आह्मां हिंदूलोकांत पुरातन काळापासून चालत आलेली एक चाल फार उत्कृष्ठ होती. तिचा अलीकडे, निदान या मुंबईशहरांत तरी, फारच मोड झाला आहे. पूर्वी दरएक गांवांत प्रत्येक जातीचे सगळे लोक आपल्या जातीचे वेगवेगळे चव्हाठे करून त्यांत राहत असत. त्यावरून दरएक अशा चव्हाठ्यास त्यांत रहाणाऱ्या जातींचें नांव पडत असे; जसें ब्राह्मणआळी, परभूआळी, शिंपीआळी, सुतारआळी इत्यादि. या मुंबईत अजूनही तशीं नांवें कांहीं कांहीं ठिकाणीं आहेत. पूर्वींच्या वस्तीची फांकाफांक झाल्यामुळें कित्येक ठिकाणचीं तीं नांवें नांवाचींच राहिलीं आहेत. मार्किटाजवळ जुमामशिदीच्या उत्तरेस सुतारचाळींत सुतारलोक रहात असत, पण आतां तेथें एक सुताराचें घर सांपडेल तर हराम. जीस गुजरलोक चांपागह्ली ह्मणतात, तीस महाराष्ट्रलोक अजूनही खतरआळीच्या नांवानें ओळखतात, परंतु हल्लीं तेथें एकदेखील खतरी सांपडावयाचा नाहीं. याचप्रमाणें शिंपीआळींत देखील वाणी, बोहोरी व मुसलमान घुसून शिंप्यांची वस्ती फार पातळ झाली आहे, व त्यांची जिकडे

तिकडे फांकाफांक झाली आहे. वर ह्मटलेल्या आह्मां हिंदूलोकांच्या चालीस टिकाव देणारी अशी दुसरी एक चाल असे. ती ही कीं, एखाद्यास प्रसंगानुसार आपलें घर विकावयाचें असलें, तर तें त्यानें जातीच्यासच विकावें, पण आपल्या चव्हाठ्यांत दुसरे जातीचा प्रवेश होऊं देऊं नये. या दोन्ही चाली मोडल्यामुळें, आह्मां उंच जातीचे हिंदूलोकांस तर राहण्याच्या बाबतींत अलीकडे फारच विपत्ति भोगाव्या लागत आहेत. याप्रमाणें बहुतकरून, निदान महाराष्ट्रभाषा बोलणाऱ्या, प्रत्येक जातीची फुटाफूट होऊन, सर्व मिश्र व बकाल वस्ती झाली आहे. प्रत्येक जात जमावानें एकत्र राहण्यांत पुष्कळच फायदे आहेत; परंतु त्यांत मुख्य फायदे हे आहेत कीं, त्यामुळें धर्माचें संरक्षण होतें; जातीच्या धाकामुळें कुकर्मास फट अथवा अवकाश मिळत नाहीं; सर्वांवर परस्पर नजर असल्यानें कोणाचाही एकाएकीं वांकडा पाय पडण्याचा संभव रहात नाहीं; एकी, स्नेहभाव व परस्पर सत्काराची वृद्धि होते; एकीच्या हिमतीनें मनुष्यांत धैर्य व पुरुषार्थ वाढतात; व लोकांत सद्गुणांस उत्तेजन व दुर्गुणांचा तिरस्कार, ही प्रवृत्ति बलवान होते; आणि येणेंकरून शेवटीं सद्गुणाची वृद्धि व दुर्गुणांचा ऱ्हास होतो. हे व यांसारखे दुसरे अनेक फायदे आहेत, ह्मणूनच " जातीसाठीं माती खावी, पण तिला सोडून

कधींही वेगळें राहूं नये " अशी जी वाडवडिलांनीं म्हण करून ठेविली आहे ती सर्वथैव खरी आहे. परंतु सर्व फुटाफूट झाल्यामुळें या म्हणीचें महत्त्व आमचे लोक अगदीं जाणत नाहींतसे झाले आहेत. अलीकडील लोकांत असें म्हणण्याची चाल पडून गेली आहे कीं, "जात आम्हांस काय देते ?" पण जात कांहीं न देतां जें देते तें लाखों रुपये खर्चूनही मिळण्याजोगें नाहीं, याचा विचार त्यांस कोठें आहे? एखादे सैन्याची फांकाफांक झाल्यावर लढाई जिंकण्यास जसा वीरास अवकाश लागत नाहीं, त्याचप्रमाणें फांकाफांक झालेल्या ज्ञातींत एखादे दुष्ट दुराचारी मनुष्यास आपले सर्व मतलब साधून घेण्यास कठीण पडत नाहीं. आमचे गोपिनाथजी सर्व जातपात सोडून एकट्या घरानें जाऊन गिरगांवांत राहिले आहेत, व जमावांत राहण्याच्या महत्त्वास विसरून जातीची बेपर्वा करूं लागले आहेत. ते स्वतः प्रौढ असल्यामुळें त्यांचें तसें करणें कदाचित चालण्याजोगें असेल. परंतु त्यांनीं आपल्या अगदीं कच्चे उंबरीच्या जांवयास तर त्यांच्याही पलिकडे जाऊं देऊन त्यास आपल्या अल्पवयी मुलीसुद्धां थेट दादरावर, जेथें वाडवडिलांपैकीं कोणाचीही देखरेख त्या अज्ञान जोडप्यावर नाहीं, आणि जातीचीही नजर नाहीं, अशा दूरच्या ठिकाणीं राहूं दिले ही त्यांनीं मोठी

हत्तीएवढी स्थूल चुकी केली यांत अगदीं संशय नाहीं. तेव्हां ती मुलगी अशा प्रकारची निघाली यांत नवल काय?

परंतु आतां तरी आमचे लोक या प्रसंगावरून धडा घेतील काय ? " जातीसाठीं माती खावी " या ह्मणीस ते आपल्या हृदयावर, विस्मृतीनें पुसून न जाणाऱ्या अशा बळकट स्मृतीच्या अक्षरांनीं, कोरून ठेवतील काय ? आमचे लोकांस जातींतच बिऱ्हाड मिळण्याची एकीकडून तर मोठीच पंचाईत आहे ! आणि दुसरीकडून पहावें तर ज्यांस नारायणानें थोडीबहुत इस्टेट दिली आहे, अथवा विशेष स्पष्ट ह्मणावें तर, ज्यांपाशीं ती आतां शिल्लक राहिली आहे, ते अशी विपत्ति पाहूनदेखील आपल्या घरांत वाणी, मुलतानी लोकांस जागा देतात, पण जातीच्यांस देत नाहींत, ही फारच दिलगिरीची गोष्ट आहे. असें केल्यानें कदाचित् त्यांस जास्त भाडें उत्पन्न होत असेल, हें आह्मी कबूल करितों. तथापि आह्मी असें ह्मणतों कीं, जर त्यांच्यांत किंचितही जात्यभिमान जागृत असेल, तर थोडीशी घस सोसूनही त्यांनीं वरील ह्मण खरी करून दाखवून गरीब लोकांस धडा घालून द्यावा, व असें करतील तरच त्यांचें वजन जातींत वाढेल. ते ह्मणतील आमच्या जागा मोठे भाड्याच्या आहेत, तर आज आमच्यांत एक एक गृहस्थ पंधरा वीस रुपये पर्यंत दरमहा भाडें भरून रहाणारे असे असामी

थोडे नाहींत. वागी, मुलतानी, भंगसाळी इत्यादि लोकांस आमचे लोकांचे घरांत रहावयास चालतें; परंतु त्यांचे घरांत जर जागा रिकामी असली, व ती जर आमचे लोकांनीं मागितली, तर ते त्यांस देत नाहींत. आणि साफ ह्मणतात कीं, वाण्यांचे घरांत दुसरे जातीस जागा मिळावयाची नाहीं. आठ रुपये दरमहाचे जागेस आह्मीं बारा रुपये भाडें देण्यास कबूल झालों, तरी ते सांगतात कीं, तुह्मीं वीस रुपये केलेत तरी आह्मी वाण्यास आठच रुपयांस देऊं, पण तुह्मांस देणार नाहीं. या लोकांसारखा जात्याभिमानाचा निग्रह धरण्याचें आमचे लोकांस केव्हां समजूं लागेल? हें तर अजून समजत नाहीं, आणि असे विपरीत प्रकार घडले ह्मणजे मग कपाळावर हात कशासाठीं बडवितात? अशा रीतीनें मोठे लोकांनीं गरीब लोकांस आपल्या अंगावेगळें टाकलें तरी ते बिचारे आपला निर्वाह कसातरी विपत्तींतही करतील, पण त्यांच्यांत असें नाक कापण्याचें कर्म एकाएकीं होण्याचें भय नाहीं. जें व्हावयाचें तें चांगल्या चांगल्या ह्मटलेल्या ठिकाणींच होण्याचा संभव जास्त आहे, हें इस्टेटवाले लोकांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

हिंदुधर्मशास्त्रांत उंच प्रतीचा हिंदु हलके जातीचे हिंदुसंगतीं भ्रष्ट झाला, तर त्यासच मात्र भिन्न भिन्न प्रकारचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत; परंतु हिंदुधर्म-

बाह्य अशा कोणत्याही अविदासंगतीं भ्रष्ट झाल्यावर प्रायश्चित्तच नाहीं, अर्थात् तो यावद्देह पावन होऊं शकत नाहीं. सुंदरापक्षधुरंधर मंडळीस मानकऱ्यांच्या गाढ निद्रेचा वारा लागून ते ह्मणतात कीं, बंदोबस्ताची अपेक्षा करणारांनीं विनाकारण उतावळी केली. परंतु त्यांस माहीत आहे काय, कीं पतिताचा घटस्फोट केल्यावर त्यासंगतीं भाषणसुद्धां करूं नये अशी शास्त्राज्ञा आहे ती ?

॥ दासी घटमपां पूर्णं पर्यस्येत्प्रेतवत्पदा ॥ अहो रात्र- ॥
॥ मुपासीरन्न शौचं बांधवैः सह ॥ १८३ ॥ निवर्तेरंश्च ॥
॥ तमात्तु संभाषण सहासने ॥ दायाद्यस्य प्रदानंच ॥
॥ यात्राचैव हि लौकिकी ॥ १८४ ॥

मनुस्मृतिः अध्याय ११

आणि गोपिनाथजींनीं तर या शास्त्राज्ञेस गुंढाळून तिला बिनघोर आपल्या घरांत ठेविलें आहे ! !! तरी या गोष्टीचा कोणीं विचार करूं नये, खबरदार, जर कोणी विचार करील तर त्यावर आह्मीं उतावळी केल्याचा आरोप ठेवूं, अशी दटावणी दाखविल्यानें धर्मनिष्ठ जात त्यांस जुमानील काय ? कधीं जुमानणार नाहीं. हे ह्मणतील कीं, आह्मी बाटूं व तुह्मांसही बाटवूं, तर स्वधर्मीत स्थित होऊं इच्छिणारी जात कसें कबूल करील ? तस्मात् ज तीनें याप्रमाणें त्यांस न जुमानतां सभा वगैरे

भरवून आजपर्यंत जीं कामें केलीं तीं सर्व निर्दोष, निर्विवाद व यथाशास्त्रच केलीं असें त्या पक्षानें जाणण्यास आतां शिकावें; व उगीच खोटे खोटे आरोप लागू पाडण्याचे, व तसें करून आपणच मोठेपणा खाटला असें मानण्याचे घमेंडींत पडण्याचें सोडून द्यावें.

पुंडलीकवरदा हरिविठ्ठल.

# स्वदेशप्रीति
अथवा
# स्वदेशभक्ति.

रेवरेंड लनसाहेबांचें व्याख्यान.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ५७
ठाणें सन १८९..

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ~~१५~~
ठाणें सन १८९.

मुंबईत,
सुबोधप्रकाश छापखान्यांत छापिलें.
सन १८८९.
किंमत दोन आणे.

# प्रस्तावना.

पुढील व्याख्यान सुबोधपत्रिकेच्या सहा अंकांत पूर्वी छापून प्रसिद्ध केलें होतें. स्थलसंकोच्यामुळें त्यावेळीं तें लागोपाठ छापतां आलें नाहीं. असा लेख एक्या बैठकीस साद्यंत वाचण्यांत आल्याखेरीज त्याचा अंत:करणावर जसा ठसा उमटावा तसा उमटत नाहीं. तसेंच, आमच्यांत खरें राष्ट्रत्व उत्पन्न होऊन देशोन्नति होण्याचे जे उपाय आहेत, त्यांतील राष्ट्रीय सभेचा उद्योग हा एक होय. प्रांतिक व नागरिक अभिमान, धर्मभिन्नत्व, ज्ञातीभेद, विद्या व धन मद यांचा ताठा, अहंपणा, इत्यादिकांचे जाळांत न सांपडतां, कायावाचामनें करून झटून त्या सभेचें पाऊल दिवसानुदिवस पुढें पाडणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या कर्तव्याची आठवण आमच्या देशबांधवांस करण्यास हें व्याख्यान प्रस्तुत प्रसंगीं बरेंच उपयोगी पडेल असें मनांत आणून आह्मीं तें हल्लीं पुस्तकरूपानें छापिलें आहे. लेखनप्रमादामुळें पूर्वीं ज्या चुका राहिल्या होत्या त्या दुरुस्त करून एक दोन स्थलीं किंचित् फेरफारही केला आहे. मूळ इंग्रजी व्याख्यान अति सुरस, मार्मिक व अति मनोहर असून, अत्यंत महत्वाच्या व पराकाष्ठेच्या विचारणीय विचारांनीं ओतप्रोत भरलेलें आहे. त्याचा सर्वस्वी रसपरिपाक मराठींत उतरणें कठिण. तथापि व्याख्यानांतील मुख्य मुद्दे व व्याख्यानकाराचा एकंदर आशय जितका आणवेल तितका पुढील सारांशांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. आतां तो यत्न कितपत सिद्धीस गेला आहे त्याच्या निर्णयाचें काम आमच्या रसिक, गुणग्राही व मार्मिक वांचकावरच आह्मीं सोंपवितों.

नि नं. १५ ... छापे सन १८९६

# स्वदेशप्रीति अथवा स्वदेशभक्ति.

मद्रास मधील कुंभकोनम कालेजांतील विद्यार्थ्यांच्या युनियनक्लबापुढें रेव्हरेन्ड एच. एस. लन, एम. डी. यांनीं तारीख ६ आकटोबर शनिवार रोजीं वरील विषयावर इंग्रजींत अति मधुर व सुरस व्याख्यान दिलें. स्थलसंकोचामुळें वरील व्याख्यानाचें साद्यंत भाषांतर आमच्यानें देववत नाहीं, सबब त्यांतील मुख्य मुद्यांचा व व्याख्यात्याच्या एकंदर आशयाचा सारांश आह्मी खालीं देतों.

ते ह्मणाले:—इतर मंडळ्यांपुढें बोलण्यापेक्षां ह्या स्थळीं आज जमलेल्या मंडळीपुढें बोलण्यास मला फार आनंद वाटतो. विद्यार्थ्यांनीं एकत्र जमून एकमेकांशीं बोलण्यांत, व नानाविध विषयांचा विचार व चर्चा करण्यांत, नियमित स्थळीं, नियमित काल घालविला असतां, तो काल, मनुष्यांत जे जे ह्मणून कांहीं उत्तम गुण आहेत त्यांस स्फूर्ति देऊन त्यांचा विकास करण्यास, व तद्द्वारा मनुष्यास चांगल्या योग्यतेस चढविण्यास जसा उपयोगी पडतो, तसा विद्यालयांमधील दुसरा कोणताच काल उपयोगी पडत नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे. हें स्थल व ही मंडळी तशा प्रकारची असल्यानें येथें बोलण्यास मला विशेष आनंद वाटतो.

डब्लिन येथील विश्वविद्यालयाची "कॉलेज हिस्टारीकल सोसायटी" या नांवाची मंडळी ऐर्लंडांत स्थापन होऊन सुमारें १४० वर्षें झालीं. इंग्लिश भाषेंत नानाविध विषयांवर वादविवाद करण्यासाठीं ज्या आजवर मंडळ्या स्थापन झाल्या आहेत त्यांत हीच आद्य होय. प्रसिद्ध वक्ते एडमंड बर्क

हे इचे पहिले चिटणीस होते. तींत ऐतिहासिक व इतर अनेक विषयांचा विचार व वादविवाद होत असतो. तेथें बोलण्याचा मलाही कधीं कधीं प्रसंग येत असे. त्या मंडळीशीं ठेविलेला संबंध आपल्या उन्नतीस पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला, असें नानाविध उद्योगांत व व्यवसायांत कीर्ति मिळविलेल्या अनेक गृहस्थांनीं प्रांजलपणें कबूल केलें आहे. त्या मंडळीच्या वृत्तांताचा व आपल्या आजच्या विषयाचा फार निकट संबंध आहे. ऐर्लंडांत निस्सीम स्वदेशाभिमानी पुरुष अगर स्वदेशभक्त उत्पन्न होण्याचें तर तें ठिकाणच होऊन राहिलें आहे. त्या स्थळीं झालेल्या वादविवादाच्या योगानें ज्यांच्या अंतःकरणांत निस्सीम व उत्कट स्वदेशप्रीति व भक्ति उत्पन्न झाली आहे, आपलें जीवित हें स्वतंत्रता व स्वदेश स्वातंत्र्य यांकरितांच आहे, व तत्प्रीत्यर्थ आपलें ह्मणून जें जें कांहीं आहे तें तें सर्वस्वी वेंचण्याचा ज्यांचा दृढनिश्चय झाला आहे, अशा अनेक भाग्यशाली पुरुषांपैकींच लार्ड एडवर्ड फिट्सजिराल्ड, ऐझ्याक बट्ट, जान ब्लेक, डीलन प्रभृति मंडळी होय.

स्वदेशप्रीति अथवा स्वदेशभक्ति याच विषयावर आज येथें मी बोलण्याचें जे योजिलें आहे, त्याचीं कारणें दोन आहेत. या विषयाचें आस्थापूर्वक अध्ययन व मनन प्रत्येक व्यक्तिमात्रानें केलें पाहिजे हें एक, व अशा विषयाचा ऊहापोह व चर्चा अशा क्लबांत अगर मंडळींत होणें अत्यंत इष्ट आहे हें दुसरें. आणखी, पूर्वी सारखा शिथिलतेचा व उदासीनतेचा हा काल नव्हे. हल्लींचा काळ चळवळीचा व गडबडीचा आहे. आपल्या प्रजेस कोण अधिक गांजितो अशी ज्यांची चढाओढ लागली होती, अशा अनेक जुलमी राजांच्या अंमलाखालीं हा देश

शेकडों वर्षे राहिल्यानें, त्याच्या राष्ट्रीय महत्वाकांक्षांचा समूल नाश झाला. शंभर वर्षांमागें हिंदुसमाजापुढें प्रस्तुत विषयावर भाषण करणें अगदींच अनुचित व अप्रासंगिक झालें असतें. परंतु तो काल आतां निघून गेला. ज्या स्थितीचा गंध देखील तुमच्या पूर्वजांत मिळाला नाहीं तिचा विक्टोरीया महाराणीच्या अंमलांत तुह्मी आज प्रत्यक्ष उपभोग घेत आहां. केवळ माणुसकीवर अगर मानवी स्वभावाच्या चांगूलपणावर विश्वास ठेऊन, विजयी राष्ट्रानें जिंकिलेल्या राष्ट्रांतील लोकांस, मोठ्या धैर्यानें व उदार बुद्धीनें शिक्षण दिल्याचें उदाहरण जगाच्या इतिहासांत कोठें आढळत नाहीं. परंतु आपल्या इंग्लिश सरकारानें आपल्या छत्राखालीं असणाऱ्या इकडील मोठमोठ्या राष्ट्रांतील असंख्य प्रजेस शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला आहे. उच्च प्रतीचें शिक्षण मिळून इश्वरेच्छेनें, हिंदुसमाजाच्या आचारविचारांच्या मार्गदर्शकत्वाचें आधिपत्य सुशिक्षितांस प्राप्त व्हावें या हेतूनें आपल्या सरकारानें, सर्वमान्य व लोकोत्तर ग्रंथकारांचे ग्रंथ, स्वातंत्र्याकरितां झालेल्या अनेक तुमुल युद्धांचीं व झटापटींचीं साद्यंत वर्णनें लिहिलीं असलेले इतिहास, उत्तम वक्त्यांनीं गाइलेले स्वातंत्र्याचे पोंवाडे, हीं या देशांतील विद्यालयांत क्रामिक पुस्तकें ह्मणून चालू केलीं आहेत. मग शंभर वर्षांपूर्वी ज्या गोष्टी अगदीं असंभाव्य, स्वप्नप्राय, अथवा मृगजलवत् भासत असत, त्या सांप्रत मूर्तीमंत व प्रत्यक्ष घडूं लागल्या आहेत ह्यांत नवल तें कोणतें ?

आपल्या जन्मभूमीसाठीं अथवा स्वदेशासाठीं मरणें हें अत्यंत उचित व सुखप्रद आहे अशी एका रोमन कवीची अत्युत्कृष्ट उक्ति आहे. ही उक्ति आधारभूत घेऊन शंभरवर्षांपूर्वीं मजसार-

ख्यानें तुह्मांपुढें बोलणें ह्मणजे तें अनुपमेय साहस झालें असतें, परंतु आज तसें करण्यास मःझ्यांत विशेष धैर्य असण्याची जरूर नाहीं. त्या उक्तीचा विचार करूं लागलें ह्मणजे पुढील प्रश्न प्रथम उत्पन्न होतात. सांप्रतचे तरूण हिंदु, जन्मभूमि अथवा स्वदेश या शब्दाचा अर्थ काय करतात किंवा समजतात? जन्मभूमि अथवा स्वदेश ह्मणून त्यांस कांहीं आहे काय? आपण अमक्या एका देशाचे किंवा राष्ट्राचे आहोंत असें ते आपल्यास खरोखर ह्मणवितात काय? अथवा, आपण ज्या स्थळीं उपजलों व ज्या जातींत जन्मलों, त्या स्थलाच्या किंवा जातीच्या हितापलीकडे दुसरें कांहीं नाहीं असेंच ह्मणण्याचें त्यांचे नशिबीं लिहिलेलें आहे? तुह्मांपैकीं प्रत्येकजण ह्या प्रश्नांचें जसें उत्तर देईल त्यावर ह्या देशाचें हिताहित सर्वस्वी अवलंबून आहे.

जन्मभूमि किंवा स्वदेश याचे दोन अर्थ केलेले आहेत. जन्मभूमि किंवा स्वदेश ही आपली साधारण किंवा सर्वांची माता होय हा एक अर्थ. आणि स्वदेश हा आपल्या पूर्वजांचें ठिकाण, अगर आपल्या वाडवडिलांची वतनवाडी आहे असा दुसरा अर्थ. हा दुसरा अर्थ रोमन लोकांनीं स्वीकारिला होता. आपल्या वाडवडिलांच्या वतनवाडीचें व ठिकाणाचे वारस, हक्कदार व उपभोक्ते आपण आहोंत; राष्ट्रांत राहणारा एकंदर लोक समाज हा आपल्या स्वदेशाचे एकवट केलेलें बल आहे; देशांत राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबांतील कर्ते किंवा प्रमुख पुरूष हे वंशपरंपरेनें चालत आलेल्या आपल्या स्वदेशरूपी वतनवाडीचे संरक्षक आहेत; असें ते मानीत असत; व त्या कारणानेंच त्यांच्या स्वदेशप्रीतीस मोठा जोम आला. जन्मभूमि अथवा स्वदेश या शब्दाचा पूर्वोक्त दुसरा अर्थ स्वीका

मराठी ... ग्रंथालय
नं०
ठाणें सन १८९



त्यामुळें त्यांच्यांत बाणेदार व खरें राष्ट्रत्व उत्पन्न झालें. रोमन आहें असें कोणी ह्मटल्यास तो सात टेंकड्यांत वसलेल्या रोम शहरांतीलच आहे असें कोणी समजत नसे. रोमन सत्तेच्या छत्राखालीं राहणारा प्रत्येक मनुष्य आपल्यास रोमन असें ह्मणवून आपल्या सर्व देशबांधवांविषयीं अत्यंत कळकळ व बंधुप्रीति ही अंतःकरणांत सदोदित जागृत ठेवीत असे. परंतु ग्रीस देशांत असा प्रकार नव्हता. त्या देशांत जो ज्या शहरांत किंवा त्याच्या आसपास जन्मला असेल त्यास त्या शहराविषयीं मात्र अभिमान व प्रीति असे. या निरनिराळ्या दोन प्रकारांचा परिणाम वरील दोन देशांवर किती चमत्कारिक झाला तो चांगला ध्यानांत येण्यासाठीं त्या दोन्ही देशांच्या इतिहासाचें थोडकें निरूपण केलें पाहिजे.

आतां आपण प्रथम ग्रीस देशाच्या इतिहासाचा थोडा विचार करूं. फार प्राचीन काळीं खऱ्या राष्ट्रत्वाचें व एकीचें कांहींसें वारें त्याच्या अंगीं येऊन त्या देशांतील मोठमोठे सरदार एकत्र झाले; आणि त्यांनीं ट्रॉय येथील लोकांचा पराभव करून त्यांचीं सत्ता नाहींशी केली असें होमर कवीच्या अत्युत्कृष्ट काव्यावरून आपल्यास समजतें. परंतु त्यानंतर इसवी सनाच्या पूर्वीं ४९० व्या वर्षापर्यंत पुनः तसा प्रकार तेथें घडून आल्याचें आढळत नाहीं. पर्शिया अगर इराण देशांतील डरायस नामक राजानें सदरील सालीं ग्रीस देशावर स्वारी केली, त्या प्रसंगीं आपसांतील विरोध व प्रतिस्पर्धा कांहींशी विसरून सर्व ग्रीक लोक एकवट व एकदील झाले. स्पार्टानें अथेन्स एथील लोकांस पुढारीपणा घेऊं देऊन म्याराथान एथील रणभूमीवर डरायसाच्या सैन्याचा पराभव केला. पुढें दहा वर्षांनीं दहा ल-

क्ष फौजेनिशीं क्झरक्सेस यानें त्या देशावर स्वारी केली. हें एवढें प्रचंड सैन्य लीआनिडास यानें आपल्या तीनशें स्पार्टन लोकांनिशीं थरमापली एथें अडवून धारिलें होतें. नंतर ग्रीस देशाच्या एकत्र झालेल्या आरमारानें सालामीस एथें त्या सैन्याची दाणादाण करून सोडिली. शेवटीं स्पार्टा एथील पौसेनीअस यास प्रमुखत्व देऊन सर्व ग्रीस देशांतील एकत्र झालेल्या सैन्यानें प्लाटीया येथें सदर सैन्याचा अगदीं मोड करून टाकिला. माराथान, थरमापली, सालामीस व प्लाटिया हीं चारीं स्थळें ग्रीस देशांतील निरनिराळ्या शहरांचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांनीं एकत्र व एकदील होऊन परशत्रूचा पराभव केल्याची साक्ष आहेत, इतकेंच नाहीं, तर जोंपर्यंत त्या देशाचा इतिहास जगांत उपलब्ध राहील तोंपर्यंत, तीं स्थळें सर्व जगतास आल्हादाश्चर्य करणारीं व स्वदेशाभिमानी लोकांचे अंगीं स्फुरण आणणारीं होतील यांत संदेह नाहीं. बाहेरील परचक्रामुळें या देशांतील सर्व लोकांचें एकदील झालें होतें. पण परचक्राचें निवारण झाल्यावर तो एकदीलपणाही हळुहळु नाहींसा होत गेला. पर्शियानें केलेल्या स्वारीच्या पुढील शतकांत अथेन्स, थीब्स आणि स्पार्टा, या तिन्हीं शहरांच्या लोकांमध्यें वर्चस्वाबद्दल कलह मातला. या आपसांतील कलहानें म्यासिडोन एथील फिलिप राजास ग्रीस देश जिंकण्यास आयतीच संधी मिळाली.

ग्रीस देशाच्या इतिहासाचें जें आपण आतां अल्प पुनरीक्षण व निरूपण केलें त्या वरून दोन गोष्टी आपल्यास कळतात. पहिली गोष्ट ही कीं, जेव्हां त्या देशांतील लोकांची एकी अगर एकदिल झालें तेव्हां त्या देशावर आ-

लेल्या अति मोठ्या व राक्षसी परचक्राचें निवारण त्यांस उत्तम रीतीनें करतां आलें. आणि दुसरी गोष्ट ही कीं, मोठमोठे सेनानायक, धुरंधर राजनीतिज्ञ, उत्तम वक्ते, तत्ववेत्ते, नाटककार, शिल्पकार, मूर्तिकार, तसेच ज्यांनीं ज्या शहराचें आपल्यांस ह्मणविलें त्या शहराचे हितापरता आपला महा स्वार्थ नाहीं असा ज्यांचा सिद्धांत, त्या शहरच्या संरक्षणाकरितां आपल्या प्राणाची आहुती देण्याबद्दल एका पायावर उभे असण्याचा सदैव ज्यांचा निर्धार, जे केवळ शौर्याचे निधीच, असे अनेक गुण संपन्न लोक जरी त्या देशांत होते, तरी खरें राष्ट्रत्व त्यांच्यांत उत्पन्न झालें नसल्यानें, त्यांच्यांतील एकी व एकदिलपणा हळू हळू नष्ट होत जाऊन शेवटीं अगदीं यःकश्चित व अर्धवट रानटी स्थितींतील एका राजानें त्यांस जिंकून आपले गुलाम बनविले. आपल्या देशाची जेथवर मर्यादा असेल तींतील सर्व स्थळें आपलीं आहेत असें मानणें, त्या प्रत्येक स्थळाबद्दल सारखा कळवळा व अभिमान बाळगणें, आपल्या देशाच्या कल्याणाकरितां कायावाचामनेंकरून झटणें, स्वहितापेक्षां स्वदेशहित हाच महा स्वार्थ मानणें, परचक्रापासून स्वदेशाच्यासंरक्षणाकरितां आपले प्राण देखील वेंचण्यास तयार असणें, इत्यादि खऱ्या राष्ट्राभिमानाची अगर स्वदेशप्रीतीचीं महत्तत्वें होत. ग्रीक लोकांनीं अशा प्रकारच्या राष्ट्राभिमानाचा स्वीकार न करितां प्रांतिक व नागरिकअभिमान स्वीकारिला; व हेंच पूर्वोक्त अनर्थ त्यांजवर ओढवण्याचें मुख्य इंगित होय. रोमन लोकांचा प्रकार यांच्या अगदीं उलट होता असें आपल्यास आतां कळून येईल.

आतां रोमन लोकांच्या इतिहासाकडे आपण जरा वळूं. रोमन लोकांनीं ग्रीक लोकांच्या अगदीं उलट असा प्रकार स्वीकारिल्यानें ज्या शतकांत ग्रीस देशाचा अगदीं ऱ्हास होत गेला त्याच शतकांत रोमन लोकांच्या उत्कर्षाचा पाया पडला. या मुदतींत रोमन लोकांनीं दक्षिण इट्रूरिआ, दुसरीं पुष्कळ ल्याटीन भाषा बोलणारीं शहरें, व फार प्राचीन काळापासून त्यांच्याशीं हाडवैर करणाऱ्या दोन जातींचे लोक, इतके जिंकिले. जिंकिलेले लोक पुनः प्रबल होऊन आपल्याशीं विरोध करितील अथवा त्यांचें डोकें कधींच वर न होतां ते सदा सर्वदा आपल्या दास्यत्वांतच राहतील, असा तह रोमन लोकांनीं त्यांच्याशीं केला नाहीं. जिंकिलेल्या लोकांपैकीं कांहींस आपल्या राष्ट्रास जोडून अथवा सामील करून आपल्या प्रजेप्रमाणें सर्व हक्क त्यांस दिले. आणि इतरांशीं फार निकट व आदरणीय मित्र संबंध ठेऊन तदनुसार त्यांनीं त्यांच्याशीं वर्त्तन केलें. या स्तुत्य, दूरदर्शी व हितपरिणामी राजनीतीनें रोमन लोकांची सत्ता चोहींकडे भराभर पसरत चालली. पुढील पाऊणशें वर्षांच्या अवधींतच इटली देशांतील बहुतेक संस्थानांचें ऐक्य झालें. हाच क्रम पुढें कित्येक वर्षें चालू राहून रोमन राष्ट्र फार प्रबळ झालें. शेवटीं पश्चिमेकडील कार्थेज व पूर्वेकडील म्यासिडन हींही जिंकून तत्कालिन सुधारलेल्या सर्व राष्ट्रांची राजसूत्रें त्यांच्या हातीं गेलीं आणि ते निरंकुश सर्व सत्ताधीश झाले. आपापसांतील कलहामुळें ग्रीस राष्ट्र रसातळास गेलें. आणि एकी व एकदिली यांच्या योगानें रोमन राष्ट्राचा उत्कर्ष होऊन तें शेवटीं सार्वभौमत्व पावलें. आतां राष्ट्रत्व व स्वदेशप्रीति यांची कल्पना केवळ काल्पनिक, निरर्थक, दुर्लभ किंवा दुःसाध्य आहे असें

नाहीं, तर ती ज्या मानानें ज्या देशांत वसत असेल त्या मानानें त्या देशाच्या उत्कर्षास किंवा अपकर्षास मुख्य कारण होते, असें दोन्ही राष्ट्रांच्या वरील अल्प इतिहासावरून आपल्या ध्यानांत आलेंच असेल. इटाली देशांतील अनेक जातींच्या लोकांत रोमन लोकांनीं जसें खरें राष्ट्रत्व किंवा स्वदेशाभिमान उत्पन्न केला, तद्वत् हिमालयापासून तहत केप कामोरिनपर्यंत पसरणाऱ्या या विस्तीर्ण देशांत राहणाऱ्या अनेक जातींच्या लोकांत खरें राष्ट्रत्व किंवा खरा स्वदेशाभिमान उत्पन्न होईल काय असा प्रश्न, स्वदेशाविषयीं खरा कळवळा बाळगणाऱ्या हिंदूंच्या पुढें येऊन उभा रहातो.

ग्रीस व रोम एथें जे लोक रहात होते ते एका धर्माचे, एका जातीचे, व एक भाषा बोलणारे असे होते. त्या देशांत राष्ट्रत्व किंवा देशाभिमान उत्पन्न करण्यास या गोष्टींची अनुकुलता पुष्कळ अंशीं कारण झाली. आतां हा देश पहावा तर अगोदरच फार विस्तृत व अवाढव्य आहे. आणि यांत रहाणारे लोकही अनेक भिन्नाभिन्न भाषांचे, नाना जातींचे, नानाविध धर्मांचे व अनेक धर्म पंथांचे अनुयायी असे आहेत. ग्रीस व रोम या देशांत ज्या गोष्टींची आद्य अनुकुलता होती, त्यां सर्व गोष्टींची इकडे प्रतिकुलता असतां, एथें राष्ट्रत्व किंवा देशाभिमान उत्पन्न कसा होईल असें आपल्यास सकृद्दर्शनीं मोठें कोडें पडतें; पण अर्वाचीन इतिहासावरून या कोड्याचा सहज उलगडा होतो. देशाभिमान उत्पन्न होण्यास या देशांत रहाणाऱ्या सर्व लोकांची एक जात, एक धर्म व एक भाषाच असली पाहिजे असें नाहीं, असें अर्वाचीन इतिहासावरून निर्विवाद ठरलें आहे. सार्वजनिक हित साधण्याचा अथवा सर्व साधारण अपत्ति

निवारण्याचा जर कांहीं महत हेतु व अपेक्षा असेल तर, देशांत रहाणाऱ्या लोकांत राष्ट्रत्व किंवा देशाभिमान उत्पन्न होण्यास त्यांच्यांतील जातीभिन्नत्व, धर्मभिन्नत्व व भाषा भिन्नत्व, हीं आड येत नाहींत असें आलिकडील शंभर वर्षांच्या इतिहासावरून कळून आलें आहे. या गोष्टीचें ठळक व स्पष्ट उदाहरण ह्मटलें ह्मण ते अमेरिका देश हेंच होय. इंग्लिश, ऐरिश, स्काच, डच, जर्मन व स्प्यानिश इतक्या जातींचे लोक, अनेक निरनिराळ्या ठिकाणांहून तेथें जाऊन त्यांनीं त्या देशांत वसाहत केली, आणि ते सर्वजण आपल्यांस यांकी असें ह्मणवितात. तेथें इंग्लिश भाषेचें प्राधान्य आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि दुसऱ्या भाषांचा ह्मणजे तेथें अगदीं गंध देखील नाहीं असें नाहीं. जर्मन लोकांनीं केलेल्या वसाहतींत जर्मन भाषाच बोलतात. धर्माविषयींही असेंच आहे. पूर्वीं ज्या धर्माचा जो तेथें गेला तो, किंवा त्याची संतति त्याच धर्माची अनुयायी आहे. ह्मणजे इंग्लिश लोक प्राटेस्टंट पंथाचे व त्यांतील अनेक पोटभेदांच्या पंथांचे अनुयायी आहेत. ऐरिश लोक रोमन क्याथलिक पंथाचे व त्यांतील अनेक पोटभेदांच्या पंथांचे अनुयायी आहेत. जर्मन लोक ईश्वरवादी आहेत. मार्मन धर्माचेही अनुयायी आहेत. अशी जरी स्थिति आहे, तरी सर्वजण त्या देशांतील कांग्रेसचें किंवा राष्ट्रीय परिषदाचें सर्व सत्ताधीशत्व मानितात. स्वदेशभक्ति किंवा स्वदेशाभिमान तेथें मूर्तिमंत नांदत आहे असें ह्मणण्यास अगदीं प्रत्यवाय नाहीं. वरील उदाहरणावरून या देशांत राष्ट्रत्व किंवा स्वदेशाभिमान उत्पन्न होण्यास, येथील राहणाऱ्या लोकांतील जातीवैचित्र्य, भाषावैचित्र्य व धर्मवैचित्र्य, यांची मोठी अलंघ्य, दुस्तर व अनिवार्य अडचण किंवा

प्रतिबंध आहे असें ह्मणतां येणार नाहीं. येथें अशा कांहीं सार्वजनिक अथवा सर्वसाधारण महदापेक्षां, गरजा व महत्वाकांक्षा आहेत काय, कीं, त्यांच्या योगानें या देशांतील लोकांत देशाभिमान उत्पन्न होईल? आणि त्या देशाभिमान किंवा स्वदेशप्रीतिरूप रज्जूनें येथें रहाणारे ख्रिस्ती, हिंदु, मुसलमान, पार्शी, इत्यादि सर्व बळकट जखडले जाऊन त्यांची एकी व एकदिलपणा होईल? या प्रश्नाचें उत्तर ह्मणून कांहीं लोक येथील राष्ट्रीय सभेच्या उद्योगाकडें बोट दाखवितात. राष्ट्रीय सभेचा उद्योग निरर्थक आहे असें मी ह्मणत नाहीं. तथापि गेल्या डिसेंबरांत मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेत ज्या गोष्टींची वाटाघाट होऊन ठराव झाले त्या गोष्टी अगदींच अल्प व सुसाध्य आहेत. प्रजासत्ताक राज्य पद्धतीकडे दिवसानुदिवस लोकांचा जो अधिकाधिक कल होत चालला आहे, त्या दृष्टीनें पाहतां, राष्ट्रीय सभेच्या सांप्रतच्या मागण्या दहावीस वर्षांच्या अवधींतच इंग्लिश सरकारापासून तुह्मांस प्राप्त होण्याजोग्या आहेत. येथें रहाणाऱ्या अनेक जातींपैकीं कांहीं जातींचे पूर्वी परस्परांशीं पराकाष्ठेचें हाडवैर होतें व परस्पर परस्परांशीं मोठ्या निकरानें लढले होते, व परस्परांनीं परस्परांचा अति छल केला होता. अशा जातींचा पूर्वापार विरोध अगदीं नाहींसा होऊन एकंदर लोकांच्या अंतःकरणांत या देशाविषयीं अत्यंत कळवळा, या देशाविषयीं कडकडीत अभिमान व एकदिलपणा उत्पन्न होण्यास, येथील राष्ट्रीय सभेचा सांप्रतचा उद्योग बस होणार नाहीं. असा देशाभिमानच व असा एकदिलपणा येथील लोकांत उत्पन्न होण्यास, परकाष्ठेचें मोठें सार्वजनिक हिताहित ज्यावर सर्वस्त्री अवलंबून आहे, असें कांहीं महा कारण

असण्याची आवश्यकता आहे. असें महाकारण ह्मटलें ह्मणजे माझे बुद्धीनें एकच आहे. या देशावरील रशियन परचक्राची भीति हेंच तें होय. या देशांतील प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास त्याच्या ज्ञानाच्या व बुद्धीच्या कमीजास्त प्रमाणानें त्यास वरील भीतीचें भय वाटल्यावांचून राहणार नाहीं. एशिया खंडाच्या दक्षिणेस एखादें चांगलें बंदर आपल्या हातीं यावें या उद्देशानें जर रशियानें या देशावर स्वारी केली, आणि तींत त्याची सरशी होऊन हा देश त्याचे हातीं गेला, तर त्या सारिखें अनिष्ट या देशास दुसरें कोणतेंच नाहीं. तयमुरादि राजांच्या जुलमी कारकीर्दीच्या मागोमागच जर वरील अनर्थ तुमच्यावर ओढवता, तर त्याबद्दल तुह्मांस कांहींच वाटलें नसतें. पण आतां तुह्मीं स्वातंत्र्याचा आस्वाद घेतला आहे. मिल, स्पेन्सर, ह्यूम व मेकाले या नामांकित ग्रंथकारांचे ग्रंथ तुह्मी वाचिले आहेत. मनुष्यांच्या हक्कांचे अत्युत्तम विवरण व निःशंक आणि निस्पृह प्रतिपादन ज्यांत यथेच्छ केलेलें आहे असे ग्रंथ तुह्मांस शिकविले आहेत. परंतु हेच ग्रंथ आपल्या मनाप्रमाणें त्यांत खोडाखोडी केल्याखेरीज जशाच्या तसे, आपल्या राज्यांत येऊं देण्यास रशियाच्या बादशहाची छाती होत नाहीं. पाठशाळांतील उच्च प्रतीचें उत्तम शिक्षण तुह्मांस हल्लीं यथेच्छ मिळत आहे. पण या शिक्षणाचे मोबदला, रशियन अमलांत, पूर्वोक्त पुस्तकें वाचण्याच्या महदापराधावरून काळ्या पाण्याची झालेली शिक्षा सायबेरियांतील निर्जन प्रदेशांत भोगीत बसण्याचा प्रसंग कदाचित तुह्मांस येण्याचा संभव आहे. आणि तसें झाल्यास तें किती दुःसह व भयंकर ह्मणून ह्मणावें ? एकच नव्हे, परंतु या सारख्या अनेक दुःखांची व संकटांच

श्रेणी रशियन कारकीर्दींत तुह्मांवर येईल. दर आठवड्यास एकत्र जमून सरकारी ठरावांची व सरकारच्या वर्त्तनाची चर्चा करून त्यांतील गुणदोष परीक्षण करण्याची जी तुह्मांस हल्लीं मोकळीक आहे ती मग कोठून असणार? इच्छेस येईल तें बोलण्याचे व छापून प्रसिद्ध करण्याचे हक्क तुह्मांस हल्लीं मिळालेले आहेत, व त्या हक्कांचा तुह्मी मनसोक्त व मनमुराद उपभोग घेत आहां, पण हेच हक्क मग तुह्मांस कोठून प्राप्त होणार? एक्या गरीब हिंदु कुटुंबांतील मुलीशीं बेआदबीचें व अपमानदायक वर्तन केल्याबद्दल उत्तरहिंदुस्थानांतील एका युरोपियन जज्जास आपल्या चाकरीचा राजीनामा देणें भाग झालें. मुंबईकडील एका मोठ्या युरोपिअन हुद्देदाराच्या प्रामाणिकपणाच्या व सचोटीच्या संशयावरून त्यास सस्पिंड केलें. तसेंच तेलिचरी येथील नेटिव सबजज्जाची योग्य चौकशी होऊन त्यास शिक्षा मिळाली. या प्रमाणें निस्पृह व निष्पक्षपात न्यायाचीं उदाहरणें मग तुमच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत तरी कधीं येतील काय? रशियाच्या अंमलांत या देशांतील लोकांस होणारीं दुःखें येथें सर्व सांगत बसणें ह्मणजे आकाशास गवसणी घालण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणेंच होईल. सारांश रशियन अंमलापासून या देशांत राहणाऱ्या सर्व वर्णांच्या व प्रतींच्या लोकांस असंख्य व दुःसह दुःखें भोगावीं लागतील.

या कालस्वरूपी, अखंड, व दुःसह दुःखांच्या मूर्तिमंत भीतीनें या विस्तीर्ण देशांत राहण्याऱ्या अनेक लोकसंघांचें अथवा समुदायांचें सख्य व ऐक्य होऊन, हा देश सत्य, प्रबळ, आणि उच्च राष्ट्रत्वाच्या स्थितीप्रत पोंहचेल.

हिमालयापासून तो रामेश्वरापर्यंत दक्षिणोत्तर व बंगालच्या

उपसागरापासून हिंदीमहासागरापर्यंत पूर्व पश्चिम अशी ज्याची सीमा आहे, तो तुमचा स्वदेश व ती तुमची जन्मभूमि आहे. ग्राम्य, नागरिक आणि प्रांतिक अशा अकुंचित, घातुक व क्षुद्र अभिमानाच्या जाळांत सांपडून तुह्मी आपला घात व नाश करून घेऊं नका. हा तुमचा देश प्राचीनकाळीं फार बलाढ्य राष्ट्र होतें. ग्रीस व रोम या देशांत, ज्ञान वृद्धि व सुधारणा यांस जेव्हां नुकतां कोठें आरंभ झाला होता तेव्हां, हा तुमचा देश त्या गोष्टींच्या शिखरास पोंहोचला होता. येथें अनेक तत्वज्ञानी व तत्ववेत्ते होऊन गेले. अत्यंत कठिण, अत्यंत गूढ व अत्यंत गहन, अशा अनेक विषयांच्या विचारांत व प्रतिपादनांत त्यांनीं मानवी बुद्धीच्या कुशाग्रतेची पराकाष्ठा करून दाखविली आहे.

आपल्या जन्मभूमीसाठीं अथवा आपल्या स्वदेशासाठीं मरणें हें उचित व सुखद आहे अशी रोमन कवीची जी उक्ति आहे ती तुह्मांसही अक्षरशः लागू आहे. जन्मास येऊन अत्यंत महत्वाचे ह्मणून जे पुरुषार्थ तुह्मांस साधावयाचे आहेत, त्यांतीलच स्वदेशाकरितां मरणें, हा एक आहे असें तुह्मांस मानिलें पाहिजे. आतां येथेंही दुसरी एक अडचण येते. तुह्मी ह्मणाल कीं, सांप्रत कोठें दंगाधोपा नाहीं. इंग्लिश अंमलांत जिकडे तिकडे स्वस्थता व शांतता आहे. मग अशा शांततेच्या व स्वस्थतेच्या दिवसांत आह्मांस आपल्या स्वदेशासाठीं कसें मरतां येईल? लढाऊ लोकच काय ते देशाच्या जीविताचे अथवा जीव शक्तीचे रक्षक आहेत असें मानण्याची आपल्यास संवय लागल्यानें वरील शंका आपल्या मनांत येते. देशाचें जीवित युद्धांतील जयावरच जर सर्वस्वीं अथवा पुष्कळ अंशीं अवलंबून असतें तर, वरील शंका

वाजवी होती. परंतु तसा प्रकार मुळींच नाहीं. युद्धांतील जय हे देशाच्या सामर्थ्याचें दर्शक आहेत खरे. परंतु ते त्या सामर्थ्याचें आदिकारण आहेत असें नाहीं. ऐन जयाच्या प्रसंगीं एखाद्या योद्धयास जबर घाय लागून तो युद्धांत पडला; आणि दुसऱ्या कांहीं जणांनीं स्वदेशहितासाठीं आत्मसंयमन, स्वार्थ पराङ्गमुखता, उद्योग, इत्यादिकांचें व्रत धारण करून ते बहुत वर्षें निश्चयानें अबाधित चालवून वृद्धापकाळीं आपले देह ठेविले, तर पूर्वोक्त योद्धयांपेक्षां स्वदेशाकरितां त्या दुसऱ्यांनीं आपले प्राण वेंचिले असें ह्मणणें अधिक सार्थ होईल, व ह्याचें कारणही उघडच आहे. एक्या घायासरसें मरून घेण्यास जितकें धैर्य व सोशिकपणा अंगीं असावा लागतो, त्यापेक्षां स्वदेशहितासाठीं आत्मसंयमन, स्वार्थ पराङ्गमुखता, उद्योग, इत्यादिकांचें व्रत वर्षोंगणती कडकडीत व अबाधित चालविण्यास, वरील योध्द्यापेक्षां सहस्र पटीनें अधिक धैर्य व अधिक सोशिकपणा अंगीं असावा लागतो. जे कोणी स्वदेशअर्थपरायण होऊन, त्यापुढें स्वतःच्या अर्थाची जितकी जितकी कमी मातबरी मानितील, तितक्या अंशानें त्यांनीं स्वदेशाकरितां आपले देह ठेविले असें होईल. मला या संबंधानें जें कांहीं बोलावेंसें वाटतें तें जॉन रस्कीन यांनीं थोडक्यांत व फार उत्तम रीतीनें सांगितलें आहे तें असें:—स्वदेशाकरितां योग्य प्रसंगीं मरणें हें सर्व मनुष्यांचें कर्तव्य आहे. ते योग्य प्रसंग हे होत:—"शिपायानें आपला जीव वांचविण्याचे आशेनें लढाईंतून पळून जाण्यापेक्षां, तेथें आपल्या जागीं उभें राहून मरणें हें उत्तम. महामारी सारिख्या भयंकर रोगांच्या प्रचंड साथींत, वैद्यानें आपलें स्थल सोडून जाण्यापेक्षां, स्व-

स्थळीं राहून मरणें हें उत्तम. अध्यापकानें अथवा शिक्षकानें सत्याचा अपलाप करून अनृत अथवा असत्य गोष्टी शिकविण्यापेक्षां मरण पत्करणें हें उत्तम. वकिलानें अगर कायदे कानु जाणणारानें अन्यायास थारा देण्यापेक्षां मरण स्वीकारणें हें उत्तम." असो, स्वदेश ह्मणजे काय आणि त्या करितां आपण मरावयाचें तें कसें, या गोष्टींचें निरूपण करण्याचा मी यथामति प्रयत्न केला. आतां येथें राष्ट्रत्व उत्पन्न होऊन हा देश खरोखरी उत्तमावस्थेप्रत पोंहोचाव-यास पाहिजे असेल तर, स्वदेशप्रीतीस अथवा स्वदेशभक्तीस अत्यंत अनिष्ट व अत्यंत घातक अशा ज्या गोष्टी आहेत, त्यांपैकीं कांहींचें तरी थोडें दिगदर्शन करून, त्यांविषयीं परा-काष्ठेची सावधगिरी ठेवण्याबद्दल तुह्मांस सांगितलें पाहिजे. असें न केलें, तर तुमच्या अनुग्रहानें व अनुमोदनानें वरील विषयावर तुह्मांपुढें चार शब्द बोलण्याचें जें काम मी हातीं घेतलें तें यथातथ्य बजावलें नाहीं असा दोष मज-कडे येईल. हिंदु नमाक पत्राच्या, ता. २८ माहे सपटंबर सन १८८८ च्या अंकांत, तुह्मांत सांप्रत असलेल्या कांहीं दोषांच्या अगर दुर्गुणांच्या संबंधानें अत्युत्तम मजकूर लिहिलेला आहे. तो मजकूर लिहिणारा खरा स्वदेशाभिमानी आहे यांत शंका नाहीं. तो लिहितो कीं, तुमच्यांत सांप्रत मोठा व भयंकर दोष अथवा दुर्गुण ह्मटला ह्मणजे, दिवसा-नुदिवस अधिकाधिक वाढत चाललेली स्वार्थपरायणता हा होय. तुमच्यांतील सर्व चाली व रीति यांचा विचार मनांत आणिला तर त्यांत स्वार्थपरायणतेस कोठेंच जागा दिसत नाहीं. तुमच्यांतील वर्णव्यवस्था अथवा जातिभेद याजवर पुष्कळ दोषारोप करितां येतील ही गोष्ट खरी आहे. तथा-

पि ज्यांनीं ती स्वेच्छेनें प्रथमारंभीं स्वीकारिली त्यां-चे अंगीं खरोखरीच विलक्षण औदार्य असलें पाहिजे यांत संशय नाहीं. अशक्तांचा भार सशक्तांनीं वहावा हें मुख्य तत्व, तुमच्या पूर्वजांनीं वर्णव्यवस्थेच्या साह्यानें साध-ण्याचें ठरविलें. त्याच वर्णव्यवस्थेच्या द्वारें, रोगग्रस्त, वृद्ध, व्यंग व निरुद्योगी अथवा ज्यांस निर्वाहाचें साधन नाहीं, अशांचें संगोपन व पालनपोषण बलवान व श्रीमान यांज-कडून होत आहे. या सर्व गोष्टी केवळ जाती निर्बंधामुळें होत आहेत; परंतु स्वजाती व्यतिरिक्त इतरांशीं वागण्यांत तुमची अत्यंत स्वार्थपरायणता असते असें पूर्वोक्त लिहिणा-राचें ह्मणणें आहे. आणि हें जर खरें असेल तर, स्वजाती-च्या लोकांशीं वागण्यांत जें तुमचें औदार्य असतें त्याची कांहींच मातबरी राहत नाहीं.

माझा मीं असें प्रत्येक मनुष्यानें मानून ह्याप्रमाणें वर्तन ठेविल्यास सर्व दुरितें व नष्टचर्यें मागें रहातात अशा अर्थाची इंग्रजींत एक ह्मण आहे. हल्लीं तुमच्यांत स्वार्थपरायणता जी इतकी वाढत चालली आहे ती, वरील पाश्चिमात्य तत्व-ज्ञानजनक एकैकत्वाचेंच केवळ फल आहे, असें तुमच्या एका अध्यापकानें ( प्रोफेसरानें ) मला नुकतेंच सांगितलें. कदाचित् तें तसेंही झालें असेल. तथापि त्याच पाश्चिमात्य तत्वविद्येंत वरील ह्मणीच्या अगदीं उलट अर्थाच्या अशा दुसऱ्या ह्मणी आहेत त्यांचा तुह्मी स्वीकार करून पुर्वोक्त ह्मणीस हरताळ लावावा हें उत्तम. ज्यानें ह्मणून आपल्या वर्तनांत स्वार्थाचें वर्चस्व व प्राबल्य होऊं दिलें, तो कधींही खरा स्वदेशाभिमानी अथवा स्वदेश उन्नतावस्थेप्रत नेणारा असा झाला नाहीं, ही तुह्मी आपल्या मनांत पक्की गांठ

अनेक कार्यांकरितां ते लोक सदैव वर्गण्या भरीतच आहेत. या देशाच्या लोकवस्तीपेक्षां त्या देशाची लोकवस्ती पन्नास पटीनें कमी आहे. या देशांत रहाणाऱ्या प्रत्येक मनुष्यापेक्षां या देशांत राहणारा प्रत्येक मनुष्य बारा पटीनें कमी श्रीमान आहे असें जरी मानिलें, तरी देखील इकडील पुर्वोक्त राष्ट्रीय हिताच्या कामाप्रीत्यर्थ २९ लक्ष रुपये वर्गणी जमा व्हावयास पाहिजे होती. येथें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, ऐलंडांतील वरील वर्गणी एका साधारण कामाकरितां ह्मणजे एका व्यक्तीच्या स्मारकाकरितां होती; परंतु इकडील वर्गणीचा तसा प्रकार नव्हता. या देशाच्या सार्वजनिक अत्यंत महत्वाच्या हिताच्या कामासाठीं वर्गणी द्यावयाची असतांही ती जर इतकी कमी झाली तर, अनेक देशहिताच्या कामांकारितां त्या देशांतील लोक ज्या अनेक वर्गण्या भरीत आहेत, त्यांच्याशीं या देशांतील वर्गण्यांची तुलना करण्याचें नांवच घ्यावयास नको. या तुमच्या द्रव्यलोभीपणाबद्दल मी आणखी एक उदाहरण सांगतों. तुह्मांस माहीतच आहे कीं, थोड्या महिन्यांपूर्वी एकमोठें हिंदु थिऑलाजिकल कालेज अथवा अध्यात्मविद्येचें विद्यालय स्थापन करण्याचा विचार निघून त्याबद्दल पुष्कळ चर्चा झाली, नंतर त्या प्रीत्यर्थ वर्गणीचें आंकडे ३१,३०० रुपयांचे पडले. ही यःकश्चित रकम तसल्या विद्यालयाच्या स्थापनेस अगदींच अपुरती होती हें उघड आहे. तथापि त्यांतही आणखी असा चमत्कार होता कीं, त्या रकमेपैकीं एकाचे २०,०००, दुसऱ्याचें ८०००, तिसऱ्याचे २०००, दुसऱ्या दोघांचें प्रत्येकीं एकएक हजार, व आणखीं नऊजणांचे मिळून एकंदर रकम ३१,००० रुपयांची झाली,

व बाकी राहिलेले १०० रुपये मात्र काय ते इलाख्यांतील इतर लोकांचे होते! ही गोष्ट जेव्हां मी ऐकली, तेव्हां- तुह्मी तुमचें अध्यात्मज्ञान अथवा अध्यात्मविद्या यापेक्षां रुपयांस अधिक प्राधान्य देतां हें पाहून मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. जोंवर तुह्मी आपल्या पैशापेक्षां सत्य, पवि- त्रता, सदाचार, धर्म, इत्यादिकांस अधिक प्राधान्य देत नाहीं तोंवर, तुम्हीं आपल्यास वरकांतीं जरी कृष्णाचे अथवा का- इस्ताचे अनुयायी ह्मणविलेत तरी, तेवढ्यानें या देशास, ज- गांतील राष्ट्रांत जी वास्तविक योग्यता मिळावयास पाहिजे आहे, ती कधींही मिळावयाची नाहीं, ही तुह्मी आपल्या मनांत पक्की गांठ मारून ठेवा.

या देशांत खरें राष्ट्रत्व उत्पन्न होणें अशक्य आहे असा कांहीं लोकांचा अभिप्राय आहे. त्यांचा असा आभि- प्राय होण्यास ते येथील जातीभेदाच्या अगर वर्णव्यवस्थे- च्या आडकाठीची सबब पुढें करितात. आतां त्यांची ती सबब सर्वथैव निरर्थक आहे असें ह्मणतां येत नाहीं. तथापि तत्संबंधानें अगदीं निराश होण्याचें मला विशे- षसें कारण दिसत नाहीं. या चमत्कारिक जातिभेदांत जे दोष आहेत त्यांची बाधा, निदान सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांस तरी फारशी होऊ नये. अशा प्रकारच्या कांहीं गोष्टी हल्लीं येथें घडत आहेत. त्यांतील मुख्य गोष्टी ह्मटल्या ह्मणजे पाश्चि- मात्य विद्यांचें शिक्षण व पाश्चिमात्य लोकांचें उदाहरण ह्या होत. राष्ट्रीयसभा व तत्संबंधी जे अनेक उद्योग या सर्व देशभर सांप्रत चालू आहेत, तेही वरील गोष्टींच्या बरोबरी- चेच समजले पाहिजेत. ब्राह्मण, मुदलीयार, नायडू, चेटी, व शेतकी करणारे शुद्र लोक, यांस. जातिभेदानें आजवर

एकमेकांपासून अगदीं दूर केलें होतें. हे सर्व जातींचे लोक सांप्रत निरनिराळ्या ठिकाणीं एकत्र जमून देशहिताचा विचार करीत आहेत. ही जातिभेदाचें महत्व कमी झाल्याचीच साक्ष नव्हे काय ? क्लेशोत्पादक मत्सर व वैर, एकानें दुसऱ्यावर घातक व दुःखद वर्चस्व मिरविणें, अगदीं निर्दोष व हितावह गोष्टींचाही प्रतिबंध करणें, इत्यादि जातिभेदाचे जे दोष आहेत ते राष्ट्रीय सभांच्या योगें नाहींसे होतील हें खचित आहे. तसें न झालें तर जातिभेदामुळें राष्ट्रीय सभा लयास जातील. जातिभेद आणि राष्ट्रीय सभा हीं परस्पर एकमेकांचा नाश करणारीं आहेत. एक जात दुसऱ्या जातीपेक्षां श्रेष्ठ आहे असें मानण्याची बहुत काळापासून तुमच्यांत चाल पडली आहे. या चालीच्या अगदीं उलट प्रकारच्या समजुतीवर राष्ट्रीय सभांची स्थापना झालेली आहे. आपण सर्व अगदीं बरोबरीचे असून परस्पर बंधु आहोंत, असें एकदां तुह्मीं अंतःकरणपूर्वक मनांत वागवूं लागलांत, आणि लोकनियंत्रण अथवा लोकनियमन, लोकांकडून लोकांकरितां व्हावें हा जो प्रजाप्रभुत्वाचा किंवा लोकसत्तात्मकत्तेचा अत्युचित उद्देश व सिद्धांत, तो तुह्मी प्रतिज्ञापूर्वक एकदां स्वीकारिलांत ह्मणजे हें जातिभेदाचें बंड लयास गेलेंच असें समजा.

आपल्या आजच्या व्यापक व बहुविस्तीर्ण विषयाच्या संबंधानेंच केवळ नव्हे, परंतु सामाजिक सुधारणेच्या संबंधानें जरी आपण विचार करूं लागलों तरी, तुमच्या स्त्रियांची पराकाष्ठेची अज्ञ व नीचावस्था मनांत आल्यावांचून राहत नाहीं. बहुतवर्षांपासून चालत आलेल्या चाली बदलण्याविषयीं हिंदुसमाजांतील पुष्कळ उत्तम पुरुषांचे स्तुत्य प्रय-

त्न चालले आहेत. परंतु या कामानें सर टी. माधवराव व दिवाण बाहादूर रघुनाथराव, या सारख्या बुद्धीमान् व वजनदार पुरुषांसही हात टेकावयास लाविलें आहे. या गोष्टीचें संबंधानें तुह्मांतील प्रत्येकावर फार मोठी जबाबदारी आहे. निदान तुमच्या कुटुंबांतील स्त्रियांचें पाऊल शिक्षण्याच्या व विद्येच्या कामांत पुढें पडण्याबद्दल थोडी बहुत तरी खटपट तुह्मांस करितां येईल. आपल्यास सुशिक्षित ह्मणविणाऱ्या पुरुषांच्या स्त्रिया अशिक्षित असणें ही, कोणत्याही प्रकारच्या सुधारणेस सामान्य आडकाठी आहे असें नाहीं. तशांत स्वदेशप्रीति व राष्ट्रत्व उत्पन्न होण्याच्या कामीं तर ती अति मोठी व पराकाष्ठेची प्रतिबंधक अशी जबर आडकाठी आहे. जगाच्या इतिहासांत ज्यांचीं नांवें दाखल झालीं आहेत असे अति मोठे व विख्यात पुरुष, इतक्या नांवा लौकिकास चढण्यास त्यांच्या जननींचा प्रभाव कारण झाला असें बहुत गोष्टींत घडून आलेलें आढळतें. आपल्या कुडींत प्राण आहे तोंवर रोमन लोकांशीं सतत शत्रुत्व करीन अशी यज्ञकुंडासमीप कारथेज येथील देवाची शपथ, तरुण हॅनिबालाकडून घेवविली ती त्याच्या आईनेंच. ग्याची याची माता कारनेलिया, इजला रोमन लोकांच्या प्राचीन इतिहासांतील अति विख्यात मनुष्यांत आद्यस्थान मिळालेलें आहे. पाश्चिमात्य अर्वाचीन इतिहासाविषयीं ही अशीच गोष्ट आहे. अनेक शास्त्रांत व ऐहिक व्यवसायांत जे जे ह्मणून प्रमुख व आग्रेसर होऊन बसले, त्यांस तें प्रमुखत्व प्राप्त होण्यास त्यांच्या अगदीं बाल्यावस्थेंत त्यांच्या आयांनीं त्यांस केलेले सदुपदेशच पुष्कळ अंशीं कारण झाले अशीं असंख्य उदाहरणें आहेत. ज्या देशांत उत्तम व खरी सुखी कुटुंबें नांद-

तातें त्यांसच देशपण अथवा खरें राष्ट्रत्व प्राप्त होतें. आणि स्त्रिया सुशिक्षित, सदाचरणी व समजुतदार असल्यावांचून खरी सुखीं कुटुंबें असावयाचीं नाहींत हा अगदीं निर्विवाद सिद्धांत आहे.

स्वदेशप्रीतीस घातक व अपायकारक ह्मणून मी ज्या गोष्टी पूर्वीं सांगितल्या त्यांहीपेक्षां अधिक घातक व अधिक अपायकारक अशी आणखी एक गोष्ट आहे. थोड्या दिवसांपूर्वीं एरोडे येथें एक सभा भरून तिज पुढें मि. जी. सुब्रमण्य अयर यांचें भाषण झालें. त्या प्रसंगीं दुसरे एक गृहस्थ तेथें असें ह्मणाले कीं, धर्माचा आधार अथवा पाठबळ असल्यावांचून सामाजिक सुधारणा व्हावयाची नाहीं, मग तो धर्म कोणताही असला तरी चिंता नाहीं; परंतु तो खरा मात्र असला ह्मणजे झालें. या ह्मणण्यांत एक मोठी सत्य गोष्ट आहे आणि एक मोठी चुकीही पण आहे. खऱ्या व हितकर सामाजिक व राजकीय सुधारणेचें पाऊल पुढें पडण्यास धर्माची अत्यंत आवश्यकता आहे यांत शंका नाहीं. धर्म हा जर प्रबल व बलवत्तर चालक अशी शक्ति व्हावयास पाहिजे असेल तर तो खरा असणें अत्यावश्य आहे. प्राचीन रोमन लोकांत त्यांच्या प्रत्येक व्यवहारिक गोष्टीशीं देखील धर्माचा संबंध होता. शत्रूचा नाश होण्याच्या उद्देशानें धर्माध्यक्षानें आपला भाला शत्रूच्या प्रांतांत फेंकल्यावांचून त्याच्याशीं ते युद्ध करीत नसत. याप्रमाणें इतर सर्व कृत्यांतही धर्माचें अंग असेच. रोमन लोकांच्या अवनतीच्या काळाचा ज्यानें इतिहास लिहिला आहे तो इतिहासकार असें म्हणतो कीं, त्या वेळचे रोमन लोक, धर्म तेथून सर्व सारखेच खरे, माजीस्ट्रेट तेथून सर्व सारखेच उपयुक्त, व तत्वज्ञानी तेथून सर्व

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सारखेच खोटे असें मानूं लागले होते. कोणताही धर्म असला तरी चालेल; तो खरा असला ह्मणजे झालें; धर्म तेथुन सर्व सारखेच खरे आहेत, असे ह्मणणारा जो आहे त्यांत, व धर्म तेथून सर्व सारखेच खोटे आहेत असें मानणारा, यांत फारसें अंतर नाहीं. अमुक एका धर्माचा अधिकार व योग्यता अशी अशी आहे असें तुह्मांस सांगत बसण्याचें हें स्थल व काल नाहीं. परंतु तुह्मीं इतकें खचींत समजा कीं, भक्तिरहित व श्रद्धारहित धर्म ह्मटला ह्मणजे तो अगदीं पोकळ व निव्वळ विरोधोक्ति होय. एक धर्म दुसऱ्या धर्मासारखाच खरा व चांगला आहे असें तुह्मी कधींही समजूं नका. सत्य काय आहे तें कळावें या हेतूनें शोध करण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. ईश्वराचें साह्य मागून निश्चयानें व अंतःकरण पूर्वक तो शोध तुह्मी तसाच जर सतत पुढें चालवाल तर खरें ह्मणून जें काय आहे तें अंतीं तुह्मांस कळल्यावांचून राहणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे. या देशांतील महान स्वदेशभक्त बाबू केशव चंद्रसेन जरी ख्रिस्ती धर्मानुयायी नव्हता, तरी त्यानें ही शेवटीं "ख्रिस्तच एक" असे ह्मटलें. देह ठेविण्याचे अगोदर तुमच्या मुखांतूनही तसेच उद्गार निघतील अशी माझी उमेद आहे.

सदगृहस्थहो ! तुमच्या स्वदेशप्रीतीचा अथवा राष्ट्रत्वाचा महदुद्देश अथवा हेतु कसा व कोणता असावा, व त्याच्या सिध्द्यर्थ तुह्मी काय केलें पाहिजे, व कसें वागलें पाहिजे, यां विषयीं मी निष्कपट व प्रांजल अंतःकरणानें तुह्मांस सांगण्याचा प्रयत्न केला. तसेंच त्या तुमच्या उद्देश सिद्धीस ज्या मुख्य गोष्टी प्रतिबंधक व घातक होत्या त्यांचेंही यथाशक्ति करवलें तितक्या स्पष्ट रीतीनें निरूपण केलें. आतां

शेवटीं इतकेंच सांगावयाचें आहे कीं, नित्याच्या व्यवहारांत देखील, ज्यांत सर्वांचें हित व कल्याण तोच प्रत्येकाच्या वर्तनाचा नियम, असें व्रत धारण करून जर तुह्मांमधील प्रत्येकजण वागेल; स्वतःच्या व स्वजातीच्या हितापेक्षां स्वदेशहितास जर तुह्मी आद्यस्थान द्याल; अज्ञान, अविद्या व मूढ विश्वास, यांच्या बंधनापासून तुमच्या स्त्रीजनास सोडविण्याची गोष्ट जर तुह्मीं आपल्या अंतःकरणांत सदोदित वागवाल; आणि सर्वांत श्रेष्ठ असें जें परमेश्वराचें साह्य तें जर तुह्मीं मनोभावानें त्यांजपाशीं मागाल तर, जगांतील सर्व राष्ट्रांत तुमच्या देशास आद्यस्थान मिळविण्याचा सुदीन समीप आणण्याचें कामीं मदत केल्याचें यश तुह्मीं घेतलें असें होईल.

याप्रमाणें व्याख्यानकाराच्या भाषणाचा सारांश आहे. पाश्चिमात्य लोक सहसा अशा विषयावर आह्मांपुढें बोलत नाहींत. आणि यदाकदाचित तसें बोलण्याचा प्रसंग आलाच तर त्यांची स्वार्थपरायणता त्यांस तसल्या विषयांचें यथातथ्य व यस्थास्थित विवेचन करूं देत नाहीं. यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं. कारण मानवी स्वभाव तेथून सर्वत्र सारखाच आहे. आतां त्यांतही प्रस्तुत व्याख्यानकारांसारखे कांहीं महात्मे असतात ही गोष्ट निराळी. व्याख्यानकारांनीं या अति महत्वाच्या विषयाच्या सर्व अंगांचा विचार फार सुरस, पोक्त, मार्मिक व निष्कपट आणि सदय अंतःकरणानें केला ह्मणून त्यांची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच. जन्मभूमि, स्वदेश, राष्ट्रत्व, स्वदेशाकरितां मरणें, इत्यादिकांची व्याख्या त्यांनीं फार सुरेख व खुबीदार केली आहे. इतिहासज्ञान केवळ पाठीवर वागविण्याचें ओझें नव्हे, तर त्या ज्ञानाब्धीचें मंथन

करून सार कसें काढावयाचें तें त्यांनीं प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या अल्प इतिहास परीक्षणांत फार उत्तम रीतीनें दाखविलें आहे. स्वदेशप्रीति आणि राजनिष्ठा, वर्णव्यवस्था आणि राजकीय सुधारणा, या गोष्टी परस्पर विरोधी आहेत व या एक्यासमयीं एकत्र नांदावयाच्या नाहींत, असा जो कांहीं लोकांचा अक्षेप आहे त्याचेंहीं त्यांनीं फार सुरेख निरसन केलें आहे. स्वदेशप्रीति व राष्ट्रत्व यांचीं जीव तत्वें आणि त्यांस अपाय करणाऱ्या गोष्टी ह्मणून व्याख्यानकारांनीं ज्या सांगितल्या त्या पराकाष्ठेच्या विचारार्ह आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांचें साद्यंत भाषण, आपल्यास सुशिक्षित ह्मणविणाऱ्या प्रत्येक व्यक्ती मात्रानें लक्षपूर्वक मनन, अध्ययन व पठण करण्याजोगें आहे असें आह्मांस वाटतें. शेवटीं स्वार्थपराङ्मुख होऊन स्वदेशहितास आद्यस्थान देण्याची, आणि ज्यांत सर्वांचें हित व कल्याण तोच सर्व व्यवहारांत स्ववर्तनाचा नियम, असें व्रत धरण्याची इच्छा, आणि तदनुसार आमरण पावेतों वर्तन करण्याचा निश्चय व सामर्थ्य हीं आह्मा सर्वांस द्यावींत अशी आह्मीं विनम्र अंतःकरणानें व मनोभावानें जगन्नियंत्या परमेश्वरास प्रार्थना करून हा फार लांबलेला लेख संपवितों.

# गृहिणी.

## सर्व स्त्रीशिक्षणेच्छु लोकांनीं अवश्य घेण्याजोगें मासिक पुस्तक.

वर्षाची वर्गणी मुंबईंत रु. १॥ बाहेरगांवच्या लोकांस ट. ह. सह १॥=

**विशेष सूचना.**—फक्त गरीब शिक्षक लोकांस ट.ह. सह १ रुपया.

**म्यानेजर गृहिणी.**
सुबोधप्रकाश छापखाना मुंबई.

---

खालीं लिहिलेलीं अगर इतर कोणतींही पुस्तकें रोख पैसे पाठविले असतां मुंबईंत सुबोधप्रकाश छापखान्यांतून पाठविलीं जातील.

**अष्टांग संग्रह** ( वृद्ध वागूभट ) किं. रु. १२ ट. ह. १० आणे.

---

**ऋग्वेदसंहिता** ( सुटी ) उत्तम कागदावर छापलेली किं. रु. ४ ट. ह. ८ आणे.

---

**कृष्णयजुर्वेद** ( सुटी ) उत्तम कागदावर छापिलेला किंमत ३ रु. ट. ह. ८ आणे.

---

**रुक्मिणीस्वयंवर** ( मोठ्याटैपांनीं छापिलेलें. ) किं ८ आणे ट. ह. १ आणा.

---

**आनंदराव** ( किंवा पाशबद्ध स्वदेशाभिमानी ) किं. १० आणे ट. ह. १ आणा

---

**आनंदानुभव** ( श्रीएकनाथ स्वामीकृत. ) वेदांत पर. किंमत. १ आणा ट. ह. आर्धा आणा.

---

बक्षीस! मिळवा!! बक्षीस!!!

# मित्रबोध.

सम चरण सरोजं सांद्र नीलां बुधाभं ॥
जघन निहित पाणि मंडनं मंडणानां ॥
तरुण तुलशी माला कंधरं कंजनेत्रं ॥
सदय धवल हासं विठ्ठलं चिंतयामि ॥१॥




प्रसिद्ध करणार

## लोकमित्र कर्ते,

पोष्ट–खानापूर, जिल्हा–बेळगांव.

धनंजय ' छापखान्यांत छा०

सन १८९७

किंमत अर्धा आणा.

मराठी ग्रंथसंग्रहालय
नं. २८२
ठाणे सन १८

॥ श्रीदत्त प्रसन्न ॥

# मित्रबोध.

प्रातःकाळीं उठून शौच मुखमार्जन करावें, व अभ्यासास बसावें. प्रातःकाळीं अभ्यास केल्यानें धडे लवकर पाठ होतात व तेणेंकरून विद्या लवकर येते.

अभ्यासाचे वेळेस खेळण्याकडे लक्ष देऊं नये. विद्या शिकल्यावांचून शहाणपणा येत नाहीं, व आंगीं शहाणपणा आल्यावांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं. ज्याला चार लोकांत मान मिळत नाहीं त्याचें जिणें व्यर्थ आहे. विद्यावंतासच सर्व लोक मान देतात.

जो मुलगा नित्य नियमानें अभ्यास करितो, त्यावर सर्व मनुष्यें प्रीति करितात. शास्त्रवचनाप्रमाणें सोळा वर्षांचें वय होईपर्यंत मुलांनीं आपले बुद्धीनें चालूं नये.

चांगला किंवा वाईट गुण जो एकदां बाळपणांत जडतो तो पुढें लाखों रुपये खर्च केल्यानेंही जात नाहीं, ह्मणून लहानपणीं वाईट मुलांची संगत धरूं नये.

कोवळें झाड जसें लववावें तसें लववें, तेंच वाढत चाललें ह्मणजे लवत नाहीं; तशीच बाळपणांत विद्या जितकी लवकर येईल तितकी मोठेपणीं येणार नाहीं ह्मणून बाळपण खेळांत घालवूं नये.

आपल्या अज्ञानावस्थेंत ज्या आईबापांनीं आपलें लालनपालन केलें, ते जें जें करावयास सांगतील, तें तें आपल्या बऱ्याचेंच असतें; ह्मणून आईबाप, धनी व गुरु यांनीं सांगितलेलें काम मन लावून करावें. त्यांस कारण सांगूं नये.

विद्या शिकविणारा, अन्न देणारा, व भयापासून रक्षण करणारा हे तिघेजण आपलें बरें करण्याविषयीं बापाप्रमाणें ह्मटले आहेत.

शाळेंत नियमानें जाण्याची वेळ चुकवूं नये. बसण्याचे जागेकरितां इतर उनाड पोरांबरोबर कज्जा करून व्यर्थ वेळ दवडूं नये. एकदां गेलेली वेळ पुनः परत येत नाहीं. पैशापेक्षां वेळेची किंमत जास्त आहे.

आपल्याबद्दलच्या चहाड्या गुरुजींचे कानापर्यंत न जातील अशी खबरदारी ठेवावी. शाळेंतील सर्व मुलांशीं, गुरुजीशीं गरीबीनें वागून त्यांची प्रीति संपादन करावी.

लोकांनीं केलेला डौल पाहून मीही तसाच करीन असा हेका धरूं नये; तो शोभत नाहीं. सर्व मुलांपेक्षां मी आपला धडा चांगला व लवकर करून त्यांच्यावर नंबर मिळवीन असा अभिमान बाळगावा.

गुरुजी शिकवितील तो धडा लक्ष देऊन ऐकावा, न समजेल तें चांगलें समजून घ्यावें, व कांहीं तरी नवीन शिकल्यावांचून एक दिवसही व्यर्थ जाऊं देऊं नये.

जो धडा नेमून दिला असेल त्याची घोकणी करावी, तोच आपल्याहून जाणत्या मुलांजवळ ह्मणून दाखवावा, त्याचा अर्थ आपण करावा, व इतर मुलें करीत असतील तो ऐकावा, एकंदरीत आपला धडा तयार करण्याविषयीं सदांसर्वदा झटत असावें.

कोणतेंही काम उतावळीनें करूं नये, केल्यास तें साध्य होत नाहीं. मी एकदांच मोठा धडा पाठ करीन ह्मणून उतावीळ होऊं नये. थेंब थेंब पाण्यानेंच घागर भरते

आरंभिलेलें काम शेवटास न्यावें, न नेलें तर केलेले

श्रम व्यर्थ जाऊनही लोक हंसतात, यासाठीं जें काम आपले हातून होईल अशी आपली खात्री असते त्यासच हात घालावा. अभिमानानें न होणाऱ्या कामास हात घालून व्यर्थ आपली अप्रतिष्ठा करून घेऊं नये.

ज्यास चौघे शहाणा ह्मणतात त्याचीच संगत करावी. वाईट मुलांची संगत धरूं नये, व त्यांचे वाऱ्यासही उभें राहूं नये, कारण त्यापासून आपण बिघडूं असा संभव आहे.

कोणाची निंदा किंवा चहाडी करूं नये, गर्व धरूं नये, चांगल्या मित्राशीं कधींही बिघड करूं नये, नम्रता धरावी.

आपणास जेवढें देवानें दिलें असेल तेवढ्यांतच संतुष्ट असावें, असंतोषी मनुष्यास कोणत्याही पदार्था-पासून सुख होत नाहीं, हें ध्यानांत ठेवावें.

बायकांचे मंडळींत बसूं नये, किंवा उगीच भट-कत फिरूं नये. जुगार खेळूं नये, जुगाराचे व वेश्येच व्यसनापासून चोरीचें व्यसन लागतें, चोरी करितां करितां प्राणही जातात, व आपल्या कुळास बट्टा लागतो

हंसत हंसत बोलूं नये, गर्विष्टपणें चालूं नये, बोलत असतां लाजूं नये, व सभाधीटपणा आंगीं आणण्याचा प्रयत्न करावा.

जसी ज्याची योग्यता असेल तसें त्याशीं वर्तन व भाषण करावें. आपल्यापेक्षां जे थोर असतील त्यांच्याशीं आर्जवानें व नम्रपणानें वागावें.

आपल्यापेक्षां कनिष्ट असतील त्यांशीं कामापुरतेंच

भाषण करावें, ज्यास्त प्रचात ठेविल्यानें त्यांकडोन आपला मान रहात नाहीं.

आपली प्राप्ति किती आहे व खर्च किती आहे, याचा नेहमीं विचार करावा. सदोदित प्राप्तिपेक्षां खर्च कमी करीत जावा. अधिक केल्यानें मनुष्य कर्जबाजारी होतो. जो कर्ज करितो तो परिणामीं पश्चात्ताप पावतो.

सत्कर्मानें द्रव्य मिळवावें, व त्याचा चांगल्या कामांत व्यय करावा. परोपकार करणें हेंच द्रव्य मिळविण्याचें खरें सार्थक आहे.

प्रामाणिक मनुष्यास सर्व लोक मान देतात. या जगांतील सर्व व्यवहार सत्यावर चालतात, ह्मणून सत्य सोडूं नये.

कुकर्मानें मिळविलेल्या द्रव्याचें फळ आपल्यासच भोगावें लागतें, द्रव्याचा उपभोग मात्र सर्व घेतात.

मी तुझें काम करीन असें कोणास वचन देऊं नये, दिलें तर काम करण्यास चुकूं नये, वचन देऊन घात करणें या सारखें दुसरें पातक नाहीं. यासाठीं वचन देण्यापूर्वीं पूर्ण विचार करावा, आणि मग वचन द्यावें.

तोंडानें बोलतो एक व करतो दुसरेंच, असा पुरुष एखादे वेळेस खरेंही बोलला तरी, लोक त्याचें खरें मानीत नाहींत. त्यावर खोटा जरी आरोप आला, तरी लोकांस तो न्यायी वाटतो, व सर्वस्वी बुडला जातो.

एक वेळ मनुष्य लबाडींत आढळला ह्मणजे त्याची प्रतिष्ठा जन्मपर्यंत गेली असें समजावें. याकरितां लबाडी बोलण्याची संवय अगदीं सोडून द्यावी.

मित्र कसा आहे याची परीक्षा आपले संकटसमयीं

होते. वर वर मित्रभाव दाखविणारे पुष्कळ असतात, पण खरा एखादाच मिळतो.

विचार केल्याखेरीज कोणतेंही काम आरंभूं नये; नें करणें तें शहाण्यानें विचारानेंच करावें.

जो क्रोधाचे स्वाधीन झाला तो आंधळा, जो फायद्याची गोष्ट सांगितली असतांही ऐकत नाहीं तो बहिरा. ज्याला कार्याकार्य समजत नाहीं, तो पशू. संकट आलें असतांही जो भीत नाहीं, तो धैर्यवान. जो स्त्रियांचे नेत्रकटाक्षांनें मोह पावत नाहीं, तो शूर. जो दुसऱ्यास उपद्रव न देतां आपलें हित करावयास जाणतो, तो शहाणा. उद्योग न करणारा शत्रु जो तारुण्य, धन व आयुष्य, यांचे भरंशावर रहात नाहीं, तो सावध. जो नेहमीं संतोषवृत्तीनें राहतो, तो श्रीमंत. ज्याची आशा मोठी, तो दारिद्री. ज्याचें चित्त स्थीर, तो सुखी. ज्याचे हातून फार परोपकार घडले, तो थोर. जो आपले वैभवाचा आपण एकटाच उपभोग घेतो, तो चोर.

आपले पाठीमागें कोणी आपली निंदा केलेली ऐकून भांडावयास जाऊं नये. पाठीमागें लोक राजाला देखील शिव्या देत असतात.

परोपकाराएवढें दुसरें पुण्य नाहीं, व परपीडेसारखें दुसरें पाप नाहीं. कोणी आपली स्तुति करितील तीस भुलूं नये. कारण आपलें काम साधून घेण्यासाठीं लोक तोंडापुरतें गोड गोड भाषण करीत असतात.

मित्राशीं पडदा ठेवूं नये, व त्याचा अपमान करूं नये. शत्रूस भीत असावें. समर्थाशीं वैर करूं नये.

गरीब व दुबळे ह्मणून त्यांचा उपहास करूं नये, कारण

सर्व दिवस सारखेच असतात असें नाहीं. आज आपण त्याचा उपहास करूं, पण उद्यां आपल्यावरच तसा प्रसंग आला तर तेही आपला उपहास करतील.

वडिलांची मर्यादा ठेवावी. आपण मर्यादा ठेविली तर पुढें मुलेंही आपली मर्यादा ठेवितील. भाषण मधुर, हितकर व सत्य असें असावें.

आपल्यास दुःख झालें असतां जसा आपला जीव कळकळतो, तसाच दुसऱ्याचाही कळकळतो, हें पूर्णपणें ध्यानांत ठेविलें असतां होत असलेले बरेच अनर्थ टळतील.

अपराधावांचून कोणास इजा देऊं नये. जो अपराधाशिवाय शिक्षा करितो. तो नीच पुरुष; जो आपकारी यालाच अपकार करितो तो मध्यम; आणि जो अपकारी यावर उपकार करितो, तो उत्तम.

क्षमा करणें हा थोराचा धर्म होय, आपला गुण किंवा थोरपण कुठवर; जोंपर्यंत दुसऱ्याजवळ याचना करण्याचा प्रसंग आला नाहीं तोंपर्यंत, त्यासारखें दुसरें दुःख नाहीं.

जेथें आपलें काम साधेल अशी आपली खात्री असते, तेथेंच भीड घालावी. आपलेजवळ द्रव्य असलें ह्मणजे सर्व स्नेह करावयास येतात. आणि तेंच नाहींसें झालें ह्मणजे कोणी ढुंकुनही पहात नाहीं, ह्मणून स्नेह करण्याचे पूर्वींच मनुष्याचे स्वभावाची ओळख करून घ्यावी.

शरण येईल त्याचें रक्षण करावें, मेलेल्या माणसास कधींही वाईट ह्मणूं नये. आपलें गुह्य भलत्यावर विश्वास ठेवून सांगूं नये; तें सुशील मित्राजवळच सांगावें.

आपत्कालासाठीं द्रव्यसंचय करावा, पुढें पुष्कळ द्रव्य मिळणार आहे असें समजून आज मन मानेल तसा अवा-

द्रव्य खर्च करूं नये. दमडी दमडी मिळून रुपया होतो. ह्मणून दमडीची अवगणना करूं नये.

व्यसनांत उधळलेला पैसा व्यर्थ जातो, ह्मणून पहिल्यापासूनच दुर्व्यसन न लागूं देण्याविषयींची खबरदारी ठेवावी.

विद्येनें जसा मनुष्य सुशोभित दिसतो तसा थाटमाट केल्यानें दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच जशी इतर द्रव्यास चोराची व पुष्कळ प्रकारची भीति असते, तशी विद्याधनास कोणतीच भीति नाहीं.

द्रव्यभांडारांतील धन जसजसें खर्चावें तसतसें तें कमतीच होत जातें; परंतु विद्याभांडारांतील धन कितीही खर्च केलें तथापि किंचित्‌ही कमी न होतां उलटें जास्तच वाढत जातें.

कोणालाही उणे शब्द बोलून दुखवूं नये, कोणाचा धिःकारही करूं नये, कोणाची गुप्त गोष्ट उघडकीस आणूं नये, लुच्चेगिरीचा व्यवहार ठेवूं नये, हिशोब चोख राखावा, आदा व खर्च नेहमीं मांडीत असावें, कारण त्यामुळें मनुष्य नेहमीं सावध असतो.

मेवामिठाई खाण्याची संवय लावून घेऊं नये. उधार जिन्नस कधींही आणूं नये; आणले तर खातें फार दिवस चालवूं नये. दुसऱ्याची बरोबरी होण्याच्या इच्छेनें पाहिजे तसा मोठा खर्च करूं नये. व्यवहारामध्यें भीड अगदीं कामाची नाहीं.

नानाप्रकारचे विलास व क्रीडा केल्यानें आपण मात्र संतुष्ट होतों; परंतु आत्मा परोपकार केल्यानेंच संतुष्ट होतो.

आपल्या हातून घडलेल्या सत्कर्माचें जेव्हां जेव्हां आपणास स्मरण होतें तेव्हां तेव्हां तें चित्तास समाधानच देतें; परंतु जेव्हां दुष्कर्माची आठवण होते तेव्हां मात्र तें भाल्याप्रमाणें शरीरास बोंचतें ही गोष्ट विद्यार्थ्यांनीं पक्केपणीं ध्यानांत ठेवावी.

आपलें पापकर्म जरी कोणीही पाहिलें नाहीं तरी ईश्वर पहात असतो. व त्याबद्दल तो आपल्यास एखादे वेळेस तरी शिक्षा करीलच करील हें पूर्ण ध्यानांत ठेवावें.

आपण श्रीमान आहों. असा जर आपल्यास गर्व झाला तर आपल्यापेक्षां जे अधिक श्रीमान असतील त्यांजकडेस पाहून आपला गर्व परिहार करावा.

मी फार दुःखी आहें असें जर आपल्यास वाटलें तर आपणाहून जे अधिक दुःखी असतील त्यांजकडेस पाहून आपलें दुःख कमी करावें.

दुसऱ्यापेक्षां मीं कमी पाप केलें ह्मणून पाप केल्याचा संतोष कधींही मानूं नये.

दोघे एकांतीं गुज गोष्टी सांगत असतां तेथें बोलाविल्याशिवाय जाऊं नये. आपण ज्यास एखादी गोष्ट सांगतों, ती जर तो लक्ष देऊन ऐकत नसेल तर आग्रह करून ती त्याजकडून ऐकवूं नये.

आपण कामांत गुंतलों असतां जर कोणी एखादें काम घेऊन आपल्याकडे आला तर आपलें काम एकीकडे ठेवून त्याला न खोळंबवितां त्याचें काम अगोदर करून द्यावें, परंतु त्याचा तिरस्कार करूं नये.

विद्येचें सार्थक हेंच कीं ज्ञानप्राप्ति करून घ्यावयाची, लोकांबरोबर तंटा भांडण करणें हें कांहीं विद्येचें सार्थक

नव्हे. तसेंच द्रव्याचें सार्थक, धर्म आणि परोपकार करावा; विषयांचें सेवन करणें हें कांहीं द्रव्याचें सार्थक नव्हे.

परमेश्वरानें आपले आंगीं जर थोडी शक्ति दिली आहे, तर जितकें दुसऱ्याचें संरक्षण करण्याकडे तिचा व्यय होईल तितका करावा, पाहिजे त्यास पीडा देणें हें बलवानास उचित नाहीं.

ज्या गोष्टीनें पुष्कळांचें कल्याण होतें, ती करण्यास कितीही श्रम पडले तरी आळस न करितां जो द्रव्य खर्च करितो तोच खरा उदार. आपले स्वतःचे कल्याणाकरितां तर कोणीही द्रव्य खर्च करील.

आपसांत तुटण्यासारखा असलेला तंटा सरकारांत नेण्याचे भरीस कधींही पडूं नये.

कितीही मोठा पर्वत असला आणि तो जर नित्य नियमानें खणीत गेलें तर तो कधीं तरी जमिनीबरोबर होईलच. मोठा मार्गही नियमितपणें चालल्यानें संपतो. कितीही मोठें काम असो, नियमानें केल्यास संपेलच. तसेंच कितीही मोठें पुस्तक असलें तरी तें नियमीतपणें व लक्ष लावून वाचलें असतां कांहीं दिवसांनीं तरी पाठ होईलच. सारांश कोणतीही गोष्ट नियमीतपणे केल्यास ती चांगल्या रीतीनें खचित साध्य होते या संशय नाहीं.

द्रव्यापेक्षां प्रतिष्ठा अधिक आहे, द्रव्य पुन्हा मिळेल परंतु एक वेळ गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळणार नाहीं हें लक्षांत ठवावें.

सर्व कांहीं देऊन शरीराचें रक्षण करावें. शरीर सुर

क्षीत असल्यास सर्व गोष्टी पुनः मिळतील, पण शरीर म्हणून पुन्हा मिळणार नाहीं.

एक वेळ जो शत्रु झाला त्याचा पुन्हा विश्वास धरूं नये. कोणतेंही बिकट काम असो, तें करण्यास प्रयत्न केला पाहिजे. केवळ दैवावरच हवाला ठेवूं नये. प्रयत्नावांचून प्रारब्ध लंगडें, अशी एक म्हण आहे. एकदां साध्य झालें नाहीं म्हणून प्रयत्न सोडूं नये. 'प्रयत्नांती परमेश्वर' कधींतरी साध्य होईलच, परंतु जो प्रयत्न सोडून स्वस्थ बसतो, त्याला ईश्वरही साह्य होत नाहीं.

आपल्या हातून जर चुकून अपराध झाला तर तो पदरांत घ्यावा, बोलत असतांना तापूं नये, व शिव्या-गाळींचा प्रसंग आणवूं नये. बोलणें ऐकून घ्यावें, संथप-णानें त्याचा विचार करावा, आणि मग त्यास उत्तर द्यावें. राग आला तर १० अंक मोजावेत हें एक राग जाण्याला औषध आहे.

एक काम संपल्यावर दुसरे कामास हात घालावा, जो दहा पांच कामास एकदम आरंभ करितो. त्याचें एकही काम तडीस जात नाहीं, आणि मग पश्चात्ताप पावतो.

कोणी कांहीं बोलो त्यांतील सार मात्र घ्यावें. जर कोणी आपला तिरस्कार केला, तर कांहीं न बोलतां त्याला त्याची क्षमा करावी; त्यांतच आपला थोरपणा आहे. आपण जर दुसऱ्याचे अन्याय क्षमा केले, तर ईश्वरही आपले अन्याय क्षमा करील. तसेंच आपण जर निरिच्छ बुद्धीनें दुसऱ्याचें बरें केलें तर ईश्वरावर भार पडून तो आपलेंही बरें करील.

सर्व गोष्टी आपले करणीवर, उद्योगावर, मितव्ययावर,

खरेपणावर व दृढ निश्चयाच्या बळावर अवलंबून आहेत.

परमेश्वरानें सर्वांनाच कांहीं सारखें द्रव्य दिलेलें नाहीं, असें जरी आहे तरी आपल्या उपजीविकेस जेवढें लागतें, तेवढें मिळविण्याची शक्ति दिली आहे. मी आपल्या स्वकष्टार्जित द्रव्यावर संपन्न होईन व आपलें उदरपोषण करीन, यांतच माझी प्रतिष्ठा आहे. असा अभिमान धरावा. दुसऱ्याचे संपत्तीवर संपन्न होणें, हें शहाण्याचें कर्म नव्हे.

जो दुसऱ्याचे संपत्तीवर निर्वाह करतो, तो जिवंत असतांही मेल्याप्रमाणें समजावा. पोट भरलें ह्मणजे जन्माचें सार्थक झालें असें समजूं नये.

मोठा जिवलग मित्र जरी असला तरी भाषणांत व हरएक प्रकारचे व्यवहारांत विनय असावा. जेथें विनय तेथें प्रीति ही आहेच, विनय नाहीं तेथें मित्रप्रेम मुळींच नाहीं; आणि असलें तरी तें वरकांती दाखविण्याकरितां मात्र असतें.

ज्याचें मन विद्येनें प्रज्वलित झालें, त्याचें पाउल जरी वाईट मार्गांत पडलें तरी पुनः तो शुद्धीवर येईल अशी आशा असते, कारण ज्या वेळेस त्याचे कामक्रोधादिकांचे विचार शांत होतील त्या वेळेस त्यास विवेक होईलच.

ज्याचे मनास कार्याकार्य व बरें वाईट समजतें तोच सन्मार्गाचा खरा अधिकारी होतो.

आईबापांचे लाड मुलांचे नाशास कारण होतात, कांहीं लोक मुलांनीं कसाही अन्याय केला तरी त्यांस शिक्षा करावयास भितात, ही फार वाईट गोष्ट आहे. त्यांची मुलाविषयींची खरी ममता ह्मटली ह्मणजे हीच

[stamp]



होय कीं, जेणेंकरून आपलीं मुलें विद्वान होऊन लौकि-काम चढतील. लाड केल्यानें विद्या येत नाहीं. मुलांच्या मातापितरांनीं याचा पूर्ण विचार करावा.

मुलें सद्गुणी अगर दुर्गुणी निवणें हें बहुतेक अंशीं पा-लनकरणारांच्या वर्तणुकीवर अवलंबून असतें.

आळस हा दुर्गुण प्रथम न समजतां आपले शरीरांत प्रवेश करून हळू हळू आपलें अनहित करण्यास आरंभ करितो, व आपल्या शरिराचा, मनाचा, हिताचा व सुखाचा धनी होऊन बसतो.

जोपर्यंत आपल्या आंगांत आळस हा दुर्गुण आहे तोंपर्यंत आपणांस सुख ह्मणून अगदीं मिळणें नाहीं.

पृथ्वीपेक्षां आई थोर आहे व आकाशापेक्षां बाप उंच आहे. वायुपेक्षा मन हें चंचळ आहे आणि तृणापेक्षां अधिक अंकूर होऊन वाढणारी चिंता आहे.

ज्याला दया नाहीं तो पाषाण समजावा. द्रव्य हेंच कुटुंबवत्सलाला मित्र होय. गृहस्थास भार्या ही मित्र आहे. रोग्यास औषध; व मरणास दानधर्म हे मित्र होत.

ज्याला स्वर्ग प्राप्तीची इच्छा आहे, त्यानें सत्यपणाचें व्रत धारण करावें, पुत्र असणें हाच मनुष्याचा आत्मा आहे. परोपकार करणारेच खरे धन्य. धनामध्यें विद्याधन हें श्रेष्ठ मानिलें आहे.

लाभांत आरोग्य लाभ. सुखामध्यें संतोष सुख. जों पर्यंत मान सोडिला नाहीं तोंपर्यंत दुःख होण्याची भीतीच नाहीं.